CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT


सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २१ जुलै २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २५२ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जो जो व्यवहार समाजाला जोडतो तोच धर्म आहे. पुण्य आहे. ज्या गोष्टी समाजाला तोडतात त्या अधर्म आहेत, पाप आहेत. म्हणून आपले कुटुंब कधीही समाजाला तोडणाऱ्या अस्पृश्यता, जातिभेद अशा अधार्मिक रूढींना बळी पडणार नाही, नेहमी समरसता वाढविणाऱ्या पुण्य कार्यात सहभागी होईल या दृष्टीने प्रयत्न करावा लागेल.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

# लातुरात छावा संघटना व अजितदादा गटाचे कार्यकर्ते भिडले

### विजयकुमार घाडगे-पाटील : सत्तेचा माज काय असतो? हे यांच्या वागण्यातून दिसते

**लातूर, दि.२० जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानपरिषदेत मोबाईलवर रम्मी खेळतानाचा व्हिडिओ आमदार रोहित पवार यांनी सोशल मीडियावर शेअर केल्यानंतर, अखिल भारतीय छावा संघटनेने तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. लातूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेच्या समाप्तीनंतर छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांना निवेदन दिले. यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे देखील उपस्थित होते. निवेदनादरम्यान, माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी करण्यात आली. यावेळी निषेध म्हणून टेबलवर पत्तेही फेकण्यात आले. या घटनेनंतर अखिल भारतीय छावा संघटना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते यांच्यात वाद निर्माण झाला आणि दोन्ही गटांमध्ये धक्काबुक्की झाली.

सुनील तटकरे हे आज लातूर येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्यासाठी आले होते. त्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली. अखिल भारतीय छावा संघटनेचे काही पदाधिकारी त्या ठिकाणी पोहोचले. त्यांनी विधानपरिषदेत मोबाईलवर गेम खेळणाऱ्या कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर कारवाईची मागणी करत जोरदार निषेध नोंदवला.




सभागृहात गेम खेळणाऱ्या मंत्र्यांना पदावर राहण्याचा अधिकार नाही, असे म्हणत छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना निवेदन दिले. निवेदन देत असताना त्यांनी निषेध म्हणून तटकरे यांच्या समोर टेबलावर पत्ते फेकले आणि गेम खेळायचा असेल तर घरी खेळा! अशा जोरदार घोषणा दिल्या. या वेळी छावा संघटनेने माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करत, सभागृह हे जनतेच्या हिताचे कायदे बनवणारे पवित्र स्थान असल्याचे ठासून सांगितले.

अखिल भारतीय छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी लातूरमध्ये प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन दिल्यानंतर परिस्थिती चिघळली. निवेदन देऊन बाहेर पडलेल्या छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवक कार्यकर्त्यांनी हल्ला चढवल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात छावा संघटनेचे विजयकुमार घाडगे पाटील यांना जोरदार मारहाण झाल्याची माहिती समोर आली आहे. छावा संघटनेचे कार्यकर्ते रेस्ट हाऊसच्या दुसऱ्या खोलीत बसले असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे काही कार्यकर्ते तिथे आले आणि त्यांनी छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांवर अचानक हल्ला चढवला, असा आरोप आहे.

#### अजितदादांच्या कार्यकर्त्यांकडून शेतकऱ्यांच्या पोरांना मारहाण

विजयकुमार घाडगे पाटील म्हणाले, आम्ही फक्त कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी करत निवेदन दिलं. शेतकऱ्यांच्या हितासाठी लढणारे मंत्री जर सभागृहात पत्ते खेळत असतील, तर त्यांच्याकडून शेतकऱ्यांचं भले होईल का? या प्रश्नावर आम्ही आवाज उठवला. त्यानंतर आम्ही रेस्ट हाऊसमध्ये बसलो होतो, तेव्हा राष्ट्रवादीचे गुंड आमच्यावर तुटून पडले. सत्तेचा माज काय असतो, हे त्यांच्या वागण्यातून स्पष्ट झाले आहे. छावा संघटनेमध्ये शेतकऱ्यांची पोरं आहेत, आणि याचा योग्य वेळी हिशोब घेतला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

सोलापूर : श्रावण महिना शुक्रवार २५ जुलैपासून सुरू होणार असून त्यानिमित्त सिद्धेश्वर मंदिरात विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. रविवारी रात्री टिपलेले छायाचित्र



(छाया : केवल तिवारी)

# ठाकरे-शिंदेही एकत्र येऊ शकतात

### शिवसेना शिंदे गटाचे मंत्री प्रताप सरनाईक यांचे विधान; अनेकांच्या भुवया उंचावल्या

**मुंबई, दि.२० जुलै**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे जसे एकत्र आले तसे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेही एकत्र येऊ शकतात, असे विधान परिवहन मंत्री सरनाईक यांनी केले आहे. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. राजकारणात काहीही होऊ शकते, असेही ते म्हणाले.



महाराष्ट्रात राजकीय वर्तुळात शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची युती होऊ शकते अशी चर्चा सुरू आहे. ५ जुलै रोजी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत विजयी मेळावा घेतला होता. जवळपास २० वर्षांनी दोन्ही ठाकरे बंधू एकाच व्यासपीठावर आले होते. शिवसेना आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरू असतानाच आता शिवसेना शिंदे गटाचे मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोठे विधान केल्याने आता नव्या युतीची चर्चा सुरु झाली आहे. सध्या आमदारांचे वादग्रस्त व्हिडिओ समोर येत आहेत. यावर देखील प्रताप सरनाईक यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, आमच्या पक्षातील आमदारांकडून काही विधाने करण्यात आले, त्यामुळे एकनाथ शिंदे नाराज होते. शिंदेंनी आमदारांना सक्त सूचना देखील दिल्या आहेत. आमच्याच आमदारांच्या तक्रारी आहेत असे नाही. सगळ्या पक्षातील आमदार बोलतात. एकनाथ शिंदे शिवसेनेचे ब्रँड आहेत. आमच्या पक्षाचा ब्रँड म्हणजे एकनाथ शिंदे, असेही यावेळी सरनाईक म्हटले आहे.

## महत्त्वाचे

### बजाजला सोडून अंबानींकडे आली जर्मन विमा कंपनी

**नवी दिल्ली** : जर्मनीची मोठी विमा कंपनी अलायन्स आणि मुकेश अंबानी यांची कंपनी जिओ फायनान्शियल सर्विसेसने एकत्रित भारतीय विमा बाजारात प्रवेश करण्याचे ठरवले आहे. यासाठी दोन्ही कंपन्यांनी प्रत्येकी ५० टक्के भागीदारीसह संयुक्त उपक्रम हाती घेतला आहे. दोघांनीही जीवन विमा आणि सामान्य विम्यात एकत्र काम करण्यासाठी करार केला आहे. बजाज फिनसर्व्हसोबतची २० वर्षांची भागीदारी संपवल्यानंतर चार महिन्यांनंतर अलायन्सने हे पाऊल उचलले आहे.

### अजमेरमध्ये पावसाचा ५० वर्षांचा विक्रम मोडीत

**अजमेर** : राजस्थानमध्ये गेल्या २४ तासांत झालेल्या मुसळधार पावसामुळे अजमेर, पुष्कर, बुंदी, सवाई माधोपूर आणि पालीसह अनेक शहरांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. संपूर्ण मान्सून हंगामात अजमेरमध्ये ४५८ मिमी पाऊस पडतो, परंतु यावर्षी जुलैमध्येच ६०९ मिमी पाऊस पडला आहे. म्हणजे १९ दिवसांत संपूर्ण हंगामापेक्षा जास्त पाऊस पडला आहे. ५० वर्षांपूर्वी १८ जुलै १९७५ रोजी संपूर्ण अजमेर अशाच प्रकारे पाण्यात बुडाले होते. दुसरीकडे, बिहारमधील अनेक नद्यांच्या पाण्याची पातळी वाढू लागली आहे. पटनामध्ये गंगा नदीला पूर आला आहे.

### झारखंडमध्ये घातपात टळला

**चायबासा** : झारखंडमधील पश्चिम सिंघभूम आणि सरायकेला-खरसवान जिल्ह्यांच्या सीमेवरील वनक्षेत्रातून सुरक्षा दलांनी रविवारी माओवाद्यांनी पेरलेले १४ आयईडी जप्त करीत घातपाताचा मोठा कट उधळला, अशी माहिती पोलिसांनी दिली. पश्चिम सिंघभूममधील टोकलो पोलिस ठाणे हद्द आणि सरायकेला-खरसवानमधील कुचाई पोलिस ठाणे क्षेत्राच्या सीमेवरील जंगलात नक्षलविरोधी कारवाईत व्यत्यय आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात स्फोटके पेरली असल्याची गुप्तचर माहिती मिळाली होती.

### आसाममध्ये कोट्यवधींचे हेरॉईन जप्त

**गुवागाटी** : आसामच्या काछार जिल्ह्यात दोन जणांकडून हेरॉईन जप्त केल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती मुख्यमंत्री हिमंता बिस्वास सरमा यांनी दिली. गुप्तचरांनी दिलेल्या माहितीच्या आधारे मादकपदार्थांच्या विरोधात ढोलाई पोलिस ठाणे हद्दीतील सप्तग्राम येथे कारवाई करण्यात आली, असे सरमा यांनी शनिवारी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले. त्यांच्या ताब्यातून १.२२ किलो हेरॉईन जप्त करण्यात आले. याचे मूल्य ६.२२ कोटी रुपये आहे.

### अरुणाचलच्या नामसाईत आयईडी जप्त

**इटानगर** : अरुणाचल प्रदेशच्या नामसाई जिल्ह्यातून सुरक्षा दलाने आयईडी जप्त केल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने रविवारी दिली. पियॉन्ग मंडळातील नागताव गावात नियमित गस्त घालत असताना आसाम रायफल्सच्या जवानांनी हा आयईडी जप्त केला. या आयईडीबाबत त्यांनी पोलिसांना माहिती दिली, असे नामसाईचे पोलिस अधीक्षक सांगे थिन्ले यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. हा आयईडी अतिशय जुना असून, सुरक्षा दल त्याचे परीक्षण करीत आहे.

# 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चा करण्यास सरकार तयार

### सर्वपक्षीय बैठकीनंतर रिजिजूंची माहिती ● आजपासून संसदेचे पावसाळी अधिवेशन

◆ **नवी दिल्ली, २० जुलै**

संसदेचे पावसाळी अधिवेश सोमवारपासून सुरू होत आहे. त्यापूर्वी रविवारी येथे झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत 'ऑपरेशन सिंदूर'वर चर्चा करण्यास तयार असल्याचे सरकारने विरोधकांना सांगितले असल्याची माहिती केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली.

सरकार सर्वच मुद्यांवर चर्चेसाठी तयार आहे. पण, ही चर्चा संसदीय नियमांनुसार व्हावी, असे रिजिजू यांनी सांगितले. कोणत्याही मुद्यावरील चर्चेपासून सरकार मागे हटणार नाही, असे रिजिजू यांनी स्पष्ट केले.

सर्वपक्षीय बैठकीत सर्वच राजकीय पक्षांचे म्हणणे ऐकून घेतले. पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर या महत्त्वपूर्ण चर्चेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी सभागृहात असावे, अशी विरोधकांची मागणी होती. नरेंद्र मोदी सभागृहात उपस्थित असतात. भलेही ते चर्चेत सहभागी नसले, तरी संसद परिसरात असतातच, असे रिजिजू यांनी सांगितले. संसदेचे कामकाज सुरळीतपणे चालावे ही सत्ताधारी आणि विरोधी पक्षांची जबाबदारी आहे. संसदेत भूमिका मांडायसाठी कित्येक लहान पक्षांना पुरेसा वेळ मिळत नाही. आम्ही या मुद्यार विचार करीत आहोत, असे रिजिजू म्हणाले.



सर्वपक्षीय बैठकीनंतर काँग्रेस नेते जयराम रमेश, आरएसपीचे एन.के. प्रेमचंद्रन आणि अन्य नेत्यांशी चर्चा करताना किरेन रिजिजू

**१७ विधेयके सादर करणार**

केंद्र सरकारने १७ विधेयके तयार केली आहेत. ही विधेयके पावसाळी अधिवेशनात सादर केली जातील. विरोधकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना सरकार सभागृहातील चर्चेदरम्यान उत्तर दिले जाईल. विरोधकांच्या सर्वच प्रश्नांना सरकार उत्तर देईल. आम्ही त्यांना बाहेर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊ शकणार नाही.

**विरोधकांची आभासी बैठक**

पावसाळी अधिवेशनात सरकारला घेरण्याची व्यूहरचना ठरवण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वातील इंडिया आघाडीची शनिवारी रात्री आभासी पध्द्तीने बैठक झाली. या बैठकीला आप वगळता आघाडीतील २४ पक्षांचे नेते उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

#### विरोधकांच्या मुख्य मागण्या

- पहलगाम आणि जम्मू-काश्मीरच्या नायब राज्यपालांनी केलेल्या वक्तव्यावर चर्चा व्हावी.
- भारत-पाकिस्तानच्या मुद्यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच केलेल्या वक्तव्यावर चर्चा व्हावी.
- बिहारमध्ये मतदार याद्यांचे पुनरिक्षण सुरू आहे. या दरम्यान विरोधकांनी सभागृहात मतदानाच्या अधिकाराबाबत चर्चेची मागणी केली आहे.
- चीन, पाकिस्तान आणि बांगलादेश सीमेवर तयार केलल्या टू फ्रन्ट ॲक्सिसवरही चर्चेची मागणी.
- मणिपुरातील परिस्थितीवर चर्चा करण्याची विरोधकांनी मागणी केली आहे.

# वैश्विक हितासह सर्वांच्या सुखाची कामना हे हिंदू विचारधन

◆ **नागपूर, २० जुलै**

संपूर्ण विश्वाच्या हिताची चिंता करत सर्वांच्या सुखाची कामना करणे हेच मूलभूत हिंदू विचारधन आहे. भारताचा गौरवशाली इतिहास व परंपरा याच विचारांचे प्रतिबिंब आहेत, असे राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का यांनी सांगितले.

राष्ट्र सेविका समितीच्या अ.भा. कार्यकारिणी व प्रतिनिधी मंडळाची अर्धवार्षिक बैठक १७ ते २० जुलै दरम्यान रेशीमबागेतील स्मृती मंदिर परिसरात आयोजित करण्यात आली होती. या अर्धवार्षिक बैठकीस ३८ प्रांतांतील ४११ प्रतिनिधी उपस्थित होत्या.



उद्बोधन करताना शांताक्का, शेजारी प्रमुख कार्यवाहिका सीता गायत्री

बैठकीच्या समारोपात शांताक्का म्हणाल्या की, संपूर्ण विश्वाच्या हिताची चिंता करत सर्वांच्या सुखाची कामना करणे हेच मूलभूत हिंदू विचारधन आहे. भारताचा गौरवशाली इतिहास व परंपरा याच विचारांचे प्रतिबिंब आहेत याच चिंतनाच्या आधारावर आपण स्वतःच्या जीवनाची घडण स्वबोधाच्या प्रकाशात करावी. सन २०२६ मध्ये राष्ट्र सेविका समितीच्या स्थापनेला ९० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने प्रतिनिधी सभेत कार्यवृद्धीची योजना आखण्यात आली. हे निश्चित करण्यात आले की रा.स्व. संघाच्या स्थापनेच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित सर्व कार्यक्रमांत राष्ट्र सेविका समितीच्या सेविका पूर्ण उत्साहाने सहभागी होतील. समितीच्या विविध कार्यविभागांमार्फत संघ शताब्दीनिमित्त पुढील वर्षभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. 'युवकांमध्ये वाढणारी व्यसनाधीनता, एक गंभीर संकट' या विषयावर प्रस्ताव मंजूर करण्यात आला. प्रतिनिधी सभेने आवाहन केले की, शासन व शैक्षणिक तसेच सामाजिक संस्था त्यांच्या योजनांमध्ये व्यसनमुक्ती कार्यक्रम अनिवार्यपणे समाविष्ट करावे. 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल भारतीय सैन्य व सरकारचे अभिनंदन करत अभिनंदन पत्रही प्रदान करण्यात आले. सभेच्या दुसऱ्या दिवशी 'स्वर निनाद' या घोषावर आधारित पुस्तिकेचे प्रकाशन प्रमुख संचालिका शांताक्का यांच्या हस्ते करण्यात आले. 'भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील काळा अध्याय, □ आणीबाणी' या विषयावर सेविकांच्या अनुभवांवर आधारित 'आणिबाणीची स्मरण कणिका' या ई-पत्रिकेचे लोकार्पणही करण्यात आले.

(तभा वृत्तसेवा)

# आता संसदेतील लोकप्रतिनिधींना 'पोषण आहार'

### कँटिनच्या मेन्यूत पारंपरिक भरड धान्यांचा समावेश ● वाजवी दरात पौष्टिकतेचा बुस्टर डोज

◆ **नवी दिल्ली, २० जुलै**

महाराष्ट्राच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान आमदार संजय गायकवाड यांनी खराब झालेली डाळ देण्यात आल्याच्या मुद्यावरून चांगलाच राडा केला. कँटिनमध्ये घुसून त्यांनी कंत्राटदाराला मारहाण केल्याचे सोशल मीडियावरून व्हायरल झालेल्या व्हिडीओत दिसले. एकीकडे विधानसभेतील अन्न पदार्थांच्या दर्जावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात असतानाच दुसरीकडे नवी दिल्लीमध्ये एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. देशातील १४० कोटींपेक्षा अधिक जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खासदारांचे आरोग्य सुदृढ राहावे, यासाठी आता संसदेच्या कँटिनमध्ये विशेष आरोग्यपूर्ण, पोषक मेन्यू देण्यात येणार आहे.

आपल्या संस्कृतीत खाद्यपदार्थातील पोषण मूल्याला अधिक महत्त्व आहे. प्रत्येक ऋतुमानानुसार आहार कसा असावा, याचेही मार्गदर्शन आपल्या पूर्वजांनी केले आहे. प्रकृतीसाठी उत्तम असणारे हे पदार्थ लोकप्रतिनिधींच्या आहारात आवर्जून असावे, यासाठी केंद्र सरकारने कँटिनमधील मेन्यूला भारतीय आहारशास्त्राची जोड देत उच्च पोषणमूल्य असणाऱ्या पदार्थांचा मेन्यूचा समावेश केला आहे.













या पोषणमूल्य असणाऱ्या मेन्यूमध्ये नाचणी इडली, ज्वारी उपमा, मूग डाळीचे धिरडे यासह इतरही अनेक पदार्थांचा समावेश असेल. खासदार, अधिकारी आणि पाहुण्यांना पौष्टिकतेचा बुस्टर डोज मिळणार आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या पुढाकाराने हा मेन्यू तयार करण्यात आला आहे.

**भरडला महत्त्व**

संयुक्त राष्ट्रांनी २०२३ या वर्षाला 'आंतरराष्ट्रीय भरड धान्य वर्ष' म्हणून घोषित केले होते. यामध्ये भरड धान्यांना विशेष प्रोत्साहन देऊन पांढऱ्या तांदळासह तेलकट पदार्थांना थाळीतून निरोप देण्यात आला होता.

आता संसदेच्या कँटिनमध्येही भरड धान्याला स्थान देण्यात आले आहे. ग्रीन टी, मसाला सत्तू, कैरी पन्हे यांचा समावेश पेय पदार्थात केला आहे.

(वृत्तसंस्था)

#### कोणकोणत्या पदार्थांची मेजवानी?

संसदेच्या कँटिनमध्ये आता सांभार आणि चटणीसह नाचणीची इडली, ज्वारी उपमा, शुगर फ्री मिश्र भरड धान्य खीर, बार्ली आणि ज्वारी सॅलड, गार्डन फ्रेश सॅलड, बॉइल्ड व्हेजिटेबल्स, रोस्ट टोमॅटो, बसिल शोरबा, व्हेज क्लिअर सूप, चणा चाट, मूग डाळीचे धिरडे यासह ग्रीन टी, हर्बल टी, मसाला सत्तू, गुळाचे कैरी पन्हे यांचा समावेश असेल. खासदारांबरोबरच आमदारांनाही सवलतीच्या दरामध्ये अन्पदार्थ उपलब्ध करून दिले जातात. आता संसदेमध्ये सर्वसाधारण मेन्यूऐवजी अधिक पौष्टिक मेन्यू पाहायला मिळणार आहे.

# रोहित पवारांविरोधात एफआयआर दाखल

**मुंबई, २० जुलै**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यावर एफआयआर दाखल करण्यात आला आहे. मुंबईतील आझाद मैदान पोलिस ठाण्यात ही तक्रार दाखल झाली असून, त्यांच्यावर सरकारी कामकाजात अडथळा निर्माण करणे आणि पोलिस अधिकाऱ्याशी गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

हा गुन्हा नोंद होण्यामागे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक आणि आमदार नितीन देशमुख यांच्या अटकेची पृष्ठभूमी आहे. दोन दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या लॉबीत भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. त्यानंतर पोलिसांनी जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना ताब्यात घेतले होते. नितीन देशमुख यांच्या अटकेविरोधात रोहित पवार हे थेट पोलिस ठाण्यात गेले होते आणि तिथे त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी वाद घातला.

# उत्तर प्रदेश, राजस्थानात पावसाचे ३२ बळी

## १५ नागरिक बेपत्ता, संततधारमुळे जनजीवन विस्कळीत, गंगा नदीला पूर, हजारो लोकांना सुरक्षित स्थळी हलविले

### रस्ते वाहतूक- रेल्वे सेवा विस्कळीत, बचाव कार्यासाठी एनडीआरएफ, एसआरडीआरएफ तैनात



◆ **लखनौ /जयपूर, २० जुलै**

देशाच्या बहुतांश राज्यात मुसळधार पावसाचा कहर सुरूच असून उत्तर भारतात परिस्थिती बिकट बनली आहे. उत्तर प्रदेश, राजस्थानमध्ये पूर आणि घरांच्या पडझडीमुळे २४ तासांत ३२ नागरिकांचा मृत्यू झाला, तर १५ पेक्षा अधिक जण अजूनही बेपत्ता आहे. अनेक नद्यांचे पाणी निवासी भागात शिरल्याने हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. गंगा नदी आणि उपनद्यांना आलेल्या पुरामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. रस्ते वाहतूक आणि रेल्वे सेवा विस्कळीत झाली असून बचाव कार्यासाठी एनडीआरएफ एसआरडीआरएफचे जवान तैनात करण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

उत्तर प्रदेशच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, राज्यात मागील ४८ तासांपासून मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली. सर्व बाधित भागात आपत्ती व्यवस्थापन पथके, एनडीआरएफची पथके तैनात आहेत आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी पाठवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहे. राज्यात गेल्या २४ तासांत पूर आणि घरांच्या पडझडीमुळे २५ नागरिकांचा मृत्यू झाला. त्यापैकी १८ जणांचा पुरात वाहून मृत्यू झाला, तर सहा जण इमारत कोसळून ठार झाले. चित्रकूटमध्ये बुडून दोन, मुरादाबादमध्ये तीन, गाजीपूरमध्ये एकाचा मृत्यू झाला. तर बांदा जिल्ह्यात तीन, महोबामध्ये दोन आणि ललितपूरमध्ये एका व्यक्तीचा मृत्यू पावसाशी संबंधित घटनांमध्ये झाला. पुरात वाहून गेलेले १५ लोक अजूनही बेपत्ता असून बचाव पथकाकडून शोधमोहिम सुरू आहे. मुसळधार पाऊस आणि हवामानामुळे विमानांची अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली, तर रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे, तसेच पुरामुळे अनेक महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात आली.

**पुरात अडकलेल्या १७ लोकांना वाचविले**

राजस्थानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये गेल्या २४ तासांत मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. अजमेर, पुष्कर, बुंदी, सवाई माधोपूर आणि पाली जिल्ह्यांत आलेल्या मुसळधार पावसामुळे १२ नागरिकांचा मृत्यू झाला.

टोंक जिल्ह्यातील गोलरा गावात बनास नदीत १७ लोक अडकले होते, ज्यांना एसडीआरएफने सुरक्षितपणे वाचवले.

**बिहारमधील नद्यांनी ओलांडली धोक्याची पातळी**


बिहारमधील अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. पाटण्यात गंगा नदीलगत राहणाऱ्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविले असून जिल्हाधिकाऱ्यांनी २१ जुलैपर्यंत जिल्ह्यातील शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. पूरस्थितीमुळे राज्यातील १४१ मार्ग बंद आहेत. (वृत्तसंस्था)

**हिमाचल प्रदेशात १४१ मार्ग बंद**

हिमाचल प्रदेशातील नऊ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरूच असून यात हमीरपूर, कांगडा, कुल्लू, मंडी, शिमला, सोलन आणि सिरमौर जिल्ह्यांचा समावेश आहे. पाऊस आणि भूस्खलनासह विविध घटनांमुळे, राज्यात आतापर्यंत १४१ रस्ते बंद आहेत, ५८ पाणीपुरवठा योजना आणि २८ वीज ट्रान्सफॉर्मर प्रभावित झाले आहेत. ■

# पंतप्रधान मोदी ब्रिटन, मालदीवच्या दौऱ्यावर

## भारत-ब्रिटन द्विपक्षीय मुक्त व्यापार करार होणार



◆ **नवी दिल्ली, २० जुलै**

पंतप्रधान नरेंद्र मोदी २३ ते २६ जुलैदरम्यान ब्रिटन आणि मालदीव या दोन देशांचा दौरा करणार आहेत. द्विपक्षीय व्यापार करार आणि राजकीय सहभागातून राजनैतिक संबंध मजबूत करण्याचा या दौऱ्याचा उद्देश आहे.

मोदी २३ ते २४ जुलैदरम्यान ब्रिटनचा दौरा करतील. यात भारत-ब्रिटन द्विपक्षीय मुक्त व्यापार करारावर शिक्कामोर्तब होईल. या करारामुळे ब्रिटनमध्ये होणाऱ्या भारतीय निर्यातीपैकी ९९ टक्के निर्यातीवर टॅरिफ कमी होईल. यामुळे व्हिस्की आणि कारसारख्या ब्रिटनमधून भारतात होणाऱ्या आयातीला चालना मिळेल. दोन्ही देशांदरम्यान अनुकूल असे व्यापार धोरण राबवण्यासाठी तीन वर्षे वाटाघाटी करण्यात आल्या आणि आता प्रत्यक्षात द्विपक्षीय व्यापार करार होणार आहे. यानंतर मोदी २५ ते २६ जुलैदरम्यान मालदीवला भेट देतील. तिथे ते ६० व्या राष्ट्रीय दिनाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. मोदींचा मालदीवचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइझ्झू यांच्या नेतृत्वाखालील मालदीवचा हा पहिलाच दौरा असेल आणि द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत करण्यावर भर राहणार आहे. दरम्यान, भारत आणि चार युरोपीय देशांचा समावेश असलेल्या 'युरोपीयन फ्री ट्रेड असोसिएशन'दरम्यान (ईएफटीए) मुक्त व्यापार कराराची १ ऑक्टोबरपासून अंमलबजावणी सुरू होईल अशी माहिती केंद्रीय वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनी दिली. या कराराअंतर्गत 'ईएफटीए' १५ वर्षांच्या कालावधीत भारतात १०० अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. या करारावर दोन्ही बाजूंनी मार्च २०२४मध्ये सह्या करण्यात आल्या होत्या. (वृत्तसंस्था)

# अमेरिकेतील २० राज्यांची ट्रम्प यांच्याविरोधात याचिका

### शाळांचा सहा अब्ज डॉलर्सचा निधी रोखला, कर्मचाऱ्यांचे पगार रोखले

**न्यूयॉर्क, २० जुलै-**

शाळांचे नवीन सत्र सुरू होण्यापूर्वीच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आदेशाने तेथील प्रशासनाने शाळांना मिळणारा सहा अब्ज डॉलर्सचा निधी रोखला. यामुळे २० राज्यांनी सर्वोच्च न्यायालयात ट्रम्प आणि त्यांच्या प्रशासनाविरोधात याचिका दाखल केली. निधी रोखल्याने शालेय कर्मचाऱ्यांचे पगार करणे कठीण झाले असून गरीब, ग्रामीण आणि विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येणार नाही असे याचिकेत नमूद आहे. याचिका दाखल करणाऱ्यामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या सत्ताधारी नेत्यांचादेखील समावेश आहे. हा निधी विशेषतः मागासलेल्या, ग्रामीण, कमी उत्पन्न असलेल्या किंवा विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या शालेय कार्यक्रमांसाठीचा आहे. यामध्ये शाळेनंतरचे कार्यक्रम, शिक्षक प्रशिक्षण, इंग्रजी-शिक्षण आणि विद्यार्थी समर्थन यासारख्या



योजनांचा समावेश आहे. ट्रम्प यांनी शाळांसाठी देण्यात येणाऱ्या निधीचे पुनरावलोकन करण्याचे आणि यासंदर्भातील अहवाल येईपर्यंत निधी रोखण्याचा निर्णय आदेश त्यांनी दिला होता. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाविरुद्ध २० हून अधिक राज्यांनी न्यायालयात याचिका दाखल केली. कॅलिफोर्निया आणि कनेक्टिकट यासारख्या राज्यांनी याला असंवैधानिक म्हटले आहे. न्यायालय या आठवड्यात या याचिकांवर सुनावणी घेणार आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांची भेट झाली नाही : गिरीश महाजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जुलै-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांची मुंबईतल्या एका पंचतारांकीत हॉटेलमध्ये गुप्त भेट झाल्याची चर्चा आहे. राजकीय वर्तुळात या भेटीचे वेगवेगळे अर्थही लावले जात आहेत. दोन्ही नेते या हॉटेलमध्ये तब्बल तीन तासांपेक्षा जास्त वेळ उपस्थित होते. मात्र ही भेट झाली की नाही याबाबचा खुलासा आता देवेंद्र फडणवीसांचे अत्यंत विश्वासू सहकारी, भाजपाचे संकटमोचक तथा ज्येष्ठ मंत्री गिरीश महाजन यांनीच केला आहे. याबरोबरच शिवसेना ठाकरे गटाबाबत देखील एक मोठे विधान ही यावेळी बोलताना त्यांनी केले. मंत्री गिरीश महाजन हे रविवारी (ता.२०) पंढरपूरला आले होते. त्यावेळी पत्रकारांबरोबर त्यांनी संवाद साधला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांच्या भेटीबाबत गिरीश महाजन यांना विचारण्यात आले. त्यावर बोलताना महाजन म्हणाले की, फडणवीस आणि आदित्य ठाकरे यांची कुठल्याही प्रकारची भेट हॉटेलमध्ये झाली नाही. ते दोघेही एकाच हॉटेलमध्ये होते. पण ते दोघेही वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमित्ताने तिथे गेले होते असे स्पष्टीकरण म हाजन यांनी दिले. त्यामुळे अशी कोणतीही भेट झाली नाही किंवा कोणतीही राजकीय चर्चाही झाली नाही असे त्यांनी सांगितले. भेटीबाबत अफवा असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाय या सर्व चर्चांना त्यांनी पूर्णविराम देखील दिला.

**ठाकरे ब्रँड संपला**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गेले त्याच दिवशी ठाकरे ब्रँड संपला असं मंत्री गिरीश महाजन यांनी यावेळी बोलताना सांगितले. भाजपला सोडून शिवसेना चक्क काँग्रेसच्या मांडीवर जाऊन बसली, तेव्हाच ठाकरे ब्रँड संपला, अशा शब्दात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी उद्धव ठाकरेंवर यावेळी हल्लाबोल चढवला आहे. उबाठातील खासदार मनाने भाजपसोबत असल्याचा दावाही गिरीश महाजन यांनी यावेळी केला.

**चंद्रभागेच्या वाळवंटात कायमस्वरुपी सुरक्षारक्षक**

येथील चंद्रभागेच्या पात्रात शनिवारी तीन महिला भाविकांचा स्नान करताना पाण्याचा अंदाज न आल्यामुळे मृत्यु झाल्याची घटना घडली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाने आषाढी यात्रेवेळी केलेले दावे फोल निघाले. आषाढी यात्रे नंतर चंद्रभागेच्या वाळवंटाची सुरक्षा रामभरोसे होती.त्यामुळेच शनिवारी महिला भाविकांचे प्राण गेले. दरम्यान आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचे पत्रकारांनी काल्च्या घटनेकडे लक्ष वेधले. त्यावेळी मंत्री महाजन यांनी घडलेल्या घटने बदल दुःख व्यक्त केले. या बरोबरच चंद्रभागेच्या वाळवंटात कायमस्वरुपी २५ सुरक्षा रक्षक ठेवण्यात येईल असे आश्वासन देखील त्यांनी यावेळी बोलताना दिले.

# काचेच्या घरात राहणाऱ्यांनी इतरांवर दगड मारू नये

### एकनाथ शिंदे यांचे ठाकरेंना प्रत्युत्तर

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २० जुलै -**

काचेच्या घरात राहणाऱ्यांनी इतरांवर दगड मारू नये, असा इशारा शिवसेनेचे मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे गटाला रविवारी दिला. सामनातील मुलाखतीत उद्धव ठाकरेंनी शिंदे यांच्यावर केलेली जहरी टीका आणि रामदास कदम आणि गृहराज्य मंत्री योगेश कदम यांच्यावर अधिवेशनात आरोप केले होते. या आरोपाला प्रत्युत्तर दिले.

गोरेगाव मधील नेस्को येथे ''शासन आपल्या दारी'' उपक्रमांतर्गत सिद्धेश कदम यांनी आयोजिलेल्या विशेष शिबिरात ते बोलत होते. ते म्हणाले की, निवडणुका आल्या की काही लोक बदनामीची खेळी खेळतात. निवडणुका येतात आणि जातात पण त्यांनी लक्षात ठेवावे, बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न होते की ४० लाख घरे मराठी माणसाला मिळायला हवीत. आम्ही हे स्वप्न पुढे नेत आहोत. ३५ लाख घरे उभारण्याचे काम सुरू केले आहे. मराठी माणसाला हक्काचं घर मिळवून देण्यासाठी काम सुरू आहे. जे मराठी लोक मुंबईबाहेर गेले, त्यांना परत आणण्याचे काम आम्ही करत आहोत. मी सोन्याचा चमचा घेऊन जन्म ला आलो नाही, पण प्रत्येकाच्या हातात तो देण्याची माझी इच्छा आहे असे सांगून ते म्हणाले,शासन आपल्या दारी उपक्रम तून राज्यातील पाच कोटी नागरिकांना थेट लाभ मिळाला असे प्रतिपादन केले. या शिबिरात विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आली. या शिबिराचा मुख्य उद्देश हा शासकीय सेवा आणि योजना नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचवणे, जेणेकरून नागरिकांना वेळेवर योजनांचा लाभ घेता येईल. यावेळी शिवसेना नेते गजानन कीर्तिकर, नेते रामदास कदम, खासदार रवींद्र वायकर, प्रवक्ते संजय निरुपम आदी उपस्थित होते.

# जागतिक शांतीसाठी 'हिंदू प्रारूप' विकसित करणार : शरदराव ढोले

### ● रा. स्व. संघाच्या प्रांतिक समन्वय बैठकीत शताब्दी वर्षाचे नियोजन




फर्ग्युसन महाविद्यालय : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रांत समन्वय बैठकीचे उद्घाटन करताना (डावीकडून) शरदराव ढोले, प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी आणि प्रांतकार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव.

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २० जुलै-**

जगाला जर शांतता हवी असेल, तर हिंदू जीवनविचारांच्या आधारावरच पुढे जावे लागेल. याचे प्रारूप येत्या पंचवीस वर्षांत संघ विकसित करेल अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय धर्मजागरण संयोजक शरदराव ढोले यांनी दिली. रविवारी (ता. २०) आयोजित पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या समन्वय बैठकीच्या समारोप सत्रात ते बोलत होते. फर्ग्युसन महाविद्यालयात पार पडलेल्या या बैठकीला संघाचे पश्चिम क्षेत्र कार्यवाह बाळासाहेब चौधरी, प्रांत संघचालक प्रा. नाना जाधव, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य सुहासराव हिरेमठ, प्रांत कार्यवाह डॉ. प्रवीण दबडघाव उपस्थित होते.

प्रांतभरातील संघ प्रेरित ४९ संघटनांचे ३२८ कार्यकर्ते व मातृशक्ती बैठकीत सहभागी झाले होते. संघ शताब्दीनिमित्त महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत झाले. शताब्दी वर्षाचे महत्त्व अधोरेखित करताना शरदराव ढोले म्हणाले की, वैश्विक पटलावर भारताला विकसित आणि मार्गदर्शक बनायचे असेल, तर हिंदू मूल्याधिष्ठित समाज निर्माण करावा लागेल. त्याची सुरुवात म्हणूनच संघ शताब्दी आहे. समाजातील सज्जनशक्ती आणि लाखो स्वयंसेवक पंच परिवर्तन जीवनात उतरवतील, तेव्हा त्यातून संपूर्ण देशात समाज परिवर्तनाची सुरुवात होईल, असा विश्वासही ढोले यांनी व्यक्त केला.

समाजाच्या सहभागातून, कुटुंब प्रबोधन, समरसतापूर्ण व्यवहार, पर्यावरणपूरक जीवनशैली, नागरिक शिष्टाचार आणि 'स्व'-बोध या पंच परिवर्तन बिंदूंवर कार्य केले जाणार आहे. अशी माहिती पश्चिम महाराष्ट्र प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री यांनी प्रसिद्धि पत्रकाद्वारे दिली आहे.

**डिसेंबर महिन्यात गृह संवाद अभियान**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षातील कार्यक्रमांची सुरुवात विजयादशमी (०२ ऑक्टोबर २५) पासून होते आहे. त्यासाठी देशभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, पश्चिम महाराष्ट्र प्रांतातही मंडल आणि नगर स्तरावर शस्त्रपूजन उत्सवांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी सर्वाधिक संख्येने गणवेशधारी स्वयंसेवक असतील असे प्रयत्न केले जाणार आहेत. डिसेंबर महिन्यात घरोघरी जाऊन संघ समजावून सांगण्याचे काम गृह संवाद अभियानातून होणार आहे. तर जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात प्रांतभर हिंदू संमेलने आयोजित करण्यात येतील.

# कृषिमंत्री जेव्हा स्वतःच्या 'होम मिनिस्टर'लाच विसरतात!

## विमान पकडण्याच्या घाईत पत्नीला विसरले 'मामाजी'

### एक किमी नंतर परतले आणि नंतर एकत्र गेले



◆ **जुनागड, २० जुलै**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान जुनागढमध्ये पत्नी साधना सिंह यांना सोडून २२ वाहनांच्या ताफ्यासह जुनागढहून राजकोटला रवाना झाले. एक किलोमीटर अंतरावर पोहोचताच कळले की पत्नीसोबत नाही. यानंतर, ताफ्याने लगेचच यू-टर्न घेतला आणि पीनट रिसर्च सेंटरमध्ये परतला, जिथे साधना सिंग वेटिंग रूममध्ये बसल्या होत्या.

खरेतर, शिवराज त्यांच्या पत्नीसह गुजरातच्या धार्मिक आणि अधिकृत दौऱ्यावर होते. सोमनाथ ज्योतिर्लिंग आणि गिर सिंहदर्शनाचे दर्शन घेतल्यानंतर, शनिवारी शेंगदाणा संशोधन केंद्रात लखपती दीदी योजनेशी संबंधित शेतकरी आणि महिलांशी संवाद कार्यक्रम होता.

त्यांना रात्री ८ वाजता राजकोटहून विमान पकडायचे होते आणि रस्ता खराब असल्याने ते घाईत होते. कार्यक्रमाच्या स्टेजवर ते वारंवार घड्याळाकडे पाहत राहिले. ते स्वतः माइकवर म्हणाले, राजकोटचा रस्ता खराब आहे, पुढच्या वेळी मी आरामात येईन.

त्यांनी आपले भाषण थोडक्यात थांबवले आणि ताफ्यासह लवकर निघून गेले. दुसरीकडे, साधना गिरनारला भेट देऊन परत आल्या होत्या आणि प्रतीक्षालयात बसल्या होत्या. शिवराज यांना समजले की त्यांची पत्नी त्यांच्यासोबत नाही. त्यानंतर त्यांनी फोनवर संपर्क साधला. त्यानंतर, ते ताफ्यासह परतले आणि त्यांच्या पत्नीसह राजकोटला निघून गेले. (वृत्तसंस्था)

# दिल्लीतील 'कुसुमाग्रज अध्यासन केंद्रा'चा मार्ग मोकळा

### मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**नवी दिल्ली :** जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) गेली १७ वर्षे रखडलेले 'कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासन केंद्र' आता प्रत्यक्षात सुरू होऊ शकेल. अध्यासनाचे उद्घाटन गुरुवार २४ जुलै रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. मुख्यमंत्री कार्यालय व 'जेएनयू' प्रशासनाने काही तासांत समारंभाची तारीख निश्चित केली. कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिकाही तयार केली असून ती संबंधितांना पाठवण्यात आल्याचे समजते. कुसुमाग्रज मराठी भाषा अध्यासन केंद्राच्या उद्घाटन समारंभाबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज सामरिक व संरक्षण विशेष अध्यासन केंद्राचा कोनशिला समारंभही आयोजित करण्यात आला आहे. हे दोन्ही कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्रीएकनाथ शिंदे वअजित पवार, मराठी भाषामंत्री उदय सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिकमंत्री आशीष शेलार यांच्या उपस्थितीत पार पडणार आहेत. जेएनयूच्या कन्व्हेंशन सेंटरमध्ये २४ जुलै रोजी संध्याकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल. समारंभाच्या निमंत्रणपत्रिकेवर सम न्वयक या नात्याने डॉ. जे. जगन्नाथन व डॉ. अरविंद येलेरी यांचाही उल्लेख आहे. राज्य सरकारने अध्यासन केंद्राची सद्यःस्थिती जाणून घेतली. त्यानंतर विद्यापीठ प्रशासन व मुख्यमंत्री कार्यालयाने केंद्राच्या उद्घाटनाला मान्यता देत तारीखही निश्चित केली. कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्रासाठी राज्य सरकारकडून निधीची तरतूदही करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.

# कृषिमंत्र्यांचा मोबाईलवर 'रमी' खेळत असलेला व्हिडिओ व्हायरल

- रोहित पवारांनी एक्सवर पोस्ट केला व्हिडीओ!
- माणिकराव कोकाटेकडून मात्र इन्कार!





**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २० जुलै-**

वादग्रस्त वक्तव्यामुळे सातत्याने चर्चेत असलेले राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. पावसाळी अधिवेशनावेळी विधान परिषदेत ते मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सरचिटणीस आ. अजित पवार यांनी हा व्हिडीओ 'एक्स'वर पोस्ट केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली असून सर्वस्तरातून त्यावर टिकेची झोड उठली आहे.

दरम्यान, कृषिमंत्री कोकाटे यांनी या कृत्याचा इन्कार केला असून मी रमी खेळत नव्हतो तर तो गेम स्किप करीत होतो, असा खुलासा केला आहे. रोहित पवार यांनी रविवारी सकाळी हा व्हिडीओ 'एक्स'वर शेअर केला असून ते मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचे दिसते पवार यांनी १८ सेकंदाचा हा व्हिडीओ पोस्ट करून त्यात म्हटले आहे,' जंगली रमी पे आओ ना महाराज!, सत्तेतल्या राष्ट्रवादीला कुठलीही गोष्ट भाजपला विचारल्याशिवाय करता येत नाही. सध्या राज्यात शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासोबतच राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असून तरीदेखील यांना निर्णय घेता येत नाही. कारण प्रत्येक गोष्ट भाजपला विचारावी लागते. त्यामुळे आता हातात काहीच काम शिल्लक नसल्याने कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात बसून रमी खेळत आहेत,अशी टीका केली आहे. काही वेळातच हा व्हिडीओ तुफान व्हायरल होऊन त्याबाबत सोशल मीडियावरून टीकेची झोड उठली आहे. राजकीय क्षेत्रातही त्याचे पडसाद उमटले असून विरोधकांनी हल्ला चढविला आहे.

### डच्चू मिळणाऱ्या चार मंत्र्यांत कोकाटे : संजय राऊत

सत्ताधारी मंत्री, आमदाराचे वर्तनामुळे राज्याची मान शरमेने खाली गेली आहे. मात्र त्यांना जरासुद्धा लाज वाटत नाही. असे सांगून ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत म्हणाले,' अमित शाह यांनी देवेंद्र फडणवीस यांना ४ मंत्र्याना डच्चू देण्यास सांगितले आहे. त्यांच्यासह काँग्रेसचे नाना पटोले, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विजय वडेट्टीवार, जितेंद्र आव्हाड, माजी राज्यमंत्री बच्चू कडू, आदींनी त्यांच्यावर टीका करत मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री पवार यांनी तातडीने राजीनामा घेण्याची मागणी केली आहे.

### गेम स्किप करत होतो : कोकाटे

विधान परिषदेतील कामकाज स्थगित झाल्याने मी खालच्या सभागृहातील चर्चा पाहण्यासाठी युट्यूबवर सुरू केला होता. त्यावेळी त्यावर रमी खेळाच्या जाहिराती आल्याने मी ते स्किप करीत होतो, हा व्हिडीओ कोणी काढल्याबद्दल मला आक्षेप नाही. पण या व्हिडीओच्या माध्यमातून मला लक्ष्य करण्यात येत आहे. त्यांनी केवळ १८ सेकंदाचा व्हिडीओ व्हायरल केला आहे, त्यापुढचाही दाखवावा, रोहित पवार यांनी कृषीक्षेत्रासाठी काय काम केले आहे? ते पहिल्यांदा सांगावे

– **माणिकराव कोकाटे** (कृषिमंत्री, महाराष्ट्र)









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# विद्यार्थ्यांना मिळणार गीतेचे धडे

उत्तराखंड पाठोपाठ आता हरयाणा सरकारनेही शाळांमध्ये प्रार्थनेत भगवद्गीतेतील श्लोक म्हणणे अनिवार्य केले आहे. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्रावर उपदेश केला त्याकाळी कुठलाही धर्म, पंथ, जात-पात अस्तित्वात नव्हती. मनुष्याने जन्म घेतल्यानंतर त्याची कर्तव्ये कोणती आहेत हे कृष्णाने अर्जुनाला सांगितले. याचाच अर्थ भगवद्गीता ही या पृथ्वीतलावरील मानवाच्या कल्याणासाठी आहे. भारतीय शिक्षणात भारतीय परंपरा आणि आध्यात्मिक मूल्यांचा समावेश असावा, शालेय जीवनातच चांगले आणि वाईट काय याचे ज्ञान मिळावे, एक परिपूर्ण मनुष्य घडावा जो पुढे समाज आणि देश घडवेल, या उद्देशाने उत्तराखंडपाठोपाठ हरयाणा सरकारनेही राज्यातील सर्व शाळांमध्ये श्रीमद्भगवद्गीतेचे श्लोक वाचन सकाळच्या प्रार्थनेत अनिवार्य केले आहे. सरकारी तसेच खाजगी शाळांमध्ये दररोज एका श्लोकाचे वाचन केले जाणार आहे. गीतेतून आपल्याला अध्यात्म जीवनाचे महत्त्व तर कळतेच पण मनुष्य नैतिक मूल्यांनी परिपूर्ण होतो, तसेच नेतृत्वक्षमताही विकसित होते. गीतेतील श्लोक संस्कृत भाषेत आहेत. सर्वसामान्यांना ते समजणे कठीण असले तरी आता प्रत्येक भाषेत गीतेवरील भाष्य उपलब्ध आहे. महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी सर्वप्रथम गीतेतील श्लोकांची फोड करीत भगवान श्रीकृष्ण यांनी केलेला उपदेश सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविला. ज्ञानेश्वरांनी अहल्यानगर जिल्ह्यातील नेवासे येथे ज्ञानेश्वरी लिहिली. त्याला भावार्थ दीपिका असे म्हणतात. करवीश्वराच्या मंदिरात गीतेवर ज्ञानोबारायांनी भाष्य केले आहे. नक्की लिखाण कुठे केले याविषयी मतेमतांतरे आहेत. गोदावरीच्या काठावरील पैठण या तीर्थक्षेत्री ज्ञानेश्वरी रचल्याचेही दावे केले जातात. या आध्यात्मिक ग्रंथात ३६८ ओव्या आहेत. गीता म्हणजे अध्यात्म, भक्ती, तत्त्वज्ञान, समर्पण आणि शौर्याचे दर्शन घडविणारा ग्रंथ होय. अर्थात मानवी जीवनाचे सार गीतेत सामावलेले आहे. पण, आपल्या भारतीयांचे झाले असे की, कस्तुरीमृग तू तुला न कळले, सुगंध शोधत जीवन सरले । चाहूल घे सुख कोठे दडले, तुझे आहे तुझपाशी, पर तुला ना कळले । या ओळी अभंग नाही. चारोळी किंवा कविता असावी. पण, यातील भावार्थ आपल्याशी सुसंगत आहे.

आपल्या अभ्यासक्रमात पाश्चात्त्य साहित्य आणि साहित्यिकांची भरमार आहे. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाला असलेली पुस्तके पाश्चात्त्य लेखक, कवी, साहित्यिकांनी भरलेले आहेत पण भारतीय साहित्यिकांना फारसे स्थान मिळालेले नाही. भारताकडे सर्वच प्रकारच्या ज्ञानाचा खजिना उपलब्ध आहे पण आपल्याला त्यापासून वंचित ठेवले गेले. भगवद्गीतेला फक्त हिंदू धर्माशी जोडले गेले. वास्तविक पाहता हा ग्रंथ सर्वांसाठी अनुकरणीय आहे. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील संवाद असलेल्या या ग्रंथात १८ अध्याय आणि एकूण ७०० श्लोक आहेत. हजारो वर्षे झाली तरी गीतेचे महत्त्व संपलेले नाही. भारतीय तत्त्वज्ञान हे कालातीत आहे. आजही गीताज्ञान अमोघ, अनमोल आणि अमूल्य आहे. गीतेचे ज्ञान तरुणवयात नव्हे तर बालपणापासून मिळणे आवश्यक आहे. दुर्दैवाने आपल्या देशात निवृत्त झालेले किंवा वृद्धावस्थेला पोहचलेले अध्यात्माकडे वळतात. वास्तविक पाहता गीतेतील ज्ञान बाल्यावस्थेपासून शाळांमधून देणे गरजेचे आहे. दुर्दैवाने आज गीता म्हटले की तथाकथित धर्मनिरपेक्षवाद्यांच्या कपाळावर आठ्या पडतात. पण, या उपटसुंभांच्या हे गावी नसते की गीतेतून आपल्याला केवळी ईश्वरी नव्हे तर व्यावहारिक ज्ञानही मिळते. माझाच देव चांगला, केवळ माझीच आराधना करा, असे एकेश्वरवादाचे दर्शन आपल्याला भारतीय तत्त्वज्ञानात मिळत नाही. भारतीय जीवनदर्शन आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून अभ्यासक, संशोधक भारतात येत असतात पण भारतीयांना मात्र या ज्ञानापासून वंचित ठेवले आहे.

कर्म हा गीतेचा गाभा आहे. वासुदेवनंदन पार्थला उपदेश करताना पदोपदी त्याला त्याच्या कर्माची आठवण करून देत असतात.

**न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।**
**कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥**

हा श्लोक सर्वांसाठी लागू पडतो. अर्थात कोणताही मनुष्य कोणत्याही काळात कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही. कारण, निसर्गाने मनुष्याला अशाप्रकारे घडविले आहे की तो कर्म करीत राहण्यास बाध्य आहे. हे कर्म कोणते करायचे हे मनुष्याने ठरवायचे असते. वर्तमान युग विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे असले तरी जीवनाचे खरे ज्ञान आपल्याला गीतेमधून मिळते. त्यामुळे मुलांवर बालपणापासूनच जर चांगले संस्कार झाले, चांगले-वाईट याची जाणीव झाली तर संपूर्ण समाजाची जडणघडण योग्यरीत्या होण्यास मदत होईल. राग, द्वेष, नकारात्मक भावना, भीती अशा भावनांमध्ये अडकलेल्या मनुष्याने कसे वर्तन करावे, याचे ज्ञान गीतेतून मिळते. महाभारताचा कालावधी हा पाच हजार वर्षांपूर्वीचा आहे. या काळात जगात सनातन धर्म आणि भारतीय संस्कृती वगळता अन्य एकाही संस्कृतीचा लवलेशही नव्हता. मनुष्य रानटी अवस्थेत जगत असताना भारतात एक समृद्ध संस्कृती नांदत होती जिचा पाया भगवद्गीता आहे. कर्म करताना कर्तव्याची जाणीव ठेवा आणि कर्तव्याचे पालन करताना मनाचे संतुलन ढळू न देता समता या मूल्याचा अंगीकार करावा, असा उपदेश भगवान श्रीकृष्णाने गीतेतून दिला आहे.

गीतेत अंधश्रद्धेला वाव नाही. त्यामुळे उत्तराखंड आणि हरयाणा सरकारने सर्वच शाळांमध्ये गीतेतील श्लोक म्हणणे अनिवार्य करण्याचा जो निर्णय घेतला त्याचे परिणाम चांगलेच होणार आहेत. प्रत्येक श्लोकातून आपल्याला ज्ञानप्राप्ती होते जे वर्तमान जीवनाशी सुसंगत ठरते. बालक, मुले म्हणजे मातीचा गोळा असतात. त्यांना जसे वातावरण मिळेल, जशी संगत आणि ज्या प्रकारचे ज्ञान मिळेल त्याच आधारावर त्यांची मानसिक जडणघडण होते. सनातन ही अखिल विश्वाच्या कल्याणाचा विचार करणारी संस्कृती आहे. बालवयापासून गीतेचे धडे मिळाल्यास त्यांच्यात या ग्रंथाविषयी उत्सुकता निर्माण होण्यास मदत होईल. याचनिमित्ताने घराघरांमध्ये गीता पोहचेल. कारण गीता मुक्तीचा संदेश देत नाही तर कर्म, भक्ती, युक्ती आणि शक्तीचा संदेश देते. आपल्या रक्ताचा नातेवाईक असला तरी कुठल्याही परिस्थितीत अधर्माची बाजू घेऊ नये, हे तत्त्वज्ञान भगवान श्रीकृष्णाने सांगितले आहे.

गीतेतील प्रत्येक श्लोक हा सिद्धांतापेक्षा कमी नाही. हे सिद्धांत मानवी जीवनाची मूल्ये, आपला व्यवहार, नेतृत्वक्षमता, भावनात्मक संतुलन साधण्यात मदत करते. गीता म्हणजे शाळेत शिकविण्याचा एक विषय नसून यामधील उपदेश आणि शिकवण आचरणात आणण्याचा विषय आहे. कारण गीतेतील ज्ञानाचा आधार हा मनोविज्ञान, तर्क, व्यवहार विज्ञान आणि नैतिक दर्शनावर आधारित आहे. सनातन, भागवत धर्माचे अंग असलेली गीतेतील ही मूल्ये कोणत्याही धर्मासाठी नसून मानवजातीच्या कल्याणासाठी आहेत. खरे तर या ज्ञानापासून आपल्याला वंचित ठेवण्यात आले आहे. उशिरा का होईना, शाळांमधून गीताश्लोक मुलांना शिकविण्याचा अत्यंत चांगला निर्णय हरयाणा आणि उत्तराखंड या भाजपाशासित राज्यांनी घेतला आहे. उत्तराखंडमध्ये श्लोकांचे केवळ पठन केले जाणार नाही तर आठवड्यातून एकदा त्यावर समीक्षा केली जाणार आहे. तसेच 'श्लोक ऑफ द वीक' ठरविण्यात येणार असून त्यावर चर्चा केली जाईल. शिक्षक सूचना फलकावर श्लोक लिहून त्यावर चर्चा घडविली जाणार आहे. विद्यार्थ्यांना श्लोकाचे महत्त्व समजावे हा त्यामागील उद्देश आहे. भारतीय संस्कृती आणि शिक्षणात परंपरागत ज्ञानाचा समावेश केल्याने विद्यार्थी आणि समाजाचाच फायदा होणार असल्याचा तर्क समर्थनार्थ दिला जात आहे, तर दुसऱ्या बाजूने धार्मिक शिक्षण थोपवीत असल्याचे आरोपही सुरू झाले आहेत. उत्तराखंडमधील पुष्करसिंग धामी आणि हरयाणातील नायबसिंग सैनी सरकारने घेतलेला हा निर्णय सनातनविरोधकांना नक्कीच आवडला नसेल. हिंदू धर्म आणि परंपरेला सातत्याने विरोध करणाऱ्या डाव्यांच्या पोटात खुपायला प्रारंभ झाला आहे. पण, सर्वच दिवस सारखे नसतात. ही तर सुरुवात आहे. विश्वगुरू होण्याच्या दिशेने पडलेले पाऊल आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# पावसाळी अधिवेशन आजपासून

पहलगाम दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर! आजपासून सुरू होत असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात या दोन प्रमुख मुद्द्यांवर वादळी चर्चा होण्याचे संकेत आहेत. २१ ऑगस्टपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात आणखीही काही मुद्दे चर्चेला येणार असले तरी चर्चेचा केंद्रबिंदू ऑपरेशन सिंदूर राहील असे दिसते.

**पहलगाम हल्ला :** २२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसारण खोऱ्यात झालेला दहशतवादी हल्ला हा प्रामुख्याने राज्य सरकारच्या अपयशाचे उदाहरण मानला जातो. स्थानिक गुप्तचर माहिती गोळा करण्याची जबाबदारी ही प्रामुख्याने राज्य सरकारची असते. गुप्तचर कार्यप्रणालीचा हा अघोषित नियम आहे. स्थानिक यंत्रणा, स्थानिक खबरे या माध्यमातून गुप्तचर संस्थांना माहिती मिळत असते. या आघाडीवर राज्यातील उमर अब्दुल्ला सरकार अपयशी ठरले. याशिवाय राज्यात पर्यटकांचे आगमन सुरू झाले असताना, पहलगाम हे पर्यटकाचे एक प्रमुख केंद्र आहे, हे सरकारला माहीत होते. त्याठिकाणी पर्यटकांची गर्दी होईल, राज्य सरकारने तेथे सुरक्षा जवानांची तैनाती केली पाहिजे हे राज्य प्रशासनाच्या लक्षात यावयास हवे होते. ते झाले नाही. याचा फायदा दहशतवाद्यांनी उचलला.

**आणि पलायन :** २६ हिंदू पर्यटकांची हत्या केल्यानंतर चार-पाचही अतिरेकी जंगलात पळून गेले. स्थानिक जंगलातील वाटा, आडवाटा, रस्ते , दऱ्या-खोरे या साऱ्याची माहिती केंद्रीय सुरक्षा दलांना असेल, अशी अपेक्षा करणे चूक होते. हेही काम राज्य पोलिस दलाचे होते. त्यातही राज्य सरकार अपयशी ठरले. वास्तविक दुसऱ्या कोणत्याही राज्यात अशी घटना घडली असती तर तेथील सरकार बरखास्त करून, तेथे राष्ट्रपती शासन लावले गेले असते. पण, जम्मू-काश्मीरची संवेदनशीलता लक्षात घेऊन केंद्र सरकारने असे कोणतेही टोकाचे पाऊल उचलले नाही हे योग्यच झाले. अन्यथा पाकिस्तानचे पुन्हा फावले असते. एक दहशतवादी हल्ला करून राज्यातील लोकनिर्वाचित सरकार उलथविता येते हे पाकिस्तानच्या लक्षात आले असते. भारत सरकारने संयमित भूमिका घेत राज्य सरकारच्या विरोधात कोणतीही कारवाई केली नाही, हे योग्य झाले.

**ऑपरेशन सिंदूर :** ऑपरेशन सिंदूरबाबत सरकारकडून सभागृहात एखादे निवेदन केले जाईल आणि विरोधी पक्ष याबाबत चर्चा -प्रश्न उपस्थित करतील असे दिसते.

**ट्रम्प यांची घोषणा :** अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांनी या युद्धविरामाची घोषणा का केली असा प्रश्न विरोधी पक्ष उपस्थित करतील असे कळते. सरकारकडून याबाबत नेमके उत्तर दिले जाईल असेही समजते. राष्ट्रपती ट्रम्प यांचा स्वभाव पाहता त्यांनी स्वतःच असा आगाऊपणा केला असावा असे म्हणता येईल. कारण, राष्ट्रपती ट्रम्प वारंवार जे दावे करीत आहेत, ते भारताने यापूर्वीच फेटाळले आहेत. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष भडकण्याची चिन्हे होती. तो आण्विक संघर्षही असू शकत होता. म्हणून अमेरिकेने यात मध्यस्थी केली असा दावा अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स व परराष्ट्र मंत्री मार्क रुबियो यांनी केला आहे. तो भारताने वारंवार फेटाळून लावला आहे. अमेरिकेचे उपराष्ट्रपती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात दूरध्वनीवर चर्चा होत असताना आपण स्वतः त्या खोलीत उपस्थित होतो, असे महत्त्वाचे विधान परराष्ट्र मंत्री डॉ. जयशंकर यांनी केले आहे. या विधानाला महत्त्वाचा पुरावा मानले पाहिजे.

**सीमा न ओलांडता :** भारत-पाकिस्तान यांच्यात आजवर १९४८, १९६५, १९७१, १९९९, २०१९, अशी चार-पाच प्रमुख युद्धे झाली आहेत. पण, ऑपरेशन सिंदूर नावाने झालेल्या युद्धाचे वैशिष्ट्य म्हणजे- दोन्ही देशांनी आपापल्या सीमांमध्ये राहूनच हा संघर्ष केला. ना भारताचा एक जवान वा एक विमान पाकिस्तानी हद्दीत गेले, ना पाकिस्तानचा जवान वा विमान- भारतीय हद्दीत शिरले. दोन्ही देशांमध्ये चार दिवस झडलेला जोरदार संघर्ष सीमा रेषांच्या आत राहून झाला.

**अधिकृत युद्धबंदी नाही :** भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष चार दिवसानंतर थांबला असला तरी दोन्ही देशांमध्ये अधिकृतपणे युद्धबंदी वगैरे झालेली नाही. जे काही झाले आहे ते सारे मौखिक! युद्धबंदीच्या करारावर ज्याप्रमाणे सह्या वगैरे केल्या जातात ते अद्याप झालेले नाही.

**दोन वादग्रस्त विधाने :** ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने काही विमाने गमावली काय याबाबत सरकारने अधिकृतपणे काहीही सांगितले नसताना, सरसेनापती अनिल चौहान व इंडोनेशियातील भारतीय दूतावासातील एका नौदल अधिकाऱ्याने केलेले विधान या दोन बाबी वादग्रस्त ठरल्या. जनरल चौहान यांनी भारताने एक विमान गमावले असे एक विधान सिंगापूरमध्ये आयोजित 'शांग्रिला डायलॉग्ज' या कार्यक्रमात बोलताना केले होते. तर नौदल अधिकाऱ्याने इंडोनेशियात आयोजित कार्यक्रमात बोलताना अधिक गंभीर विधान केले. या दोन्ही अधिकाऱ्यांनी हे टाळले असते तर ते बरे झाले असते. कारण, भारत सरकारने अधिकृतपणे काहीही सांगितलेले नाही. अशा स्थितीत सैनिक अधिकाऱ्यांनी काही विधाने करीत, सरकारला अडचणीत आणले हे योग्य ठरले नाही.

**अत्याधुनिक युद्ध :** ऑपरेशन सिंदूरचा सारा तपशील अद्याप समोर आला नसला तरी, भारत-पाकिस्तान यांच्यात झालेले हे अत्याधुनिक युद्ध होते यात शंकाच नाही. यात 'इलेक्ट्रॉनिक वॉर फेअर' नावाच्या तंत्राचा प्रथमच वापर करण्यात आला असे समजते. यात 'इलेक्ट्रो मॅग्नेटिक स्प्रेक्ट्रम' हे आजवर ऐकिवात नसलेले शस्त्र वापरण्यात आले. याचा वापर दोन्ही देशांनी केला. बहुधा या एका कारणामुळे जगभरातील लष्करी अभ्यासकांसाठी ऑपरेशन सिंदूर महत्त्वाचे ठरणार आहे.

**ऑपरेशन मल्टी डोमेन :** ऑपरेशन सिंदूर व त्याच्या उत्तरात पाकिस्तानने केलेले ऑपरेशन बुनयान उल मरसूस यांच्या संदर्भात एक नवा शब्द वापरला जातो. ऑपरेशन मल्टी डोमेन! याचा अर्थ काय? लढाऊ विमानांचे रडार, आकाशात असलेली रडारयंत्रणा सज्ज विमाने, अवकाशातील उपग्रह अशा वेगवेगळ्या स्तरांवर हे युद्ध लढले गेले. येणाऱ्या काळातील युद्ध-'मल्टी डोमेन ऑपरेशन' राहणार असल्याचे मानले जाते.

**चर्चा बिहारची :** दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीचे नगारे वाजू लागले आहेत. बिहार विधानसभा निवडणूकीपूर्वी निवडणूक आयोगाने मतदारयाद्या नव्याने तयार करण्याचा निर्णय घेतला, जो वादग्रस्त ठरला. त्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले.

**२८ जुलैला सुनावणी :** सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीत निवडणूक आयोगाला तीन प्रश्न विचारण्यात आले. न्यायालयाने आयोगाला निवडणूक यादी सुधारित करण्याचा निर्णय तर स्वीकारला पण, आताच का, असा एक प्रश्न विचारला आहे. या संदर्भात न्यायालयाने कोणताही अंतिम आदेश जारी केला नसला तरी, पुढील सुनावणी २८ जुलै रोजी करण्याचा निर्णय घेतला आहे. या साऱ्याचे पडसाद संसदेच्या दोन्ही सभागृहांत उमटणार आहेत. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणूक २०२५ मधील शेवटची निवडणूक असेल. २०२६ च्या पहिल्या पूर्वार्धात प. बंगाल विधानसभेची निवडणूक होणार आहे.

**पाठिंबा आणि विरोध :** 'एक देश, एक निवडणूक' यावर विचार केला जात आहे. देशाचे माजी मुख्य न्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूड यांनी 'एक देश, एक निवडणूक' संकल्पनेला पाठिंबा तर दिला आहे. मात्र, निवडणूक आयोगाला अधिक अधिकार असण्यास जोरदार विरोध नोंदविला आहे. एक देश, एक निवडणूक संकल्पना किती वेगाने समोर सरकते हे येणाऱ्या काळात दिसेल.

## वेध

सोनाली पवन ठेंगडी

# शब्दावाचून कळले सारे...

पत्रकारितेत म्हणतात की, एक छायाचित्र एका संपूर्ण बातमीचे काम करते. प्रतिमेचे कोणतेही रूप घ्या ते हजारो शब्दांचे काम करण्यास सक्षम असते. यासाठी भास या संस्कृत नाटककाराचे 'प्रतिमागृहप्रवेशम्' हे नाटक फारच बोलके आहे. वडिलांच्या मृत्यूबाबत अनभिज्ञ असणारा भरत जेव्हा आजोळहून परतत असतो तेव्हा त्याला मार्गात एक प्रतिमागृह दिसतं. तेथे रघुवंशातील दिवंगत राजांच्याच प्रतिमा असतात, असे त्याला सांगितले जाते. दर्शनासाठी तो आत जातो तेव्हा त्याला तिथे राजा दशरथाची प्रतिमा दिसते आणि तो मूर्च्छित होतो. एक प्रतिमा खूप काही सांगून जाते, याचेच हे द्योतक आहे.

हाच फंडा आपल्या मोबाईलमधील इमोजींनाही लागू पडतो. ज्या भावना मांडायच्या आहेत त्या शब्दात मांडण्यापेक्षा ते दर्शविणारी इमोजी टाकली की काम फत्ते... आपण एखाद्या गोष्टीवर हसतोय् म्हटल्यानंतर अगदी नाटकाच्या स्क्रिप्टमध्ये लिहितात तसे कंसात 'हशा' असे टाकायची गरज नाही, एक हसण्याचा इमोजी टाकला की काम भागतं. बरे त्या हसण्याचेही वेगवेगळे प्रकार इमोजी दाखवतं. स्मितहास्य, विकट हास्य, सात मजली हास्य, लोटपोट हास्य सारे काही प्रकार त्यात आहेत. तुम्ही कसे हसता ते तुमच्यावर अवलंबून आहे. दुःखाचेही तसेच आहे. दुःखाचे इमोजीही वेगवेगळ्या प्रकारात उपलब्ध आहेत. एखाद्या पोस्टविषयी सहृदयता दाखवायची असेल तर हृदयाचा इमोजीही आहे. विशेष म्हणजे, यात कोणीही हृदयाचा इमोजी टाकल्यावर प्रेम वगैरे व्यक्त केल्याचा गैरसमज करून घेत नाही. आता लोकांना या इमोजीची सवय झाली आहे. एरवी कोणाला साध्या पत्रात हृदयाच्या आकाराचे 'बदाम' पाठवले तर मार खाण्याचीच वेळ यावी...!

एकूणच काय तर इमोजीने माणसाचे व्यक्त होणे सोपे केले आहे. नुकताच या इमोजींचा वाढदिवस १७ जुलैला झाला. ११ वर्षांपूर्वी जन्माला आलेल्या या इमोजींनी भावनाविष्काराला नवे रूप, नवे आयाम दिले. इमोजींचा जन्म १७ जुलै २०१४ रोजी झाला. ११ व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या इमोजीची कहाणी मोठी गमतीशीर आहे. याची संकल्पना सर्वप्रथम जपानमध्ये अस्तित्वात आली. शिंगटाका कुरिता या दूरसंचार क्षेत्रात कार्यरत अभियंत्याने सर्वप्रथम १९९९ साली याची निर्मिती करत ते फोनमध्ये वापरले. जपानमध्ये ही कल्पना खूपच आवडली आणि त्याच्या अनेक आवृत्त्या बाजारात आल्या. मात्र, याला जगभराची मान्यता मिळण्यासाठी २०११ हे वर्ष उजाडावे लागले. जपानमध्ये जन्माला आलेल्या या संकल्पनेचे पालकत्व ऑस्ट्रेलियन जेरेमी बर्जने घेतले. त्याने विविध भावनांना मूर्त रूप दिले आणि काही वर्षातच तब्बल साडेसात हजारांपेक्षा जास्त भावनांना इमोजीच्या रूपात सांधले. मँचेस्टरमध्ये दहशतवादी हल्ला झाला तेव्हा दुःखी इमोजी लोकप्रिय झाला तर डोनाल्ड ट्रम्पच्या निर्णयाविरोधातील रागाचा इमोजीही समाज माध्यमांवर रुजला. त्यानंतर इंटरनेटच्या जगात इमोजीचा प्रवेश खऱ्या अर्थाने झाला. मोबाईलमध्ये २०१४ पासून इमोजींचे दालन खुले झाले.

जेरेमी बर्ज यांनी साकारलेले इमोजीचे जग इतके प्रभावी ठरले की त्याची दखल ॲपल, सॅमसंग, फेसबुक, गुगल या सर्व बड्या कंपन्यांना घ्यावीच लागली. आज हजारो इमोजी अस्तित्वात आहेत. मानवाच्या विविध भावभावनांना वाट मोकळी करून देताहेत. मात्र, ठेंगा, स्मितहास्य, खळाळून हास्य, अश्रू, हृदयाचा बदाम आणि चुंबन या इमोजींचा वापर सर्वाधिक प्रमाणात होतो, असे नुकतेच एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, दररोज जगभरात पाच अब्ज एवढ्या मोठ्या संख्येने इमोजींचा वापर होतो. आज आपण मोबाईलच्या आहारी गेल्याबद्दल खडे फोडतो. मात्र, मोबाईलने दूरच्या व्यक्तीसोबतही संवादाचा सांधलेला पूल आपण विसरून जातो. आज जवळच्या नातेवाईकांनी एकमेकांकडे जायला हवे, अगदी वेळात वेळ काढून जायला हवे, असे आपण आग्रहपूर्वक म्हणतो. पण, एकूणच सर्वांचा दिनक्रम बघता एका ग्रुपच्या माध्यमातून का होईना, सगळे बांधलेले असतात, हेही नसे थोडके. भावना या बोलूनच व्यक्त केल्या पाहिजे, हेही अगदी खरे आहे. मात्र, जेव्हा शब्द अपुरे पडतात तेव्हा एरवी अश्रू बोलतात, हे आपण अनुभवले. तसे आता शब्द सुचले नाही तर इमोजी मदतीला धावतात. इमोजीमुळे काय मिळाले आणि काय गमावले, हा व्यर्थ हिशेब मांडण्यापेक्षा अनेकांच्या अव्यक्त, अमूर्त भावनांना या इमोजींमुळे मूर्त रूप मिळाले, या क्रांतीचा जयजयकार करायला हवा. अर्थातच, त्याचा अतिवापर अयोग्यच आहे. ज्या नात्यांसाठी आपुलकीचे आपण बोललेले शब्द आणि भेट महत्त्वाची आहे तिथे ती गरज भागवलीच पाहिजे. मग बाकी जगात वापरायला हरकत नाही....नमस्कार, पुष्पगुच्छ, स्मितहास्य...!

७७५५९३८८२२


## कानोसा

अमोल पुसदकर

# जनसुरक्षा कायद्याची भेट

नुकतीच फडणवीस सरकारने महाराष्ट्राला जनसुरक्षा कायद्याची भेट दिलेली आहे. या कायद्याबद्दल बरेच गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न माओवादी लोकांनी, शहरी नक्षलवाद्यांनी आणि त्यांच्या द्वारा समर्थित राजकीय पक्षांनी केला. मागील वर्षी याबाबतचे विधेयक मांडण्यात आले होते. सरकारने मागच्या वर्षी बनविलेल्या सर्वपक्षीय समितीने जवळपास १२५०० सूचनांचा विचार करून व आवश्यक ते बदल करून हा कायदा सर्वानुमते पारित केलेला आहे.

दहशतवादानंतर नक्षलवाद हा भारताला पोखरणारा एक मोठा रोग आहे. संपूर्ण देशभरामध्ये भोळ्याभाबड्या अशिक्षित जनतेला संविधानाच्या व सरकारच्या विरोधामध्ये भडकवून समाजामध्ये एक वर्ग संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात असतो. याला देशभरामध्ये चालविण्याचे कार्य वामपंथी, माओवादी विचारसरणीचे लोक करीत असतात. जंगलामध्ये आपल्या पोलिसांच्या आणि निमलष्करी दलाच्या विरोधात नक्षलवादी सशस्त्र संघर्ष करतात. गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वात संपूर्ण देशभरामध्ये सशस्त्र नक्षलवादाची कंबर तोडली गेलेली आहे. ठिकठिकाणी त्यांना शरणागती पत्करावी लागत आहे. सशस्त्र नक्षलवादाला जनता सुद्धा कंटाळलेली आहे. वर्षानुवर्षे जंगलात राहून, विकासापासून दूर राहून, वनांमध्ये राहणाऱ्या या सर्वसामान्य आदिवासी समाजाला सुद्धा आपल्या भविष्याची चिंता आता सतावत आहे. आपणही विकासाच्या प्रवाहामध्ये आले पाहिजे. आपल्याही मुलाबाळांचे भविष्य हे चांगले झाले पाहिजे. आपल्या डोक्यावर कधी नक्षलवाद्यांची तर कधी पोलिसांची कोणतीही टांगती तलवार राहू नये अशा पद्धतीचा विचार सर्वसामान्य वनवासी जनता करीत आहे. त्यामुळेच पोलिसांच्या, निमलष्करी दलांच्या मोहिमांना यश येऊन गडचिरोली असो की बिजापूर, बस्तर असो की तेलंगणा आंध्र प्रदेशचा भाग या सर्व ठिकाणी सशस्त्र नक्षलवाद पराभूत होताना दिसत आहे. सर्व सामान्य तरुणाचा या चळवळीने भ्रमनिरास केल्यामुळे तोही आता नोकरी धंद्याच्या व पोटापाण्याच्या कामाला लागलेला आहे. नवीन तरुणांची भरती सशस्त्र नक्षलवाद्यांमध्ये आता जवळपास बंदच झालेली आहे. जुने लोक सुद्धा सातत्याने जंगलात पळून कंटाळून ते सुद्धा हा मार्ग सोडून शरणागती पत्करत आहेत. हा सरकारचा व संविधानाचा एक प्रकारे विजयच आहे.



परंतु सरकारचे सशस्त्र नक्षलवादाविरोधात जे विजयी अभियान चालू आहे त्याला पराभूत करण्यासाठी शहरी नक्षलवादी सरसावलेले असतात. शहरी नक्षलवादी हे दिसायला तुमच्या आमच्या सारखेच असतात. हे सर्व लोक विशेषतः आदिवासी, मागासवर्गीय लोकांना किंवा मजुरांना हाताशी धरून सरकारविरोधी, संविधानविरोधी आंदोलन करताना दिसतात. त्यांच्याजवळ लेखक आहेत, कवी आहेत, राजकीय नेते सुद्धा आहेत, पत्रकार आहेत, इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये सुद्धा त्यांच्या लोकांचा वावर आहे. हे लोक स्वतः काही करीत नाही. परंतु सर्वसामान्य जनतेला भडकवून एखाद्या विशिष्ट गटाविरुद्ध, समाजाविरोधात किंवा सरकारी मालमत्तांच्या विरोधात हे लोक हिंसाचाराला प्रोत्साहन देत असतात. म्हणजे कधी मजुरांच्या, कधी शेतकऱ्यांच्या, कधी विद्यार्थ्यांच्या, कधी आदिवासींच्या तर कधी मागासवर्गीयांच्या खांद्यावर बंदूक ठेवून हे लोक समाजामध्ये हिंसाचार घडवून आणण्याचा प्रयत्न करीत असतात. समाज माध्यमांवर सुद्धा ये आजादी अधूरी है, ये आजादी झूठी है, आम्हाला आमचे राज्य आणायचे आहे अशा पद्धतीच्या गोष्टी हे लोक प्रचारीत करीत असतात. सर्वसामान्य समाजाला मात्र याबद्दल त्यांच्या हेतूबद्दल काहीही माहिती नसते. हे बिनबोभाटपणे सरकारी सर्व सोयी सुविधांचा वापर करीत समाजामध्ये राहूनच समाजाचे, देशाचे रक्त पिण्याचे काम करीत असतात. हे लोक ते अस्तनितले साप आहेत, हे लोक म्हणजे माणसाचे रक्त पिणाऱ्या अळ्या आहेत. अनेक वेळा गुप्तचर विभाग, पोलिस दल यांच्यावर व यांच्या कार्यावर नजर ठेवून असतात. परंतु बरेच वेळा हे पडद्यामागचे सूत्रधार असल्यामुळे यांना अटक कशी करायची हा नेहमी प्रश्न असतो. पोलिस दलाला अशा लोकांवर कारवाई करण्यासाठी केंद्र सरकारच्या ''बेकायदेशीर गतिविधि प्रतिबंधक कायद्याची'' मदत घ्यावी लागायची. परंतु केंद्र सरकारचा कायदा हा अधिक व्यापक असल्याने त्याचा वापर करण्यामध्ये स्थानिक स्तरावर अनेक अडचणी यायच्या. ज्यामध्ये पकडलेल्या आरोपींना सुद्धा सोडून द्यावे लागायचे किंवा न्यायालयात त्यांच्या विरोधात आरोपपत्र दाखल करेपर्यंत फारसे पुरावे गोळा होऊ शकत नव्हते. छत्तीसगड, आंध्र, ओडिशा, तेलंगणा या राज्यांमध्ये अशा पद्धतीचे कायदे आधीच अमलात आलेले आहे. त्याच्या भरोशावर त्यांनी नक्षलवादाला चांगलाच लगाम घातलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या समस्यांवर नेमके लक्ष केंद्रित करणाऱ्या प्रभावी कायद्याची आवश्यकता होती. परंतु असा कायदा आणण्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची सुद्धा आवश्यकता असते. यापूर्वीच्या कोणत्याही सरकारने अशा पद्धतीची इच्छाशक्ती दाखविली नव्हती हे तितकेच खरे आहे. या कायद्याद्वारे हिंसाचाराला प्रोत्साहन देणारा किंवा देऊ शकणाऱ्या व्यक्तीला पोलिस अटक करू शकतात. त्याच्यावरील आरोप हे दखलपात्र व अजामीनपात्र राहणार आहेत. त्यामुळे पोलिसांना अशा व्यक्तीला किंवा सूत्रधाराला अटक केल्यानंतर जवळपास कमाल बारा महिन्यांचा कालावधी मिळू शकतो. ज्यामध्ये पोलिस त्याची पाळेमुळे खोदून काढू शकतात व त्याच्याविरोधात दमदार आरोपपत्र तयार करू शकतात. या कायद्याचा दुरुपयोग होऊ नये यासाठी सरकारने एखाद्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करताना डीआयजी पदाच्या व्यक्तीची लेखी परवानगी घेणे बंधनकारक केले आहे. या गुन्ह्यांचा तपास हा उपअधीक्षक (डीवायएसपी) आणि त्यावरील अधिकारीच करू शकणार आहेत. एखाद्याला अटकेत आणखी काही दिवस ठेवायचे असेल तर निवृत्त न्यायाधीश किंवा न्यायाधीश ज्याचे सल्लागार आहे असे मंडळ स्थापन करावे लागेल व त्या मंडळाच्या परवानगीने त्यांच्यासमोर आवश्यक ते पुरावे सादर करूनच व्यक्तीला कमाल मर्यादेपर्यंत अटकेत ठेवता येऊ शकेल.

हा कायदा सर्वसामान्य माणसांचा सरकार विरोधी निदर्शने करण्याचा किंवा बोलण्याचा अधिकार काढून घेत नाही. समाज, संविधान, सरकार, सरकारी मालमत्ता यांच्या विरोधातल्या कृतींना बेकायदेशीर ठरवून समाजाचे नुकसान होऊ नये यासाठी त्वरित कारवाई करण्याचा अधिकार पोलिसांना देणारा हा कायदा आहे. शहरी नक्षलवादाचे कंबरडे मोडणारा हा कायदा आहे. ''बहुजन हिताय, बहुजन सुखाय'' हे आपले ब्रीदवाक्य आहे. त्यामुळे जनतेच्या सुरक्षेसाठी निर्माण करण्यात आलेल्या या जनसुरक्षा कायद्याचे आपण स्वागतच करायला पाहिजे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

### नेत्यांचे वर्तन योग्य आहे का?

आपला महाराष्ट्र संपूर्ण देशात एक शांत, पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जायचे, होय ओळखले जायचे. शौर्य आणि संस्कृतीचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी, अनेक महान कवी, लेखक, कलाकार, वैज्ञानिक, शिक्षक, नेतेमंडळी आणि खेळाडू होऊन गेलेत. आणखी काय तर देशाची आर्थिक राजधानी सुद्धा! अशा आपल्या महाराष्ट्रात अलिकडे विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी, मंत्री आणि कार्यकर्ते यांचे वर्तन फारच अशोभनीय आहे. अगदी लज्जास्पद गोष्टी त्यांच्याकडून आपण अनुभवतो. निवडणुकीच्या वेळी नम्रतेने जनतेसमोर हात पसरणारे नंतर सरड्यासारखे रंग बदलतात. सामान्य माणसालाही ऐकायला व बघायला लाज वाटेल अशी त्यांची वक्तव्ये, शाब्दिक चिखलफेक, राडा, समाजात तेढ निर्माण करणे, नुकताच झालेला विधानभवनातला तुंबळ राडा तर कळसच!

विधिमंडळात असो वा व्यासपीठावर काहींचा व्यवहार आक्षेपार्ह असतो. कुठे आहेत ती सुसंस्कृत नेतेमंडळी जी विरोधी पक्षातील नेत्यांना सुद्धा सन्मानाने वागवायची. आजही काही नेत्यांकडे आपण एक आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून बघतो. नवनिर्वाचित नेते मंडळींना आमदार, खासदार, मंत्रिपदाची शपथ देण्यापूर्वी किमान शिष्टाचाराचे धडे द्यायला नको का? ही असली लबाड मंडळी काय जनतेची सेवा करणार? काय राज्याचे आणि देशाचे हित साधणार? तरुण पिढीने यांच्याकडून काय शिकायचे? समृद्ध महाराष्ट्रासाठी एकूणच संस्कृतीच्या दृष्टीने हे घातक आहे. या विघातक वर्तनाला वेळीच लगाम लावला पाहिजे अन्यथा ही वृत्ती नवीन पिढीच्या नेतेमंडळींपर्यंत झिरपेल आणि बेंचमार्क सुद्धा ठरेल. तेव्हा ज्येष्ठ नेत्यांना कळकळीची विनंती आहे की यावर विधिमंडळात चर्चा करून पायबंद घालण्यासाठी आवश्यक असेल तसे विधेयक सुद्धा आणावे. माजलेल्या आणि भ्रष्टाचारी नेत्यांना माघारी बोलावण्याचा जनतेला अधिकार असावा. जनतेच्या सहनशक्तीचा कडेलोट होऊन सैराट नेत्यांना सार्वजनिक चोप मिळण्यापूर्वीच यांच्या वागणुकीला चाप बसेल अशी व्यवस्था तरी निर्माण करावी हीच विनंती आणि अपेक्षा.

**प्रा. विलास डोईफोडे**/९११२८५७२९९

## वाचक पत्रे

### दीप अमावास्येचे महत्त्व

आषाढ महिन्यातील अमावास्येच्या दिवशी दीप अमावास्या असते. दीपपूजन हे एक व्रत म्हणून साजरे केले जाते. या दिवशी दिव्यांचे भावपूर्ण पूजन केले जाते. भारतीय संस्कृतीमध्ये दिव्याला विशेष स्थान आहे. दिवा हा तेजाचे प्रतीक आहे. दिव्याचे वर्णन ''तमसो मा ज्योतिर्गमय'' असे केले जाते. दिवा हा आपल्याला अंधकाराकडून प्रकाशाकडे नेतो. तो स्वतः जळून मानवाला प्रेम, शांती, प्रकाश यांचा संदेश देतो. हीच त्याची महानता आहे. पूजेच्या उपकरणांमध्ये दीप किंवा दिवा मुख्य उपकरण आहे. दीपपूजनाच्या विधीमध्ये दिव्यासाठी एक संस्कृतमध्ये मंत्र आहे त्याचा अर्थ असा आहे की, हे दीपदेवता तुम्ही ब्रह्मस्वरूप आहात, तेजःपुंज आहात, तुम्ही कधीही क्षीण होत नाही. मला आरोग्य देऊन माझ्या सर्व इच्छा पूर्ण करा.

अग्निपुराणात असे सांगितले आहे की, पूजेसाठी वापरण्यात येणाऱ्या दिव्यामध्ये केवळ तेल किंवा तूप यांचाच वापर करावा. याशिवाय कुठल्याही ज्वलनशील पदार्थाचा उपयोग करू नये. अशाप्रकारे दीप अमावास्येचे महत्त्व धर्मामध्ये सांगितले आहे.

**संगीता भोसले**/नागपूर

### तृतीयपंथीयांना आवर कोण घालणार?

नागपूर येथील छत्रपती आणि जयप्रकाश नगर मेट्रो स्टेशन चौक या चौकात सिग्नलवर कार अथवा स्कूटरने थांबल्यास तृतीयपंथीयांपासून महिला, मुले आणि पुरुष यांनी कसे सुरक्षित निघावे हा प्रश्न पडला आहे. सिग्नलवर थांबले की हे तृतीयपंथी झुंबडीने येऊन अंगाला स्पर्श करतात. चित्रविचित्र हावभाव करतात आणि यांच्याशी कोणी चढ्या आवाजात बोलले तर शिव्याशाप देत, धक्के मारून जातात. चौकात पोलिस असावे अशी अपेक्षा असते. कधी कधी पोलिस असतात पण ते फक्त चालान फाडणे हीच माझी जबाबदारी असल्यागत वागतात. प्रत्येक कामासाठी वेगळा पोलिस तैनात करणार का? लोकांच्या सुरक्षेविषयी यांची जबाबदारी नाही का?

विशेष म्हणजे तृतीयपंथीयांच्या या वागणुकीकडे ते नेहमीच कानाडोळा करतात. भीक मागणे जर कायद्याने गुन्हा असेल तर हे तृतीयपंथी भिकेच्या नावाखाली जो जोरजबरदस्तीचा धंदा करतात त्याला आळा घालायलाच हवा. कोणाच्या घरी काही लग्नकार्य, मंगलकार्य वगैरे असले की हे येऊन भरपूर पैसे लाटतात. दहा हजाराच्या खाली पैसे घेत नाहीत आणि पैसे मिळेपर्यंत हे तमाशा करतात. पोलिस प्रशासनाला नम्र विनंती आहे की, त्यांनी या लोकांकडे लक्ष द्यावे आणि ही खंडणी थांबवावी.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...

## पाठखळ घटनेतील महिला आरोपीस कराडला नेणारा तो आरोपीचा मित्र

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २० जुलै-**

पाठखळ येथे स्वत:चे प्रेमप्रकरण लपविण्यासाठी एका वेडसर महिलेला गोपाळपूर येथून आणून तिला जीवे मारुन मी किरण असल्याचा बनाव करुन कडब्याच्या गंजीत पेटवून देवून कराडला पलायन केल्या प्रकरणातील विट्यापासून कराडला घेवून जाणारा हा कराडचा आरोपीचा मित्र असल्याचे तपासात उघड झाल्याने पोलीस त्याला सहआरोपी करणार की माफीचा साक्षीदार करणार याकडे तमाम नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.




या घटनेची हकीकत अशी,पाठखळ येथे दि.१४ जुलै रोजी यातील प्रेयसी किरण व प्रियकर निशांत या दोघा आरोपींनी रात्री २.३० वाजता गोपाळपूर येथून आणलेल्या एका वेडसर महिलेचा गळा आवळून खून करुन तिचा मृतदेह कडब्याच्या गंजीत ठेवून पेटवून दिला होता. या घटनेनंतर आरोपी निशांत याने प्रेयसी किरण हिला मोटर सायकलवरुन कराडला जाण्यासाठी सांगोला मार्गे विटा हद्दीत सोडले होते. या दरम्यान कराड येथे आरोपी निशांत हा ज्या रुमवर राहत होता. तेथील मुलाने विटा येथे येवून प्रेयसी किरण हिस कराडला घेवून गेल्याचे चर्चेतून पुढे येत आहे. आरोपी निशांत हा विटा येथून पुन्हा पाठखळ येथे परत आला. या घटनेत आरोपी किरण हिस मदत केल्याप्रकरणी आरोपीच्या मित्रास पोलीस सहआरोपी करणार की? माफीचा साक्षीदार करणार यावर तालुक्यातून चर्चा होत असून पोलीसांच्या कारवाईकडे लक्ष लागून राहिले आहे. दोन्ही आरोपींनी कडब्याच्या गंजीमध्ये सदर महिलेला जाळण्यापुर्वी गॅसवर ठेवून जाळण्याचा प्लान केला असल्याची माहिती समोर येत असून त्यासाठी ज्यादा सिलेंडर गॅसही आणण्यात आले होते. प्रियशी किरण हिने प्रियकर निशांत यास गॅसचा स्फोट झाल्यानंतर माझ्या घरातील लोक जखमी होतील असे करायला नको? म्हटल्यानंतर आरोपी निशांत याने पेट्रोल टाकून जाळण्याचा डाव आखून तो सफल केला. त्या वेडसर महिलेला आणण्यासाठी आरोपी निशांत हा गोपाळपूर येथे जावून त्या महिलेशी बातचीत करुन तिला लाडीगोडी लावत असे. याबाबतचे व्हिडीओ ही उपलब्ध झाले आहेत. सदर महिलेस मोटर सायकलवर आणून शेतात गळा दाबून दोन दिवस मृतदेह पडक्या घरात ठेवला होता. मृतदेहाचा वास सुटून घटनेचे बिंग बाहेर पडेल. या भितीपोटी आरोपीने मृतदेह जाळण्याचा निर्णय घेवून दि.१४ च्या मध्यरात्री २.३० वाजता आरोपीने काम फत्ते केले. प्रियकर व प्रियशी आरोपी यांच्यात मोबाईलवरुन होणार संभाषण पोलीसांना या गुन्हयाचा उलघडा करण्यात महत्वाचा धागा ठरला आहे. यावरुनच पोलीसांनी सुतावरुन स्वर्ग गाठत कराड येथून सदर प्रियकर मुलीस ताब्यात घेवून दोघांना गजाआड करण्यात पोलीस यशस्वी ठरले. दरम्यान दोघे पळून जावून कराड येथे विवाह करण्याचा दोघांचे नियोजन आखले होते अशी माहिती पुढे येत आहे.

## पतीसोबत अनैतिक संबंधाची विचारणा केल्याने पत्नीस मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २० जुलै-**

माझ्या पती सोबत तुझे अनैतिक संबंध आहेत काय? असे विचारले असता तुझ्या पती सोबत अनैतिक संबंध आहेत असे म्हणून चिडून एका ३२ वर्षीय विवाहित महिलेस काठीने बेदम मारहाण करुन गंभीर जखमी केल्या प्रकरणी गोरख भाऊसाहेब टकले,मच्छिंद्र भाऊसाहेब टकले, भाऊसाहेब दादा टकले,जयश्री भाऊसाहेब टकले,वणिता मारुती टकले,सविता राजेंद्र टकले (सर्व रा.तळसंगी) या सहाजणाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील जखमी ३२ वर्षीय विवाहित महिलेने दि.१८ रोजी आरोपी वणिता हिस माझ्या पती सोबत तुझे अनैतिक संबंध आहेत काय? असे विचारले असता तिने फिर्यादीस तुझ्या पती सोबत अनैतिक संबंध आहेत, तुला काय करायचे ते कर असे म्हणून वाद झाला होता. दि.१९ रोजी जखमी फिर्यादी ही सकाळी दहा वाजता घरी असताना आरोपींनी हातात काठ्या घेवून घरा समोर येवून फिर्यादीस तुझे पती सोबत अनैतिक संबंध आहेत असे का विचारले जाब विचारुन शिवीगाळी करुन हातातील काठीने उजव्या गुडघ्याजवळ मारुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीचे केस धरुन जमिनीवर पाडून पुन्हा लाथाबुक्याने मारहाण केली. त्याचबरोबर फिर्यादीच्या पतिस कुऱ्हाडीच्या दांड्याने डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. भांडणामध्ये गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र हिसका मारुन तोडून घेतले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## शेळ्या सोडल्याची विचारणा केल्याने महिलेचा विनयभंग करुन मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि. २० जुलै-**

द्राक्ष बागेत शेळ्या का सोडल्या? अशी विचारणा करण्यास गेलेल्या एका ४० वर्षीय महिलेस व तिच्या मुलास लोखंडी गजाने मारुन सदर महिलेचा पदर ओढून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य केल्याप्रकरणी प्रशांत बाळू माने,शशिकांत बाळू माने,वणिता बाळू माने (सर्व रा.कचरेवाडी) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील पिडीत महिला ही दि.१७ रोजी ४.१५ वाजता शेतात गेल्यावर घरासमोरील द्राक्ष बागेत फिर्यादीच्या ओळखीचे आरोपी याने ४ ते ५ शेळ्या बागेत सोडून थांबला होता. यावेळी फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा शेळ्या बाजूला घेण्यास सांगून शेळ्या हाकलून लावत असताना आरोपीने शिवीगाळ सुरु केली व फिर्यादीच्या मुलास हाताने मारहाण करत असताना फिर्यादीने मारु नका असे म्हंटल्यावर तेथे पडलेला दगड घेवून मुलाच्या उजव्या हाताच्या मनगटावर मारुन जखमी केले. तसेच लोखंडी सळईने मुलाच्या पिंडरीवर मारुन जखमी केल्याचे म्हटले आहे. भांडणे सुरु असताना सोडवासोडवी करत असताना आरोपीने सदर फिर्यादी महिलेचा पदर ओढून जवळ घेवून तिच्या मनाला लज्जा वाटेल असे कृत्य केले. यावर फिर्यादीने मोठ्याने आरडाओरडा करताच फिर्यादीचे पती घटनास्थळी धावून आले असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास महिला पोलीस हवालदार सुनिता चवरे या करीत आहेत.



# विद्यार्थ्यांमधील कौशल्य शोधून त्यांना घडवावे

### पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे प्रतिपादन
### उद्यम शाळा-शिक्षक प्रशिक्षणाचा समारोप




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

भविष्य घडवण्याची व चांगली पिढी निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. त्यामुळे शिक्षकांनी प्रथमता शिकण्याबद्दल विद्यार्थ्यांची मानसिकता तयार करून त्यांना शिक्षण द्यावे. विद्यार्थ्यांमधील कौशल्य शोधून त्यांना त्यादृष्टिकोनातून घडवावे, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व सहचर्य विभागातर्फे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या शिक्षकांकरिता आयोजित उद्यमशाळा या दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर हे होते. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उद्योजिका चंद्रिका चौहान, सेवावर्धिनीचे गिरीश देगावकर, शिवरत्न पवार, विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. विकास पाटील, कौशल्य विकास विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी कादर शेख, सिनेट सदस्य रोहिणी तडवळकर, शशिकांत चव्हाण, इनक्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश गुराणी, विनायक बंकापूर, चन्नवीर बंकुर आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यशाळेसाठी प्रिसिजन फाउंडेशन, सर फाउंडेशन, सेवावर्धिनी, स्वदेशी जागरण मंच, साविष्कार या संस्था सहआयोजक आहेत. दोन हजार शिक्षकांचा यामध्ये सहभाग होता.

कुलगुरू डॉ. महानवर म्हणाले की, आज जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवल्याचे आपण पाहतो. त्यामुळे जिल्हा परिषद शिक्षक हे फार महत्वाचे असतात. समस्या व अडचणी निर्माण झाल्यास नेहमीच त्यावर उपाय निघतो आणि तेथूनच खऱ्या अर्थाने संशोधनास चालना मिळते. आणि हे काम आज ग्रामीण भागात होत असते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य आणि बुद्ध्यांक नेहमी अधिक असतो. त्यामुळे त्या दृष्टिकोनातून शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे, असे आवाहन देखील कुलगुरू यांनी यावेळी केले. प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या शिक्षकांनी विद्यापीठ भेटीसाठी विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करावे आणि येथील सोयी सुविधांचा विद्यार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले.

## जलजीवन मिशन संघटनेची स्थापना; अध्यक्षपदी मिलिंद भोसले




### राज्यस्तरीय बैठकीत निर्णय
### कंत्राटदारांची देयके तत्काळ मिळण्यासाठी प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील जलजीवन मिशनमध्ये काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या सातारा येथील राज्यस्तरीय बैठकीत राज्य जलजीवन मिशन संघटना स्थापण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला. तर संघटनेच्या अध्यक्षपदी मिलींद भोसले यांची निवड करण्यात आली.

२५ जिल्ह्यातील राज्य प्रतिनिधी सदर बैठकीस उपस्थित होते. स्वच्छता व जलजीवन मंत्री गुलाबराव पाटील यांच्याशी संघटनेचे अध्यक्ष श्री. भोसले यांनी संपर्क साधत जलजीवन मिशनच्या कंत्राटदाराची प्रलंबित देयके व इतर प्रश्न तातडीने सोडवण्याबाबत त्यांना विनंती केली. त्यांनी सदर विनंती मान्य केली आहे. यामुळे पुढील काळामध्ये देशाचे केंद्रीय जलजीवन मिशनचे मंत्री सी.आर. पाटील व गुलाबराव पाटील यांना महाराष्ट्र जलजीवन संघटना ही व्यवस्थित स्वरूपाचा प्रस्ताव दाखल करेल आणि येणाऱ्या काळामध्ये कंत्राटदारांची राज्यातील जवळपास १२ हजार कोटीचे देयके व अडचणी सोडवण्याबाबत तातडीने पावले उचलतील. बैठकीस महासचिव सुनील नागराळे, राजेश देशमुख, कांतीलाल डुबल, कैलास लांडे, नरेंद्र भोसले, प्रशांत कारंडे, सातारा अध्यक्ष सिकंदर डांगे. प्रशांत भोसले, संजय जाधव महेश घाडगे, सुभाष ओंबळे, अविनाश गाढवे, युवराज पवार, अविनाश माने, समाधान घोरपडे, मधुकर मोहिते, रमेश जाधव, विकास भोईटे, नागेश पवार तसेच सर्व जिल्ह्यातील प्रतिनिधी उपस्थित होते.

## पाच फुटी बालाजी मूर्तीचे दर्शन अवश्य घ्यावे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

येथील मूर्तिकार गणेश बडगु यांनी बालाजीची पाच फुटी मूर्ती प्रथम मातीतून बनवून त्याला प्लेवर्कमध्ये रूपांतरित केल्यानंतर डाय करून नंतर मूर्ती फायबरमध्ये तयार केली. त्यानंतर कलर दिला. ही तयार केलेले मूर्ती लक्ष्मी बँक साखर पेठ शाखेचे शेजारी असलेले सागर कोंडा या भक्ताकडे त्यांच्या कार्यालयात आहे. सागर हे तिरुपतीला जाणाऱ्या भक्तांचे अर्जित सेवा, स्पेशल दर्शन तिकिट, रूम बुकींग, तिरुपती येथे लग्न करण्यासाठी बुकिंग ऑनलाईन करून देतात. तसेच तिरूपतीमधील साइड सीन, लोकल टेम्पलचे दर्शन कार बुकिंग सुद्धा करून देतात. प्रत्येक नागरिक सागर कोंडा यांच्या ऑफिसमधील बालाजीचे दर्शन अवश्य घ्यावे.



# क्रीडा

## सोलापूरच्या डॉ. वाघचवरे भावंडांचा मॅरेथॉनमध्ये जागतिक विक्रम

### वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड्स या संस्थेत नोंद




**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

दक्षिण आफ्रिकेमध्ये ८ जून २०२५ रोजी झालेली ९० किलोमीटर कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धा येथील डॉ. वाघचवरे भावंडांनी वेळेत पूर्ण करून एक प्रकारचे जागतिक रेकॉर्ड प्रस्थापित केले आहे.

दक्षिण आफ्रिकेत डर्बन व पीटमॅरीसबर्ग या शहराच्या दरम्यान कॉम्रेड मॅरेथॉन १९२१ पासून भरवली जाते. या स्पर्धेला अल्टिमेट ह्यूमन रेस असे देखील संबोधले जाते. कारण ही स्पर्धा या दोन शहरांमधील असंख्य, अवघड अशा चढ-उतार असलेल्या टेकड्यांमधून, बारा तासांच्या आत, अतिशय प्रतिकूल वातावरणात पूर्ण करावी लागते.

वाघचवरे भावंडांनी म्हणजेच डॉ.स्मिता राहुल झांजुर्णे (डेंटिस्ट बहीण) डॉ. सत्यजित सत्यवान वाघचवरे (डेंटिस्ट भाऊ) व डॉ. अभिजीत सत्यवान वाघचवरे (ऑर्थोपेडिक सर्जन भाऊ ) या तिघा भारतीय भावंडांनी ही स्पर्धा पूर्ण केली. भाऊ-बहिणींनी मिळून ही स्पर्धा पूर्ण करण्याची जगातली ही पहिलीच वेळ होती. हे एक जागतिक रेकॉर्ड आहे. त्यांना याची मान्यता लंडन व दिल्ली स्थित ''वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड'' या संस्थेने दिली आहे. या संस्थेने वाघचवरे भावंडांना एप्रिसिएशन सर्टिफिकेटबरोबरच मेडल, ट्रॉफी, पर्सनलाईज्ड टी-शर्ट, विशेष शाई पेन व त्यांची मानाची कॅप दिली आहे.

कॉम्रेड मॅरेथॉनच्या इतिहासात १९२१ पासून यावर्षीच्या ९८ व्या स्पर्धेपर्यंत त्यांच्या नोंदीत असे रेकॉर्ड नाही, असा खुलासा कॉम्रेड मॅरेथॉन असोसिएशनचे आय.टी. मॅनेजर जेराड विल्यम्स यांनी डॉ. वाघचवरे यांना ईमेलद्वारे केला आहे. अशा प्रकारच्या जागतिक रेकॉर्डमुळे मॅरेथॉन जगतात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. डॉ. वाघचवरे भावंडांच्या या संपूर्ण मॅरेथॉनच्या प्रवासात आई-वडिलांच्या आशीर्वादाबरोबरच त्यांच्या सहचारिणी डॉ.शुभांगी व डॉ. राजश्री यांचे सहकार्य लाभते. वाघचवरे बंधूंना कोचिंग मुंबईचे मॅरेथॉनपटू सतीश गुजारन, ज्यांनी १४ वेळा ही कॉम्रेड मॅरेथॉन पूर्ण केली आहे यांचे लाभले, तर डॉ. स्मिता राहुल झांजुर्णे यांना पुण्याचे योगेश सानप यांचे कोचिंग लाभले. डॉ वाघचवरे भावंडांनी त्यांना मिळालेले हे यश त्यांनी पहलगाम हल्ल्यात मध्ये मृत्युमुखी पडलेल्या भारतीय नागरिकांना समर्पित केले व डर्बन शहराच्या मुख्य चौकात भारतीय सेनेचा अभिमान असलेला मिशन सिंदूर चा फलक झळकावून देशाभिमान जागविला.



## रामवाडीत आज जिल्हा अजिंक्यपद कबड्डी स्पर्धा

### इच्छा भगवंताची बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कबड्डी स्पर्धा रामवाडी शासकीय गोदामच्या जवळ व गंगामाई हॉस्पिटलच्या शेजारी जांबवीर तरुण मंडळ क्रीडांगणावर २१ ते २५ जुलै दरम्यान आयोजित केली आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त इच्छा भगवंताची सामाजिक बहुउद्देशीय संस्था व माजी नगरसेवक किसन भाऊ जाधव व नागेश (अण्णा) गायकवाड मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचे हस्ते याचे उद्घाटन २१ जुलै रोदजी दुपारी दोन वाजता होईल. वजन व कागदपत्र छाननी २१ जुलै रोजी सकाळी नऊ वाजल्यापासून सुरू होणार आहे तरी सर्व संघाने वेळेवर उपस्थित रहावे. या स्पर्धे करिता प्रवेश फी संघाची संलग्नता फी प्रवेश शुल्क भरणे अत्यावश्यक आहे. पुरुष गटासाठी वजन ८५ व महिलासाठी ७५ किलो तर किशोर मुले वजन ५५ किलो व किशोरी मुली वजन ५५ किलो राहील. किशोर गटासाठी जन्मतारीख १ जानेवारी २०१०च्या नंतर जन्मलेले खेळाडू पात्र आहेत. इच्छुक संघानी संतोष जाधव ९८५०४३०३४३ अथवा मदन गायकवाड ७९७२००७९८६ यांच्याशी संपर्क साधावा.

## एमसीए अ संघ विजयी, दुसरा सामना अनिर्णित

### २३ वर्षाखालील राज्य संघ निवड चाचणी क्रिकेट
### सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीचे धमाकेदार अर्धशतक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या २३ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत एमसीए अ संघाने ब संघावर विजय मिळविला. दुसरा सामना क विरुद्ध ड हा सामना अनिर्णीत राहिला. सोलापूर जिल्हा क्रिकेट संघटनेच्या सौजन्याने येथील इंदिरा गांधी पार्क स्टेडियम आणि दयानंद कॉलेज मैदानावर ३ दिवसीय क्रिकेट सामन्यांची पहिली फेरी पार पडली. तिसऱ्या दिवशी सोलापूरच्या अर्शिन कुलकर्णीचे धमाकेदार अर्धशतक तर दयानंद कॉलेजच्या मैदानावर अभिनव तिवारीचे दमदार शतक पहायला मिळाले, ए संघाने लंच पूर्वीच विजय मिळवला तो अर्शिन चे फलंदाजीने. पहिल्या डावातील शतकवीर यश २१ धावा असताना जायबंदी झाल्यानंतर विजयासाठीच्या उर्वरित १३० धावा करताना ३ बाद ५० नंतर कर्णधार अभिषेक पवार ने अर्शिन कुलकर्णी सोबत १०३ धावांची भागीदारी रचत संघाला विजय मिळवून दिला. दुसरीकडे दयानंद कॉलेजच्या मैदानावर अभिनव तिवारीच्या शतकामुळे सामना अनिर्णित अवस्थेत संपला. एमसीए डी संघाने सी संघाच्या ४१० धावांना प्रत्युत्तर देताना दुसऱ्या डावात ३५७ धावा केल्या. कालच्या १ बाद ६० वरून पुढे खेळताना ५ बाद ९६ अशी अवस्था असताना अभिनव तिवारी ने निखिल लुनावत (६५) ९८ धावांची तर रवींद्र मटचा सोबत ११३ धावांची भागीदारी केली. सामन्यात पंच म्हणून नंदकुमार टेळे नवीन माने चिराग शहा पृथ्वीराज गांगजी यांनी तर गुणलेखक म्हणून नागप्पा सुरेगीहळ्ळी गेणबा सुरवसे यांनी काम पाहिले. सोमवार २१ जुलै रोजी विश्रांतीचा दिवस असून २२ पासून दुसऱ्या फेरीचे सामने होतील.



**संक्षिप्त धावफलक :**

**इंदिरा गांधी पार्क स्टेडियम**
एमसीए बी (१) : १०८/१० (३८.१)
एमसीए ए (१) : २१७/१० (६२.५)
एमसीए बी (२) : २५९/१० (५१.३)
एमसीए ए (२) : १५३/३ (३४.३)
अर्शीन कुलकर्णी नाबाद ७९, अभिषेक पवार नाबाद २८, नीरज जोशी अभिजीत नागरगोजे प्रत्येकी १५, श्रेयस चव्हाण ४०/२ बळी, योगेश चव्हाण १ बळी.

**दयानंद कॉलेज ग्राउंड**
एमसीए डी : १९६/१० (५४.३)
एमसीए सी (१): ४१०/९ घोषित (८६)
एमसीए डी (२): ३५७/१० (८४.४)
क्रिश शहापूरकर ३७, देवराज बेद्रे ३३, ओम भाभड २३, निखिल लुनावत ६५, अभिनव तिवारी १०४, रवींद्र मटचा ५१, रोशन वाघसारे ५१/३ बळी, सारीश देसाई १२/३ बळी, स्वराज चव्हाण यश जगदाळे अथर्व डाकवे प्रत्येकी १ बळी.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### श्रीशंकरने जिंकला लांब उडीचा किताब



**नवी दिल्ली :** स्टार भारतीय लांब उडी खेळाडू मुरली श्रीशंकरने पोर्तुगालमधील माईया येथे झालेल्या जागतिक अॅथ्लेटिक्स कॉन्टिनेंटल टूर कांस्यस्तरीय स्पर्धेत ७.७५ मीटर उडी मारून विजेतेपद पटकावले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील रौप्यपदक श्रीशंकरने दुसऱ्या फेरीत आपला सर्वोत्तम प्रयत्न नोंदवला. श्रीशंकरने ७.६३ मीटर उडी मारून सुरुवात केली, त्यानंतर दुसऱ्या फेरीत ७.७५ मीटरची विजयी उडी मारली आणि नंतर ७.६९ मीटरची भरीव उडी मारली. त्याचा तिसरा प्रयत्न फाऊल ठरला, तर त्याच्या शेवटच्या दोन उड्या ६.१२ मीटर आणि ७.५८ मीटर मोजल्या गेल्या. पोलंडच्या पिओटर टार्कोव्स्कीने श्रीशंकरच्या ७.७५ मीटर प्रयत्नांशी बरोबरी केली, परंतु त्याची दुसरी सर्वोत्तम उडी- ७.५८ मीटर - भारतीयाच्या ७.६९ मीटरपेक्षा कमी होती. जागतिक अॅथ्लेटिक्सच्या नियमांनुसार जर दोन स्पर्धक बरोबरीत आले, तर त्यांची दुसरी सर्वात लांब कायदेशीर उडी टायब्रेकर म्हणून वापरली जाते. गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर दुखापतीतून परतल्यानंतर २६ वर्षीय श्रीशंकरची ही दुसरी स्पर्धा आहे. या महिन्याच्या सुरुवातीला इंडियन ओपन अॅथ्लेटिक्स मीटमध्ये त्याने ८.०५ मीटरच्या विजयासह पुनरागमनाची घोषणा केली होती. श्रीशंकर सप्टेंबरमध्ये टोकियो येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी पात्र ठरण्याचे लक्ष्य ठेवेल, ज्यासाठी थेट पात्रता अंतर ८.२७ मीटर आहे. ■

# आकाश दीप, अर्शदीपच्या जागी अंशुलची निवड

◆ **मॅन्चेस्टर, २० जुलै**

आगामी २३ जुलैपासून ओल्ड ट्रॅफर्ड येथे सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यासाठी वेळेशी झुंजणाऱ्या आकाश दीप व अर्शदीप सिंग यांच्या जागी वेगवान गोलंदाज अंशुल कंबोजची इंग्लंडमधील भारतीय संघात निवड करण्यात आली आहे.

मांडीच्या दुखापतीचा सामना करणारा आकाश दीप इंग्लंडविरुद्ध बर्मिंगम व लॉर्ड्स येथे अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या कसोटी सामन्यात खेळला होता, तर डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप अद्याप सुरु असलेल्या मालिकेत एकाही सामन्यात खेळलेला नाही.

आकाश दीपच्या उपलब्धतेबाबत अद्याप कोणतीही स्पष्टता नाही, तर अर्शदीप मॅन्चेस्टर कसोटीसाठी निवडीसाठी उपलब्ध असण्याची शक्यता कमी आहे आणि म्हणूनच निवडकर्त्यांनी कंबोजला बोलावण्याचा निर्णय घेतला आहे.

गुरुवारी बेकेनहॅम येथे नेट सराव सत्रादरम्यान फॉलोथ्रू दरम्यान साई सुदर्शनचा फटका रोखण्याचा प्रयत्न करताना अर्शदीपच्या डाव्या हाताला दुखापत झाली, त्यामुळे त्याच्या गोलंदाजीच्या हाताला मलमपट्टी करणे आवश्यक होते.



अंशुल कंबोज

आम्ही खेळत असलेल्या संयोजनावर निर्णय घेऊ, विशेषतः अर्शदीपची परिस्थिती पाहता, आम्ही तो निर्णय मॅन्चेस्टरमधील सामन्यापूर्वी घेऊ, असे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेट म्हणाले होते.

त्याला गोलंदाजी करताना चेंडू लागला. तो केवळ एक कट आहे, त्यामुळे कट किती वाईट आहे ते आपल्याला पहावे लागेल. त्याला डॉक्टरकडे नेले आहे आणि अर्थातच त्याला टाके हवे आहेत की नाहीत हे आमच्या नियोजनासाठी महत्त्वाचे ठरणार आहे, असे त्यांनी सांगितले.

कसोटी मालिकेपूर्वी इंग्लंड लायन्सविरुद्धच्या दोन सामन्यांमध्ये भारत अ संघाकडून प्रभावी कामगिरी केल्यानंतर २४ वर्षीय कंबोज संघात एक योग्य भर आहे. त्याने नॉर्दम्पटन व कॅन्टरबरी येथे चार डावांमध्ये पाच बळी घेतले.

हरयाणाचा हा वेगवान गोलंदाज हिट द डेक सीम गोलंदाज आहे आणि मुकेश कुमार आधीच ३० च्या चुकीच्या बाजूने आहे तर हर्षित राणाला रेड बॉल क्रिकेटमध्ये अद्याप त्याची प्रगती सापडलेली नाही म्हणून त्याच्याकडे भविष्यातील संभाव्य खेळाडू म्हणून पाहिले जात आहे.

गत वर्षी लाहली येथे झालेल्या रणजी करंडक सामन्यात केरळविरुद्ध एका डावात सर्व १० बळी घेत कंबोज प्रसिद्धीच्या झोतात आला. बंगालचा प्रेमांग्सु चॅटर्जी (१९५६-५७) आणि राजस्थानचा प्रदीप सोमसुंदरम (१९८५-८६) यांच्यानंतर रणजी करंडकांत ही कामगिरी करणारा तो तिसरा गोलंदाज आहे. एकूणच, त्याने देशांतर्गत स्पर्धेच्या गेल्या आवृत्तीत सहा सामन्यांमध्ये ३४ बळी घेतले. ◀(वृत्तसंस्था)

# सचिनसोबत नाव बघून ओशाळलो : अॅण्डरसन

◆ **लंडन, २० जुलै**

चषकावर सचिन तेंडुलकरसोबत माझे नाव बघताच मी ओशाळलो. मी त्याला लहानपणी पाहिले होते, त्याच्याविरुद्ध खेळलो होतो. तो इतका प्रतिष्ठित क्रिकेटपटू आहे की त्याने आपल्या संपूर्ण कारकिर्दीत देशाचे ओझे आपल्या खांद्यावर घेतले व यशस्वीपणे पार पडले. म्हणून, आतापर्यंतच्या महान क्रिकेटपटूंपैकी एक असलेल्या तेंडुलकरशी नाव जोडले जाणे हा एक अविश्वसनीय सन्मान आहे, अशा भावना इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जेम्स अॅण्डरसन याने व्यक्त केल्या.



इंग्लंड व वेल्स क्रिकेट मंडळाने (ईसीबी) भारत व इंग्लंडमधील कसोटी मालिकेचे नाव अॅण्डरसन-तेंडुलकर ट्रॉफी असे ठेवले आहे, त्यामुळे क्रिकेटमधील दोन दिग्गजांना हा सन्मान आहे. पूर्वी, इंग्लंडच्या भूमीवरील स्पर्धा पतौडी ट्रॉफीसाठी खेळल्या जात होत्या, ज्याचे नाव माजी भारतीय कर्णधार इफ्तिखार अली खान पतौडी आणि त्यांचा मुलगा मन्सूर अली खान पतौडी यांच्या नावावर होते.

तुमच्या नावावर ट्रॉफी असणे हे केवळ किती मोठे आहे हे आवश्यक नाही, तर सचिन तेंडुलकरसोबत माझे नाव असणे अवघडल्यासारखे वाटते. तेंडुलकर माझ्यासाठी आतापर्यंतच्या महान क्रिकेटपटूंपैकी एक आहे. मी त्याचा खूप आदर करतो, असे तो म्हणाला.

अॅण्डरसन व तेंडुलकर या दोघांनाही सर्वकालीन महान खेळाडू म्हणून ओळखले जाते. ते कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक सामने खेळणारे खेळाडू आहेत. तेंडुलकरने २०० सामने खेळले आणि अॅण्डरसन १८८ कसोटी सामन्यात खेळला. १८८ कसोटी सामन्यांमध्ये ७०४ बळी घेणारा अॅण्डरसन २००० च्या दशकाच्या उत्तरार्धात अनेक वेळा तेंडुलकरचा सामना केला.

तेंडुलकरने निर्माण केलेल्या वारशातून मला कधीकधी खूप अलिप्त वाटते. जेव्हा लोक क्रिकेटमध्ये मी काय साध्य केले आहे याबद्दल बोलतात व मी ऐकतो तेव्हा जणू कोणीतरी दुसऱ्याबद्दल बोलत आहे असे मला वाटते. हे सर्व मीच साध्य केले आहे असे मला वाटत नाही, असे ४२ वर्षीय अॅण्डरसन म्हणाला.

अॅण्डरसनने गत वर्षी आपल्या गौरवशाली कारकिर्दीची सांगता केली व इंग्लंडच्या पुढील पिढीच्या वेगवान गोलंदाजांसाठी मार्ग मोकळा केला.

इंग्लंड सध्या अॅण्डरसन-तेंडुलकर चषक मालिकेत २-१ असा आघाडीवर आहे आणि बुधवारपासून मॅन्चेस्टर येथे चौथा कसोटी सामना सुरू होणार आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारताचा हाँगकाँगवर विजय

◆ **सोलो (इंडोनेशिया), २० जुलै**

भारताने रविवारी येथे झालेल्या आशिया कनिष्ठ पुरुष मिश्र सांघिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत हाँगकाँग चीनचा ११०-१०० असा पराभव करत गट ड मध्ये अव्वल स्थान पटकावले. भारत आणि हाँगकाँग दोघांनीही आमनेसामने येण्यापूर्वीच बाद फेरीत आपले स्थान निश्चित केले होते. ऋजुला रामूने पुन्हा एकदा आयपी सुम याऊचा ११-८ असा पराभव करून भारताला विजयी सुरुवात करून दिली. भार्गव राम अरिगेला-विश्व तेज गोब्बुरू या जोडीने चेउंग साई शिंग आणि डेंग ची फाई यांच्याविरुद्ध २२-१३ अशी आघाडी वाढवली. ■

# ओलेक्झांडर उसिक दुसऱ्यांदा हेवीवेट विश्वविजेता



डॅनियल डुबॉइसला ठोसा मारताना ओलेक्झांडर उसिक

◆ **लंडन, २० जुलै**

वेम्बली स्टेडियमवर पाचव्या फेरीत डॅनियल डुबॉइसच्या जबड्याला डाव्या हुकने मारून ओलेक्झांडर उसिक दुसऱ्यांदा निर्विवाद जागतिक हेवीवेट विजेता झाला.

या विजयाबरोबरच उसिकने आपले हेवीवेट विश्वविजेतेपद कायम राखले आणि एक वर्षापूर्वी त्याने सोडलेला मानाचा पट्टा पुन्हा मिळवला. पॉवर पंचर म्हणून नव्हे तर हुशार युक्तीकार म्हणून ओळखला जाणारा उसिक आता मुष्टियुद्धाच्या सर्वकालीन महान खेळाडूंपैकी एक होण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

आता आपला थांबण्याचा कोणताही विचार नाही. मी अजूनही तरुण माणूस आहे. मी मुष्टियुद्ध सुरू ठेवेन, सराव सुरू ठेवेन, पण माझा पुढचा प्रतिस्पर्धी कोण असेल, हेआता सांगू शकत नाही, असे युक्रेनचा ३९ वर्षीय उसिकने पत्रकार परिषदेत सांगितले. त्याने टायसन फ्युरी, डेरेक चिसोरा, अॅन्थनी जोशुआ आणि जोसेफ पार्कर यांना संभाव्य पुढील शत्रू म्हणून नाव दिले आहे. जेक पॉलने रिंगमध्ये स्वतःची टोपी टाकली.

मी साडेतीन महिने तयारी केली, या काळात मी माझ्या कुटुंबाला, माझ्या पत्नीला पाहिले नाही. दररोज मी माझ्या संघासोबत राहतो. आता मला घरी परत जायचे आहे, - एकाच घरात १४ लोक आहेत, असेही त्याने सांगितले.

उसिकने पाचव्या फेरीत दोनदा डुबॉइसला बाद केले. दुसऱ्यांदा डुबॉइसने उजव्या बाजूने ठोसा चुकवल्यानंतर त्याला डाव्या हुकने मार बसला. लंडनचा हा रहिवासी डुबॉइस स्तब्ध जाला. ही लढत बघण्यासाठी वेम्बली येथे ९० हजार प्रेक्षक उपस्थित होते. ◀(वृत्तसंस्था)

# २०३१ पर्यंत इंग्लंडमध्येच डब्ल्यूटीसी अंतिम सामना

### आयसीसीची पुष्टी

◆ **सिंगापूर, २० जुलै**

जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेचा अंतिम सामना २०१३ पर्यंत भारतात होणार नाही, तर हा डब्ल्यूटीसी अंतिम सामना २०३१ पर्यंत इंग्लंडमध्येच राहणार असल्याचे निश्चित केले, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने रविवारी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले. इंग्लंड व वेल्स क्रिकेट मंडख स्थापनेपासून आयोजित केलेला ही स्पर्धा पुढील तीन आवृत्त्यांसाठी सुरू राहणार आहे.

स्पर्धेच्या गत तीन आवृत्त्यांमधील ईसीबीची सामन्यांचे आयोजन करण्याची कार्यप्रणाली लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे, आयसीसीने म्हटले आहे. जागतिक कसोटी अजिंक्यपदाचे अंतिम सामने इंग्लंडमधील तीन ठिकाणी आयोजित करण्यात आले आहे, यात साऊदम्प्टन (२०२१), द ओव्हल (२०२३) आणि २०२५ मध्ये लॉर्ड्स क्रिकेट मैदानांचा समावेश आहे.

अलीकडील अंतिम सामन्यांचे आयोजन करण्याच्या यशस्वी कामगिरीनंतर आयसीसीने २०२७, २०२९ आणि २०३१ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद अंतिम सामन्यांचे यजमानपद इंग्लंड व वेल्स क्रिकेट मंडळाला देण्यासही मान्यता दिली, असे आयसीसीने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

बीसीसीआय डब्ल्यूटीसीच्या अंतिम सामन्याचे आयोजन करण्यास उत्सुक होता, परंतु नजीकच्या भविष्यात ते अशक्य दिसते. ◀(वृत्तसंस्था)

# निशांत देवचा इव्हान्सवर विजय



इव्हान्सला ठोसा मारताना निशांत देव

**नवी दिल्ली, २० जुलै**

भारतीय मुष्टियोद्धा निशांत देवने फ्रिस्को, अमेरिकेत अमेरिकन लाक्वान इव्हान्सवर तांत्रिक नॉकआउट विजय मिळवत व्यावसायिक मुष्टियुद्ध क्षेत्रात आपली निर्दोष कामगिरी वाढवली. २४ वर्षीय निशांतने सुपर वेल्टरवेट लढतीच्या सहाव्या फेरीत अधिक अनुभवी इव्हान्सला रोखले आणि आपला सलग तिसरा व्यावसायिक विजय नोंदवला.

देवने अनुत्तरीत ठोसा मारल्यामुळे इव्हान्स बचावला नाही, त्यामुळे पंचांनी सहाव्या व शेवटच्या फेरीत स्पर्धा थांबवली.

ही लढत डब्ल्यूबीसी चॅम्पियन जेसी रॉड्रिग्ज व डब्ल्यूबीओ विजेता फुमेलेला काफू यांच्यातील एकीकरणाचा भाग होती. जानेवारी आणि जूनमध्ये अनुक्रमे अमेरिकेच्या अल्टोन विगिन्स आणि मेक्सिकोच्या जोसु सिल्वाविरुद्ध निशांत देवने केलेल्या याआधीच्या दोन नॉकआउट विजयांवर आधारित आहे.

२०२३ च्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत लाईट मिडलवेट (७१ किलो) विभागात कांस्यपदक विजेता निशांत देव या वर्षाच्या सुरुवातीला २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिक पात्रता फेरीत मेक्सिकोच्या मार्को व्हर्डेकडून झालेल्या उपांत्यपूर्व फेरीत पराभवानंतर व्यावसायिक झाला. माजी व्यावसायिक रोनाल्ड सिम्स यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेत असलेला देव प्रसिद्ध प्रवर्तक एडी हर्न आणि मॅचरूम बॉक्सिंगसोबत करारबद्ध आहे. ◀(वृत्तसंस्था)

### नेपाळ, भूतान, अमेरिकेला आयसीसीचा सर्वोच्च सन्मान

**सिंगापूर :** २०२४ च्या आयसीसी विकास पुरस्कारांमध्ये जागतिक सन्मान मिळवणाऱ्या आठ देशांमध्ये दक्षिण आशियाई शेजारी नेपाळ आणि भूतान यांचा समावेश आहे, असे क्रिकेटच्या पालक संस्थेने रविवारी येथे झालेल्या आयसीसीच्या वार्षिक बोर्ड बैठकीच्या वेळी सांगितले. गत कॅलेंडर वर्षात अमेरिका क्रिकेटला त्यांच्या यशासाठी आयसीसी असोसिएट मेंबर मेन्स टीम परफॉर्मन्स ऑफ द इयर पुरस्कार मिळाला, ज्यामध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडीजने आयोजित केलेल्या टी-२० विश्वचषकाच्या सुपर एटसाठी पात्रता मिळवणे समाविष्ट होते. कॅनडाविरुद्धच्या विजयामुळे आणि पाकिस्तानविरुद्धच्या ऐतिहासिक विजयामुळे त्यांनी बाबर आझमच्या नेतृत्वाखालील संघाला स्पर्धेतून बाहेर काढले, ज्यामुळे ही स्पर्धा मुख्य प्रवाहातील अमेरिकन टेलिव्हिजन आणि बातम्यांमध्ये आघाडीवर आली. अमेरिका, भूतान आणि नेपाळशिवाय पुरस्कार मिळवणाऱ्या इतर पाच देशांमध्ये इंडोनेशिया, नामिबिया, स्कॉटलंड, टांझानिया आणि वानुआतु यांचा समावेश होता. पुरस्कारांसाठी १५ असोसिएट सदस्य देशांची निवड करण्यात आली होती. क्रिकेट नामिबियाने आपल्या अॅशबर्टन क्वाटा मिनी-क्रिकेट स्पर्धेसाठी आयसीसी डेव्हलपमेंट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर पुरस्कार जिंकला आहे. हा देशाचा प्रमुख तळागाळातील विकास उपक्रम आहे. पहिल्यांदाच, आयसीसी महिला क्रिकेट इनिशिएटिव्ह ऑफ द इयर पुरस्कार दोन सदस्यांना देण्यात येणार असून याकरिता भूतान क्रिकेट कौन्सिल बोर्ड आणि वानुआतु क्रिकेट असोसिएशनची निवड करण्यात आली. नेपाळ क्रिकेट असोसिएशनला आयसीसी डिजिटल फॅन एंगेजमेंट ऑफ द इयर पुरस्कार मिळाला आहे. आयसीसी विकास पुरस्काराच्या जागतिक विजेत्यांची घोषणा करताना आनंद होत आहे. हा जागतिक उत्सव आहे, सर्व विजेते उदयोन्मुख देशांमध्ये खेळ वाढवण्याच्या आपल्या मोहिमेत मिळालेल्या कौतुकास पात्र आहेत, असे आयसीसीचे अध्यक्ष जय शाह म्हणाले. ■

# भारत, पाकिस्तान सामना रद्द

**पहलगाम घटनेचे पडसाद**

### भारतीय खेळाडूंचा विश्वचषक लेजेंड्स सामन्यावर बहिष्कार

◆ **बर्मिंगम, २० जुलै**

एप्रिलमध्ये झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पृष्ठभूमीवर शिखर धवनसह भारतीय खेळाडूंनी रविवारी पाकिस्तानविरुद्धच्या विश्वचषक लिजेंड सामन्यावर बहिष्कार टाकला, परिणामी आयोजकांना अखेर दिग्गज खेळाडूंचा समावेश असलेला भारत-वपाकिस्तान क्रिकेट सामना रद्द करावा लागला आहे.

अभिनेता अजय देवगणच्या सह-मालकीच्या इंग्लंड व वेल्स क्रिकेट मंडळबोर्ड () स्पर्धेचा दुसरा हंगाम १८ जून रोजी येथील एजबॅस्टन येथे सुरू झाला आणि २ ऑगस्ट रोजी अंतिम सामना होणार आहे.

विश्वचषक विजेता युवराज सिंग इंडिया चॅम्पियन्सचा कर्णधार आहे, तर संघात धवन, हरभजन सिंग, युसूफ पठाण, इरफान पठाण, सुरेश रैना, रॉबिन उथप्पा आणि वरुण आरोन यांच्यासारखे खेळाडू आहेत.



या वर्षी पाकिस्तान हॉकी संघ भारतात येणार असल्याची बातमी ऐकल्यानंतर आणि अलिकडेच झालेला भारत विरुद्ध पाकिस्तान व्हॉलीबॉल सामना आणि दोन्ही देशांमधील विविध खेळांमधील काही इतर सामने पाहिल्यानंतर, जगभरातील लोकांसाठी काही आनंदी आठवणी निर्माण करण्यासाठी आम्ही मध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामना सुरू ठेवण्याचा विचार केला, पण कदाचित या प्रक्रियेत, आम्ही अनेकांच्या भावना दुखावल्या, असे आयोजकांनी म्हटले आहे.

पाकिस्तान संघात कर्णधार शाहिद आफ्रिदी, युनूस खान, सोहेल तन्वीर, वहाब रियाझ, कामरान अकमल यांच्यासह अनेक जुने खेळाडू आहेत.

भारतीय दिग्गजांनी अस्वस्थता निर्माण केल्याबद्दल आयोजकांनी माफी देखील मागितली. म्हणूनच, आम्ही भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, असे आयोजकांनी म्हटले आहे.

पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात सहभागी न होण्याची आमची भूमिका जाहीर केली आहे, असे भारताचा माजी सलामीवीर धवनने म्हटले आहे. शिखर धवनने आगामी विश्वचषक लीजेंड्समध्ये पाकिस्तान संघाविरुद्धच्या कोणत्याही सामन्यात सहभागी होणार नाहीत हे आधीच ११ मे २०२५ रोजी कळविले होते. ◀(वृत्तसंस्था)

# वरिष्ठ महिलांच्या राष्ट्रीय शिबिरासाठी ४० हॉकीपटूंची कोअर ग्रुपमध्ये निवड

◆ **बंगळुरू, २० जुलै**

हॉकी इंडियाने शनिवारी आगामी वरिष्ठ महिलांच्या राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरासाठी ४० सदस्यीय संभाव्य कोअर ग्रुपची घोषणा केली आहे. हे शिबिर २१ जुलै ते २९ ऑगस्ट दरम्यान येथील स्पोर्ट्स अॅथॉरिटी ऑफ इंडिया (साई) केंद्रामध्ये आयोजित केले जाईल.

भारतीय महिला हॉकी संघ ५ सप्टेंबर रोजी चीनमधील हॅण्गझोऊ येथे सुरू होणाऱ्या महिला आशिया चषकासाठी सज्ज होत असल्याने या शिबिराचे महत्त्व आहे. ही स्पर्धा २०२६ च्या एफआयएच महिला विश्वचषकासाठी थेट पात्रता मार्ग म्हणून काम करेल, यात केवळ विजेत्यालाच निश्चित स्थान मिळेल. गत शिबिरातील सर्व खेळाडूंना कायम ठेवण्यात आले आहे व ते शिबिरात अंतर्गत स्थिरता व दीर्घकालीन विकासावर सतत भर देत आहे. आम्ही खेळाडूंच्या मानसिक आणि शारीरिक क्षमतेवर विशेष लक्ष केंद्रित करत आहोत, असे भारतीय महिला हॉकी संघाचे मुख्य प्रशिक्षक हरेंद्र सिंग यांनी म्हटले आहे.

गोलरक्षणात अनुभवी दिग्गज सविता, बिचू देवी खरीबम, बन्सरी सोलंकी व माधुरी किंडो, तसेच आसामची समिक्षा सक्सेना यांचा समावेश आहे. बचाव फळीमध्ये निक्की प्रधान, सुशीला चानू पुक्रंबम, उदिता व महिमा चौधरी यांसारख्या अनुभवी खेळाडूंचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

# फ्रान्सला नमवून जर्मनी उपांत्य फेरीत



बासेलमधील सेंट जेकोब-पार्क येथे फ्रान्स आणि जर्मनी यांच्यातील महिला युरो २०२५ च्या उपांत्यपूर्व सामन्यादरम्यान बचाव करताना जर्मनीची गोलरक्षक अॅन-कॅट्रिन बर्गर

### युरो चषक महिला फुटबॉल

◆ **बासेल, २० जुलै**

युरो चषक महिला फुटबॉल स्पर्धेत जर्मनी आणि फ्रान्स यांच्यादरम्यानचा उपांत्यपूर्व सामना निर्धारित वेळ व अतिरिक्त वेळेतही बरोबरीत सुटल्यानंतर पेनॉल्टी शूट-आऊटमध्ये जर्मनीने फ्रान्सवर मात केली आणि स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला.

नाट्यमय सामना १-१ असा बरोबरीत राहिला, त्यानंतर जर्मनीने शूट-आऊटमध्ये ६-५ असा विजय मिळवला. अँन-कॅट्रिन बर्गरने दोन गोलचा बचाव केला व स्वतःचा स्पॉट किकही टाकला.

विक्रमी नवव्या युरोपियन चॅम्पियनशिप जेतेपदासाठी उत्सुक असलेल्या जर्मनीचा सामना बुधवारी झुरिचमध्ये विश्वचषक विजेत्या स्पेनशी होईल.

या विजयाबरोबरच जर्मनीच्या खेळाडूंच्या डोळ्यातून आनंदाश्रू तराळले. प्रत्येकजण आनंद साजरा करत होता.

कठोर कामगिरीमुळे आम्हाला विजय मिळाला याबद्दल सर्वांना आनंद झाला, असे जर्मनीचे प्रशिक्षक ख्रिश्चन वुक म्हणाले. प्रतिस्पर्धी संघाचे ज्या पद्धतीने आव्हान स्वीकारले, ते अविश्वसनीय होते, त्याबद्दल मला माझ्या जर्मनी संघाचा अभिमान आहे, असेही ते म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)


# इंटर मियामीचा रेड बुल्सवर ५-१ ने विजय

### मेस्सी, टेलास्कोचे प्रत्येकी २ गोल

◆ **हॅरिसन, २० जुलै**

मेजर लीग फुटबॉल स्पर्धेत खेळल्या गेलेल्या सामन्यात लियोनेल मेस्सीने दोन गोल व दोन सहाय्य केले व टेलास्को सेगोव्हियानेही दोन गोल केले. मेस्सी व टेलास्कोच्या दमदार कामगिरीच्या बळावर इंटर मियामीने न्यू यॉर्क रेड बुल्सवर ५-१ अशा गोलफरकाने दणदणीत विजय नोंदविला.

गत सात सामन्यांतील मेस्सीचा हा सहावा बहु-गोल सामना होता. मेस्सी मेजर लीग फुटबॉलच्या इतिहासात दोन वर्षांच्या कालावधीत किमान ३५ गोल आणि २५ सहाय्य नोंदवणारा पाचवा खेळाडू ठरला. अशी कामगिरी करणाऱ्या दिग्गज- रॉबी कीन (२०१३-१४), सेबास्टियन जिओविन्को (२०१५-१६), कार्लोस वेला (२०१८-१९) आणि कुचो हर्नांडिझ (२०२३-२४) यांच्या यादीत मेस्सीने स्थान मिळविले.



एमएलएस फुटबॉल सामन्याच्या उत्तरार्धात इंटर मियामीच्या लियोनेल मेस्सी (१०) सोबत चेंडूसाठी झुंजताना न्यू यॉर्क रेड बुल्स पीटर स्ट्राऊड (८)

मियामीने पूर्वार्धाच्या मध्यात तीन मिनिटांत दोन गोल करून आघाडी घेतली. २४ व्या मिनिटाला मेस्सीने जॉर्डी अल्बाने दिलेल्या सुंदर पासवर सामन्यात १-१ अशी बरोबरी मिळवून दिली. त्यानंतर मेस्सीच्या बचावफळीवरून उंचावलेल्या पासमुळे सेगोव्हियाचा पहिला गोल झाला. मेस्सीने ६० व्या मिनिटाला ब्रेकअवेवर गोल केला आणि ७५ व्या मिनिटाला डाव्या पायाने केलेल्या धमाकेदार पासला त्याने छाती झेलले व हंगामातील आपला १८ वा गोल ठरला. इंटर मियामीने रेड बुल्ससोबतच्या गत तीन सामन्यांमध्ये वर्चस्व गाजवले आहे.

न्यू यॉर्कला या हंगामात घरच्या मैदानावर दुसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला. या हंगामात रेड बुल्सने ११ घरच्या सामन्यांमध्ये २६ गुण मिळवून फ्रॅन्चायझी इतिहासात दुसऱ्या क्रमांकावर होते. या हंगामात न्यू यॉर्कने दिलेले हे सर्वाधिक गोल होते. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...




### डॉ. शालिनी कुलकर्णी यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान

**सांगोला, दि. २० जुलै-**

सांगोल्यातील माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान या संस्थेच्या कोषाध्यक्ष डॉ. शालिनी कुलकर्णी यांना शैक्षणिक सेवेतील योगदानाबद्दल शहरातील सूर्योदय परिवाराने प्रसिद्ध हास्यसम्राट अशोक देशमुख यांच्या उपस्थितीत जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित केले. डॉ. कुलकर्णी यांनी विद्या प्रतिष्ठान विद्यानगरी, बारामती येथील बी.एड. कॉलेजमध्ये अध्यापनाचे तसेच नारायणगाव येथील बी.एड. कॉलेज व सांगोला येथील म. फुले शिक्षण शास्त्र महाविद्यालयात प्राचार्य म्हणून व ८ विद्यार्थ्यांना पी.एच.डी.साठी गाईड म्हणून काम केले आहे. सध्या पत्राद्वारे दासबोध उपक्रमात समीक्षक म्हणून सेवा सुरू आहे.



### दोन तासांत लाखांची रोकड असलेली बॅग केली हस्तगत

**वैराग, दि. २० जुलै-**

वैराग पोलिसांनी काल रात्री हरवलेल्या सुमारे एक लाख रुपये रोख रकमेची बॅग आणि दुकानाच्या चाव्या अवघ्या दोन तासांत शोधून काढून, नागरिकांकडून कौतुकाची थाप मिळवली आहे. वैराग येथील मोहोळ चौकातील व्यावसायिक निरंजन नवीनचंद गांधी यांना ही बॅग परत मिळाली असून, वैराग पोलिसांच्या जलद आणि कार्यक्षमतेचे हे उत्तम उदाहरण आहे. दि. १९ जुलै रोजी रात्री अकराच्या सुमारास निरंजन गांधी त्यांचे सिमेंटचे दुकान बंद करून, दुकानातील एक लाख रुपये रोख रक्कम असलेली बॅग आणि दुकानाच्या चाव्या घेऊन त्यांचे मित्र अमोल कासार, अमजद शेख आणि अरुण साखरे यांच्यासोबत त्यांच्या जनावरांच्या गोठ्यात चारा-पाण्याची सोय करण्यासाठी बसले होते. त्यावेळी, दुकानातील जमा झालेली रोख रक्कम असलेली बॅग त्यांच्याजवळच होती. मात्र, तिथून निघताना ते ती बॅग तिथेच विसरून गेले. दि. २० जुलै रोजी सकाळी दुकान उघडण्यासाठी आल्यावर निरंजन गांधी यांना पैसे असलेली बॅग आणि चाव्या आठवल्या. त्यांनी तात्काळ त्या वस्तू शोधण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना त्या मिळून आल्या नाहीत. त्यानंतर त्यांनी वैराग पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्याशी संपर्क साधून या घटनेची माहिती दिली. पोलीस निरीक्षक कुंदन गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि बॅगेचा शोध सुरू केला. पोलीस हवालदार अमोल भोरे आणि आकाश कांबळे यांनी ती हरवलेली बॅग निरंजन गांधी यांच्या ताब्यात दिली. वैराग पोलीस स्टेशनच्या डीबी पथकाचे पोलीस हवालदार अमोल भोरे, आकाश पवार, गणेश परजणे आणि श्रीमंत कांबळे यांच्या टीमने ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एक लाख रुपये रोख रक्कम असलेला मुद्देमाल दोन तासांत शोधून परत केल्याने वैराग पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पांडुरंग निघाले संत सावता माळींच्या भेटीला

## संतपरंपरेचा अद्वितीय सोहळा, पहिल्यांदाच लोकप्रतिनिधींची उपस्थिती

### पालखीचे पंढरपुरातून प्रस्थान

### आ. अभिजीत पाटील यांचा पायी सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जुलै-**

पांडुरंग निघाले संत सावता माळीच्या भेटीला या अभंगाप्रमाणे संत सावता माळी यांची कर्मभूमी असणाऱ्या माढा तालुक्यातील अरण या गावची आख्यायिका आहे. कामातच देव मानणाऱ्या कांदा, मुळा, भाजी आवघी विठाई माझी.. अशी ओळख असणाऱ्या संत सावता माळी यांच्या भेटीसाठी रविवारी कानड्या विठुरायाच्या पालखीचे अरणकडे प्रस्थान झाले.

अरण येथील संत सावता माळी यांच्या पुण्यतिथी सोहळ्यासाठी पंढरपूर येथून पांडुरंगाचा जो पालखी सोहळा अरणकडे रविवारी सकाळी मार्गस्थ झाला. या पालखी सोहळ्यात माढ्याचे आमदार अभिजीत पाटील सहभागी झाले असून ते रोपळे या गावापर्यंत पायी पालखी सोहळ्यासोबत चालले.



> संत सावता माळी यांच्या जीवनमूल्यांचा वारसा आम्हा सर्वांच्या प्रेरणेसाठी आहे. लोकप्रतिनिधी म्हणून श्री पांडुरंग पालखीत उपस्थित राहिलो आहे. अरण या संत भूमीत पांडुरंगाची पालखी येते ही आपल्या माढा तालुक्यासाठी गौरवाची गोष्ट आहे. पालखी सोहळ्याच्या माध्यमातून ग्रामीण भागात भक्तीचा व सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत होत आहे. हा सोहळा अधिक व्यापक करण्यासाठी पुढील वर्षांमध्ये शासनस्तरावरून आवश्यक त्या योजना राबविण्याचा देखील मानस आहे.
>
> **- अभिजीत पाटील, आमदार**

दरवर्षी येथील काशी कापडी मठातून पांडुरंगाचा पालखी सोहळा अरण येथे संत सावता माळी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी जात असतो. या वर्षी देखील या पालखी सोहळ्याने रविवारी सकाळी अरणकडे प्रस्थान ठेवले. येथील काशीकापडी मठामध्ये सकाळी आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते आरती संपन्न झाली. बोला पुंडलिक वरदे हरि विठ्ठलच्या गजरामध्ये पालखी संत सावता माळी यांच्या तिर्थक्षेत्र अरणकडे मार्गस्थ झाली. काशीकापडी मठातून ज्यावेळी पालखीचे अरणकडे प्रस्थान झाले त्यावेळी या पालखीला आमदार पाटील यांनी खांदा दिला. पालखी सोबतचे भाविक तसेच शहरातील नागरिक हरिनामाचा जयघोष आणि भजनात दंग झालेले दिसत होते. आमदार पाटील यांनी देखील आपल्या गळ्यात टाळ घालून ते देखील पालखी समवेत असणाऱ्या भाविकांबरोबर भजन गात, हरिनामाचा जयघोष करीत पायी सहभागी झाले होते. पालखीचा पहिला मुक्काम रविवारी रोपळे येथे होणार आहे. आमदार अभिजीत पाटील हे रोपळे गावा पर्यंत या पालखी सोहळ्या सोबत पायी प्रवास केला.

#### विठ्ठल मंदिरात पालखी सोहळ्याचे स्वागत

येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज ओसेकर यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. आमदार पाटील यांचा यावेळी गहिनीनाथ महाराज यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, शकुंतला नडगिरे, संभाजी शिंदे आदी उपस्थित होते.

#### पालखी सोबत चालणारे पहिले आमदार

तिर्थक्षेत्र आरण येथे दरवर्षी संत सावता माळी यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. यावर्षी बुधवारी (ता.२३) रोजी हा पुण्यतिथी सोहळा संपन्न होत आहे. मात्र या पालखी सोहळ्याचा मुक्काम २६ जुलै पर्यंत अरण येथे असणार आहे. येथील काशीकापडी मठातून दरवर्षी या पुण्यतिथी सोहळ्याच्या उत्सवात सहभागी होण्यासाठी पंढरपूर ते अरण असे पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. पंढरपूरात आज पर्यंत अनेक आमदार होवून गेले. मात्र या पालखी सोहळ्यात सहभागी होत रोपळे गावा पर्यंत पायी प्रवास करणारे पहिले आमदार म्हणून अभिजीत पाटील यांचा विशेष नमोल्लेख या पुढील काळात वारकरी भाविकांमधुन आवर्जुन होत राहणार आहे.

## रासायनिक खतांच्या दरवाढीचा दुसऱ्यांदा झटका

### शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२० जुलै -**

केंद्र सरकारने ऐन खरीप हंगामात रासायनिक दर वाढीचा दुसऱ्यांदा झटका दिला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थीक बजेट पुर्णपणे बिघडले आहे.

पोटॅशच्या दरात तब्बल २७५ रुपयांची वाढ झाली आहे. १०:२६:२६ जुना दर १ हजार ७२५ तर नवीन दर १ हजार ८५०, १५:१५:१५ जुना दर १ हजार ४७० नवा दर १ हजार ६५०, १२:३२:१६ जुना दर १ हजार ७२० नवा दर १ हजार ८५०, ९:२४:२४ जुना धर १९००. नवा दर २१००, ११:३०:१४ जुना



दर १८००. नवा दर १९७५ ,पोटॅश १५२५ नवा दर १८०० ,१६:१६:१६ जुना दर १४५० नवा १६०० शासनाने रासायनिक खतांच्या किमतीत प्रचंड दरवाढ केली असुन त्या तुलनेत धान्य विक्रीला हमीभाव नाही. एक हजार रुपयाला असणारी पोटॅशची अक्षरशः सतराशे रुपयापर्यंत पोहचली होती पण नंतर दरात थोडीसी तफावत येत दर कमी झाले. शासन पुर्वी ७०० रूपये अनुदान देत होते ते आता फक्त ७१ रुपयांचे अनुदान दिले जात आहे. शासनाने युरिया व डिएपीच्या किंमती निश्चित केल्या आहेत. तशा इतर कोणत्याही खतांच्या किंमती निश्चित केलेल्या नाहीत. सध्याच्या खरीप हंगामात समाधानकारक पाऊस झाला आहे. त्यामुळे खरीप हंगाम चांगला आहे तर दुसरीकडे खतांचा मात्र प्रचंड तुटवडा आहे. युरीयासाठी दुकानदार शेतकऱ्यांच्या माथी दुसरी महागडी खते मारुन शेतकऱ्यांना चांगलेच अडचणीत आणत आहेत. केंद्र सरकारने ताबडतोब दरवाढ मागे घेऊन शेतकऱ्यांना दिलासा देण्याची मागणी शेतकऱ्यांमधुन होत आहे. रासायनिक खतांच्या बेसुमार दरवाढीने शेतकऱ्यांनमध्ये सरकारविषयी प्रचंड असंतोष पसरला आहे.

## लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर

**अक्कलकोट, दि.२० जुलै-**

आर्थिक कारणावरून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी अमोगी विश्वनाथ तेलंग (वय. ४२ वर्षे रा. तोगराळी, ता. दक्षिण सोलापूर) या आरोपीचा जिल्हा व सत्र न्यायाधीश केंद्रे यांनी अटकपूर्व जामीन अर्ज सशर्त मंजूर केला.

याबाबत अधिक माहिती अशी सदर प्रकरणात वळसंग पोलीस स्टेशन येथे ११ एप्रिल २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी महिलेने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीप्रमाणे, काही वर्षांपूर्वी तिची एका गावातील तरुणाशी ओळख झाली होती. त्या तरुणाने तिच्यावर विश्वास संपादन करून वेळोवेळी आर्थिक रक्कम घेतली. दिनांक ८ नोव्हेंबर २०१७ रोजी, सदर तरुणाने पैसे परत देण्याच्या बहाण्याने तिला घरी बोलावले आणि घरी कोणी नसताना तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. अत्याचार करतानाच त्याने त्या घटनेचे म ोबाईलद्वारे व्हिडीओ रेकॉर्डिंग केले आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन वेळोवेळी तिच्याकडून पैसे उकळले.तसेच या दरम्यान, आरोपी अमोगी विश्वनाथ तेलंग (वय. ४२ वर्षे) याने सदर व्हिडीओ मोबाईलमध्ये पीडितेस दाखवून त्याचा समाजामध्ये प्रसार करण्याची धमकी दिली असल्याची फिर्याद पिडीतेने दाखल केली होती. आणि पिडीतेच्या मनास लज्जा वाटेल असे वर्तन केले आणि त्याच दरम्यान तिला शारीरिक आणि मानसिक त्रास देत ५० हजार रुपये उकळले. आरोपींकडून वारंवार आर्थिक व मानसिक छळ होत असल्यामुळे पिडितेने पोलीस ठाणे गाठून तक्रार नोंदवली होती. सदरील प्रकरणात आरोपी अमोगी तेलंग याने अटकपूर्व जामिनासाठी जिल्हा व सत्र न्यायालयात आपला अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. वरील प्रकरणात जिल्हा व सत्र न्यायाधीश केंद्रे यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज सशर्त मंजूर केला आहे. सदर प्रकरणात आरोपीकडून ॲड. कदीर औटी, ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे आणि ॲड.ओंकार फडतरे यांनी काम पाहिले.



## पोलीस पाटील संघटनेकडून पोलिस अधीक्षकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० जुलै-**

महाराष्ट्र राज्याचे आराध्य दैवत पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या आषाढी वारीचे उत्कृष्ट नियोजन झाले. कायदा व सुव्यवस्था कडक ठेवून कुठलेही गालबोट न लावता वारी सोहळा यशस्वीपणे पार पाडला. याबद्दल सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांचा गाव कामगार पोलीसपाटील संघटना पदाधिकाऱ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.

पंढरपूर वारी अतिशय शिस्तबद्ध आणि शांततेत व धार्मिक वातावरणात पार पडली. यामध्ये पोलीस अधीक्षक यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांचे कार्याचे कौतुक करण्यासाठी गाव कामगार पोलीस पाटील संघ सोलापूर चे पोलीस अधीक्षक यांचा सत्कार केला आहे. त्यांनी सुद्धा सर्वांच्या सहकार्याने यशस्वी झाल्याचे सांगितले. तसेच त्यावेळी पोलीस पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील सर्व महिला पोलीस पाटील यांचे मानधन मधुन दर महिना २०० रूपये कपात करण्यात येत आहे. ते इतर जिल्ह्याच्या अनुषंगाने करू नये. सोलापूर जिल्ह्यातील सर्व पोलीस पाटील यांचे प्रवास भत्ता, टीए बिल मिळावे असे विविध मागण्या करण्यात आल्या. यावेळी पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांनी ऐकून घेवुन सोडवणूक करण्याची ग्वाही दिली. यावेळी जिल्हा अध्यक्ष शिवानंद फुलारी, जिल्हा कार्याध्यक्ष सैपन बेगडे,जिल्हा खजिनदार धरेप्पा खडाखडे, तालुका अध्यक्ष विजय गावडे, सचिव धर्मराव कोळी, प्रसिद्ध प्रमुख अशोक पुजारी, अक्कलकोट चे महादेव बिराजदार,प्यारन मुल्ला, रेणूका इंगळे व जयश्री म्हमाणे आदी उपस्थित होते.

## सुर्डीच्या शेतकरी गटाने घेतले साडेतीन लाखांचे उत्पन्न

### 3 एकरात २ टन तूर बियाणांची केली विक्री

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. २० जुलै-**

सुर्डी (ता. बार्शी) हे निवडणुकीतील भांडणे, ताण-तणाव, अन् पोलिसांच्या मागे तक्रारींचा ससेमिरा अशा गटातील गाव. पण आता हे चित्र बदलतंय. आता येथे शेतकऱ्यांच्या एकीने तयार झालाय एक बियाणे ब्रॅन्ड! झालं असं कि, पानी फाउंडेशनच्या वॉटर कप स्पर्धेसाठी गावाने भांडणे मागे टाकली. खांद्याला खांदा लावून काम केले अन् २०१९ चा वॉटर कप जिंकला. हे फक्त स्पर्धेचं यश नव्हतं, गावच्या पुनर्जन्माचं लक्षण होतं. या कामगिरीत तयार झालेल्या १० नेतृत्वधारी शेतकऱ्यांनी हा एकतेचा वसा केवळ पाण्यापुरता मर्यादित न ठेवता, शेतीमध्ये उतरवला.

२०२२ मध्ये 'एकत्रित शेतीचा' नवा अध्याय सुरु झाला. यावरतीच काम करणाऱ्या पानी फाउंडेशनच्या 'फार्मर कप' स्पर्धेत सर्वांनी भाग घेत 'विजेता शेतकरी गट' बनवला व तूर पीक निवडले. माती परिक्षणामुळे खतांचा अतिरेक कमी झाला. बीजप्रक्रिया, बीबीएफ पेरणीने पीक संरक्षित झाले. बेसलडोस, शेणखत वापरले. दशपर्णी, निमार्क, चिकट सापळे, कामगंध सापळे, पक्षीथांब्यांनी कीड व्यवस्थापन केले. खर्च वाचवणाऱ्या व उत्पादनवाढीसाठी प्रभावी अशा शेतीच्या शास्त्रशुद्ध पद्धती त्यांनी पानी फाउंडेशनच्या डिजिटल शेतीशाळेतून शिकल्या अन् त्याचे पालनही केले. सुरुवातीला शेतकरी sop चा वापर न करता शेती करायचे तेव्हा त्यांचे तूर उत्पादन ६ क्विंटल होते नंतर पानी फाउंडेशन माध्यमातून Sop चा वापर करून पहिल्याच वर्षी उत्पादन पोहचले थेट १० क्विंटल प्रति एकर. खर्चही २५ हजारातून घटून १५ हजारांवर आला. २०२३ मधील तूरीला १० हजार ३०० रुपयांचा भाव मिळून प्रत्येक शेतकऱ्याचा सरासरी एकरी नफा १ लाखाच्या पार गेला. गावात यशाची चर्चा झाली. आसपासच्या अनेक शेतकऱ्यांनी गटाकडून तूर बियाणे विकत घेतले. यातूनच गटाला कल्पना सूचली अन् जन्म झाला -'सूर्डी तूर बियाणे' ब्रॅंडचा! २०२४ मध्ये त्यांनी प्रायोगिक तत्वावर ३ टन बियाणे विकले. त्यासाठी त्यांना फक्त ५० हजार रुपये खर्च आला आणि नफा कमावला साडेपाच लाख. त्यांनी फक्त बियाणे विकलेच नाही, तर शेतकऱ्यांना उचित मार्गदर्शनही केले. गटातील शेतकरी धनाजी शेळकेंनी आधीच बिजोत्पादनाचे ट्रेनिंगही घेतलेले होते. मग गटाने हा प्रयोग, वेगळ्या राखीव ३ एकर क्षेत्रावर करण्याचे ठरवले. बीजोत्पादनासाठी योग्य ग्रेडिंग आणि पॅकिंगही केले. २०२५ मध्ये त्यांना विदर्भ, मराठवाडा, उत्तर आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक शेतकऱ्यांकडून बियाण्याला मागणी आली. ३ एकरात त्यांनी २ टन बियाणे तयार केले. ४५ हजारांचा खर्च वजा करता साडेतीन लाखांचा नफा कमावला.



> ही बियाणे ब्रॅन्ड सुरुवात आहे. लवकरच मोठी कंपनी उभारण्याचे आमचं स्वप्नही पूर्ण होणार आहे
>
> **- शेतकरी दशरथ माळी, सुर्डी.**

> मी गेली १५ वर्षे अनेक प्रयोग केले. पण फार्मर कपमुळे मला समजले कि 'शेती' रासायनिक मारा करुन लूबाडण्याचे काम नाहीतर तिला जपत नफा कमवण्याचे साधन आहे.
>
> **- शेतकरी धनाजी शेळके, सुर्डी**

> पानी फाऊंडेशनच्या माध्यमातून सुर्डी येथील शेतकरी गटाने कमी खर्चात व शेतीच्या शास्त्रशुध्द पद्धतीचा वापर करून स्वतः तूर बियाणांचा ब्रॅंड तयार केलेला असून उत्पादनही चांगले घेत आहेत.
>
> **- नितीन आतकरे**
> **पानी फाऊंडेशन तालुका समन्वयक**

## जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन


**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० जुलै -**

राज्याचे जलसंपदा (विदर्भ तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी रविवारी (दि.२०) श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने नित्यपूजा विभागप्रमुख संजय कोकीळ यांच्या हस्ते जलसंपदा मंत्री श्री.महाजन यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.



## निधन वृत्त...

### लीलावती भंडारी



**सोलापूर, दि. २० जुलै-**

महेश नगर येथील रहिवासी लीलावती शामसुंदर भंडारी (वय ७२) यांचे शनिवार दि. १९ जुलै रोजी सायंकाळी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना, नातू, मुलगी आणि जावई असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर रविवारी २० जुलै रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
क्षेत्रीय कार्यालय – अहिल्यानगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला धाराशिव, ता. जि. धाराशिव शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर सर्व सुविधा असलेली १७०० स्क्वे फुट (+ – १0%) कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/0८/२०२५ दुपारी ४.00 वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २१/0७/२०२५ अहिल्यानगर
क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय,अहिल्यानगर
ARL

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः इर्लेवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन** : डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे इर्लेवाडी हद्दीतील शेतजमीन याचा गट नं. १०५ चे क्षेत्र ११ हे.८२ आर पो. ख. ० हे. ७५ आर, आकार १७ रु.८७ पैसे, यापैकी क्षेत्र ० हे. ८० आर + पो. ख.० हे. ०५ आर, आकार १ रु.२१ पैसे यासी चतुःसिमा : पुर्वेस - माळवदे यांची जमीन, दक्षिणेस - मनगिरे व कोळेकर यांची जमीन, पश्चिमेस - भोसकर यांची जमीन, उत्तरेस - रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक शेतजमिन आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही संदिप विश्वनाथ रंदवे यांची स्वतंत्र मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता.२०/०७/२०२५

सही/-
**ॲड. रोहित राजेंद्र घोडके**
**बी.एससी., एल.एल.बी.**
**वैराग नगरपंचायत जवळ, वैराग ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं.९८८१८४१५९५ अशिलातर्फे ॲडव्होकेट**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



### जगजीवनराम झोपडपट्टीतील दुर्घटना; पीडित कुटुंबांना ५ लाखांची मदत

**सोलापूर, दि. २० जुलै-**

शहरातील जगजीवनराम झोपडपट्टी भागात काही दिवसांपूर्वी दूषित पाण्यामुळे दोन शाळकरी मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ प्रत्युत्तर देत पीडित कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. ही आर्थिक मदत प्रत्यक्षात पोहोचवण्यात आली असून, पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते संबंधित कुटुंबांना ५ लाख रुपयांचे धनादेश प्रदान करण्यात आले. पालकमंत्री गोरे म्हणाले की, मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळला आहे. दुःखद प्रसंगात राज्य सरकारने मदतीचा हात दिला असून, यामधून पीडित कुटुंबांना थोडंसा आधार मिळेल अशी अपेक्षा आहे.''



### जागतिक सर्प दिनानिमित्त राज्यस्तरीय प्रशिक्षण व मेळावा

**सोलापूर, दि. २० जुलै-**

भारतीय मधमाशी स्वर्दशन सांस्कृतिक व सामाजिक संस्था वाळूज निमित्त एकदिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण व मेळावा कृषी विज्ञान केंद्र छत्रपती संभाजीनगर येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला. या कार्यक्रमामध्ये सर्पमित्र, मधमाशी मित्र, जैविक शेती करणारे शेतकरी व पर्यावरणप्रेमी यांचा सन्मान करण्यात आला. सहभागी सदस्यांनी सर्पसंवर्धन, मधमाशी पालन, जैविक व नैसर्गिक शेती तसेच प्रक्रियेबाबत सखोल मार्गदर्शन व प्रत्यक्ष प्रात्यक्षिके अनुभवली. याप्रसंगी केंद्रीय अर्थमंत्री डॉ. भागवत कराड, उपवनसंरक्षक सुवर्णा रवींद्र माने , कार्यक्रम समन्वयक डॉ. दिप्ती पाटगावकर, मानव वन्यजीव रक्षक डॉ. किशोर पाटक जैविक शेती तज्ञ डॉ. अनीता जिन्तूरकर, राहुल गोपाळ काळे (पुणे) पांडुरंग बामणे (मुंबई), माजी वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी दहीवाल लातूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या कार्यक्रमात १५० पेक्षा अधिक सहभागी उपस्थित होते. त्यापैकी १३५ सर्पमित्र, मधमाशीप्रेमी व जैविक शेती करणारे शेतकरी यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच सर्व प्रमुख मान्यवरांना ''सन्मान चिन्ह'' प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमात सर्प, मधमाशी व जैविक शेती याविषयी संवाद, अनुभव व प्रयोगांची देवाण-घेवाण झाली. यात येथील नॅचरल ब्ल्यू कोब्राचे संस्थापक सर्पमित्र दीपक इंगळे यांचा सन्मान करण्यात आला.

### लक्ष्मीबाई हायस्कूलमध्ये झाले पर्यावरणपूरक मार्गदर्शन

**सोलापूर, दि. २० जुलै-**

राजीव नगरमधील मराठा वस्तीतीत मातोश्री लक्ष्मीबाई हायस्कूलमध्ये पर्यावरण, व्यक्तिमत्व विकास आणि महिला सक्षमीकरणबाबत झालेल्या कार्यक्रमात पर्यवरण प्रेमी प्रविण तळे यांनी विचार व्यक्त केले. अध्यक्षपदी मुख्याध्यापक दिपक जळकोटे होते. पर्यावरण विषयक पाणी, प्लास्टिक कंपोस्टिंग यावर सध्या मोठ्या प्रमाणावर काम करावे लागणार असल्याचे सांगून जिल्ह्यत आज वृक्षारोपण ४%आहे ते वाढवून ३३ टक्केपर्यंत वाढवावे लागणार असल्याचे श्री. तळे यांनी सांगितले. एक पेड माँ के नाम यामध्ये सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षरोपण करावे. प्लास्टिक कचरा कमी करून कापडी पिशवीचा वापर वाढवण्याचे आवाहनही त्यांनी केले. यावेळी मुख्याध्यापिका माधुरी लाड, रवींद्र वाडीकर, विनोद महाजन, वंदना काळे आदी उपस्थित होते. सुनंदा मैदर्गी यांनी सूत्रसंचालन केले. रशिद तांबोळी यांनी आभार मानले.

# संत नामदेव महाराज ६७५वा संजीवन समाधी सोहळा

- श्रीक्षेत्र पंढरीत दोन दिवस भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन
- ॲड. महेश ढवळे; मुख्यमंत्री फडणवीसांसह अनेक मंत्री, महाराजांची उपस्थिती




**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जुलै-**

भागवत धर्माचे प्रसारक, आद्य किर्तनकार, श्री विठ्ठलाचे लडिवाळ भक्त संत शिरोमणी नामदेव महाराज परिवार व संत जनाबाई यांच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे बुधवार दि.२३ व गुरुवार दि. २४ जुलै रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह अनेक मंत्री, खासदार, आमदार, वारकरी संप्रदायातील महाराज मंडळी तसेच मान्यवर मंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघाचे संस्थापक अध्यक्ष व राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिली.

श्रीसंत शिरोमणी नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त माहिती देण्यासाठी पत्रकार भवन येथे रविवारी (ता.२०) आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी एकसंघाचे राष्ट्रीय सचिव व केशवराज संस्थेचे प्रमुख रुपेश खांडके, एकसंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष नंदकुमार कोसबतवार, प्रदेशाध्यक्ष व संत नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे, पश्चिशम महाराष्ट्राचे धनंजय गोंदकर, पश्चिम महाराष्ट्र युवक अध्यक्ष प्रथमेश परांडकर, वैभव सदावर्ते, प्रभु सोनवणे आदी उपस्थित होते. यावेळी माहिती देताना महेश ढवळे म्हणाले, संत नामदेव महाराज व परिवाराच्या षष्ठशतकोत्तर (६७५ वा) संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री केशवराज संस्था पंढरपूर, संत नामदेव महाराज भक्त परिवार, नामदास महाराज परिवार, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूर यांच्यावतीने श्रीक्षेत्र पंढरपूर येथे बुधवार दि. २३ व गुरुवार दि. २४ जुलै रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रमुख उपस्थित राहणार असून त्यांच्या समवेत पालकमंत्री जयकुमार गोरे, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, भाजपा अध्यात्मिक आघाडीचे प्रमुख आचार्य तुषार भोसले, माजी आ. प्रशांत परिचारक, अभिनेते गोविंद नामदेव, अनेक मंत्री, खासदार, आमदार, महाराज मंडळी उपस्थित राहणार आहेत.

संजीवन समाधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संत नामदेव महाराजांचे जन्मस्थान असलेल्या संत नामदेव मंदिर येथे पौर्णिमेपासून धार्मिक कार्यक्रम व अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ झाला आहे. प्रमुख कार्यक्रमच्या अंतर्गत सोमवार दि. २१ रोजी एकादशीनिमित्त दिंडीची नगर प्रदक्षिणा होणार आहे. मंगळवार दि. २२ रोजी व्दादशी दिवशी क्षीरापत कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि. २३ जुलै रोजी मुख्य दिवशी सकाळी ९ ते १२ या वेळेत संत नामदेव मंदिर येथे हभप नामदास महाराज यांचे संत नामदेव महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यावर आधारित किर्तन होणार आहे. त्यानंतर गुलाल पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. तसेच संत नामदेव मंदिर, संत नामदेव पायरी व श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दर्शन घेणार आहे. तसेच मानकर्यांमच्या हस्ते महानैवेद्य दाखविण्यात येणार आहे. त्यानंतर एल.आय.सी. कार्यालयासमोरील आरती मंडप मनमाडकर हॉल येथे आयोजित कार्यक्रमाप्रसंगी संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प. नामदास महाराज कुटुंबातील पाच महाराजांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संत पूजन होणार आहे.

यावेळी मान्यवर मंत्री, महाराज मंडळी उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमानंतर संत नामदेव मंदिर येथे सर्वांना मुक्तद्वार महाप्रसाद देण्यात येणार आहे. तसेच दि. २३ व दि. २४ जुलै असे दोन दिवस दिवसभर शिंपी समाजातील बांधवांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. २४ जुलै रोजी सकाळी १० ते १२ वाजता ह.भ.प. नामदास महाराजांचे काल्याचे किर्तन होईल. सायंकाळी ६ वाजता शाही दिंडी लवाजम्यासह संत नामदेव महाराजांच्या पालखीची नगर प्रदक्षिणा होणार आहे. वरील सर्व कार्यक्रमासाठी संपूर्ण महाराष्ट्रासह देशभरातून शिंपी समाज बांधव, संत नामदेव भक्त मंडळी, महाराज मंडळी उपस्थित राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समस्त नामदास महाराज परिवार व नामदेव महाराज फड श्री संत नामदेव क्षत्रिय एकसंघ, श्री.केशवराज संस्था पंढरपूर, संत नामदेव शिंपी समाज पंढरपूर, युवक संघटना, संत नामदेव महिला भजनी मंडळ परिश्रम घेत आहेत.

#### संत नामदेव स्मारकाचे काम लवकरच सुरु होणार

श्रीक्षेत्र पंढरी नगरीत चंद्रभागा नदीच्या पलीकडे भक्तीसागर येथे संत नामदेव महाराजांचे राष्ट्रीय स्मारक उभारणीसाठी राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. यासाठी रेल्वे विभागाची जागा राज्य शासनाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून सुमारे दहा एकर जागेवर स्मारक उभारण्यात येणार आहे. अंतिम आराखडा तयार करण्यात आला असून स्मारकाचे काम लवकरच सुरु करण्याततत येणार असल्याचे महेश ढवळे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

#### मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मनमाडकर हॉल येथे कार्यक्रम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत संत नामदेव पायरी, महाद्वार येथे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार होता. मात्र त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता सदरचा कार्यक्रम एल.आय.सी. कार्यालयासमोरील आरती मंडप मनमाडकर हॉल येथे होणार आहे. याठिकाणी संत नामदेव महाराजांचे वंशज ह.भ.प.नामदास महाराज कुटुंबातील पाच महाराजांचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संत पूजन होणार आहे.यावेळी मान्यवर मंत्री, महाराज मंडळी उपस्थित राहणार आहेत.



## सिव्हिलमध्ये वर्षात साडेतीन हजार नॉर्मल डिलिव्हरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार शासकीय रुग्णालयात दररोज २१ हुन अधिक सामान्य व सिझर प्रसूती होतात. गत वर्षात ३ हजार ४०० नॉर्मल, ४ हजार ४५३ प्रसुती झालेले आहेत. सीझर प्रसुतीचे प्रमाण वाढलेले आहे. या रुग्णालयामुळे सामान्य गरिबांचे लाखो रुपये वाचलेले आहेत.

येथील शासकीय रुग्णालयात शहर व जिल्ह्यातील गरोदर महिला ह्या प्रसूतीसाठी येतात. पहिल्यांदा नातेवाईक खासगी रुग्णालयात प्रसूतीसाठी महिलेला दाखल करतात. तेथे, सिझर प्रसूतीचा उपाय व काही हजारात येणारा खर्च परवडत नाही. नातेवाईक पुन्हा शासकीय रुग्णालय गाठतात. रुग्णाच्या नातेवाइकाला पहिल्यांदा सामान्य प्रसूतीसाठी प्रयत्न केले जाईल. नंतर, शेवटचा पर्याय म्हणून सिझर प्रसूतीचा पर्याय सांगतात. शहर जिल्ह्यासह कर्नाटकातील विजयपुर, कलबुर्गी व बिदरसह अन्य जिल्ह्यातील महिला येथे प्रसूती येथे दाखल होतात यामुळे रुग्णासह रुग्णाच्या नातेवाइकांचे हजारो रुपये वाचतात.

#### सामान्य प्रसुतीला वैद्यकीय अधिकारी महत्त्व देतात



प्रसूती विभागात तज्ञ वैज्ञकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली आहे. यामुळे, प्रसूतीसाठी दाखल झालेल्या महिला रुग्णाची काळजी घेतली जाते. शिवाय, सामान्य प्रसूतीला येथील वैद्यकीय अधिकारी महत्त्व देतात. अडचणी आल्यास सिझरचा पर्याय निवडतात.

**-डॉ. ऋत्विक जयकर,**
प्रभारी अधिष्ठाता

## कार्यकारी अभियंता कुलकर्णी पुन्हा 'राष्ट्रीय महामार्ग'कडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**



जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभाग दोनचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी यांची पुन्हा राष्ट्रीय महामार्ग सोलापूर विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणून नियुक्ती झाली आहे. तीन वर्षात जिल्ह्यातील अनेक कामे केल्याने कमी काळात त्यांचे जिल्ह्यात नाव झाले होते. कुलकर्णी यांची पहिली नियुक्ती धाराशिव पंतप्रधान सडक योजनेचे कार्यकारी अभियंता म्हणून झाली होती. तेथे त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली.

त्यानंतर ते राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे बदलून गेले. या काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईत वरळी ते बांद्रा सिलिंकचे मोठे काम झाले. मुंबई पुणे द्रुतगती चारपदरी मार्गाचे काम त्यांच्या काळात झाले. दहा लेनच्या कामाला सुरुवात करुन एक वेगही छाप पाडली. समृद्धी महामार्गाच्या नियोजनाचे काम कार्यकारी अभियंता कुलकर्णी यांनी काही काळ पाहिले. सोलापूर राष्ट्रीय महामार्गाकडे असताना त्यांनी रेल्वे स्टेशन जवळील साडेतीन कोटीचा पूल बांधला.

त्यांच्या काळात जमखंडी पुलाचे काम मंजूर झाले. मोहोळ, कुरूल, कामती, मंद्रूप तसेच १३ मैल, तांदूळवाडी बायपास अशी अनेक कामे उत्कृष्ट रितीने केले. त्यानंतर त्यांची जिल्हा परिषदेकडे बदली झाली. कार्यकाळानंतर त्यांची पुन्हा राष्ट्रीय महामार्गाकडे बदली झाली आहे.

#### सांस्कृतिक कार्यक्रमातून वेगळा ठसा

राष्ट्रीय महामार्गाकडे मोठी कामे केल्यामुळे जिल्हा परिषदेच्या छोटी कामेही त्यांनी आवडीने केले. अभियंता हा अभियंताच असतो, त्याच्याकडे कोणतेही काम असेना ते गुणवत्तेचे झाले पाहिजे, अशी शिकवण त्यांनी ज्युनिअर अभियंत्यांना दिली. जिल्हा परिषदेत काम करताना त्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचा वेगळा पाया रचला. जिल्हा परिषदेच्या प्रत्येक सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेऊन कार्यकारी अभियंता कुलकर्णी यांनी एक वेगळा ठसा उमटविला होता.



**बेडर समाज आषाढ मिरवणूक**

सोलापूर : शहरात रविवारी सकाळी बेडरपुल परिसरात आषाढ निमित्त पोतराजासह मिरवणूक काढण्यात आली. यावेळी जमलेला बेडर समाज बांधव.



## दमाणी विद्या मंदिरात शहरस्तरीय शालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

### शहरातील ५० शाळांमधील २३८ विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ पुणे संचलित, दमाणी विद्या मंदिरात शहरस्तरीय आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे यंदाचे २० वे वर्ष होते.

सदर स्पर्धेस प्रमुख पाहुण्या म्हणून सुप्रसिध्द निवेदिका मंजुषाजी गाडगीळ उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या मनोगतात स्पर्धेत जिंकण्यापेक्षा सहभागी होण्याचे महत्व स्पष्ट केले. जरी आपण जिंकलो नाही तरी विजेत्यांचे अभिनंदन करणे आपल्याला जमले पाहिजे असा कानमंत्र त्यांनी सहभागी विद्यार्थ्यांना दिला. प्रसिध्द लेखिका अरुणाजी ढेरे यांची एक गोष्ट सांगून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. सदर स्पर्धेतील गट पहिला(इ.१ ली ते ४थी) स्व. श्री. पापाशेठजी बलदवा जनहित निधी ट्रस्ट पुरस्कृत, तर गट दुसरा( इ. ५ वी ते इ. ७ वी) स्व. सौ. शांताबाई श्रीकिसनजी लाहोटी चारिटेबल ट्रस्ट पुरस्कृत आणि गट तिसरा (इ. ८ वी ते इ. १० वी ) स्व. सौ. गोपाबाई दमाणी यांच्या स्मरणार्थ भरविली जाते. सदर स्पर्धेत शहरातील एकूण ५० शाळेमधून २३८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

समारंभाप्रसंगी संस्थेचे स्थानीय अध्यक्ष कालिदासजी जाजू, सचिवा मंगलजी काबरा, संस्थेचे पदाधिकारी, प्रशाला विभागाच्या मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निर्मला भोसले, पर्यवक्षक राहुल इंगळे व शितल बंडगर, सर्व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्य पालक उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिमा मोहोळकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची व परीक्षकांची ओळख प्रभानंद पाटील यांनी करून दिली. स्पर्धेचे नियमवाचन शिरीन इंडिकर यांनी तर आभार प्रदर्शन सौ. वंदना राऊत यांनी केले. या समारंभाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## प्रा. महावीर शास्त्री यांना जिनदत्त स्मृती पुरस्कार



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

बारामती येथील चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सौजन्याने सौ कुसुम व जिनदत्त चंदुलाल शहा वेल्फेअर फाउंडेशन तर्फे धार्मिक सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्वानांना दिला जाणारा दहाव्या वर्षाचा राष्ट्रीय जिनदत्त स्मृती सन्मान २०२५ सोलापूर येथील सुप्रसिद्ध प्राकृत विद्वान डॉ महावीर शास्त्री यांना त्यांच्या मातोश्री पद्मावती शास्त्री, धर्मपत्नी डॉ. माधुरी शास्त्री यांच्यासह श्री किशोर शहा यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भव्य मानपत्र, स्मृतिचिन्ह व ७५ हजार रुपयांची सन्मान राशी या निमित्ताने त्यांना प्रदान करण्यात आली. देश विदेशातील उल्लेखनीय कार्य व शैक्षणिक क्षेत्रात प्राचीनतेची जपणूक याकरिता शास्त्री यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे असे समितीचे अध्यक्ष श्री किशोर शहा यांनी यावेळी सांगितले. शनिवार १९ जुलै रोजी बारामती येथे भव्य कार्यक्रमात हा सन्मान संपन्न झाला. आंतरराष्ट्रीय पुरस्कार, राष्ट्रपती पुरस्काराबरोबरच विद्वानांच्या नावे दिला जाणारा हा पुरस्कार अत्यंत मोलाचा आहे असे महावीर शास्त्री यांनी मनोगतात भाव व्यक्त केले.

प्रारंभी डॉ माधुरी शास्त्री यांनी मंगलाचरण तर सौ नेहा शहा यांनी प्रास्ताविक केले. याचवेळी जयपूर येथील डॉ सुधीर शास्त्री यांचाही पुरस्कार देऊन सन्मान झाला. दोन्ही विद्वानांचा परिचय किशोर शहा यांनी करून दिला तर मानपत्र वाचन व सूत्रसंचालन अश्विनीकुमार पत्की यांनी केले. आनंदीताई, भारत शहा व प्रत्यक्ष उपस्थित मान्यवरांसह ऑनलाइन माध्यमातूनही हा सोहळा अनेकांनी देशभरात अनुभवला.



## संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड करणार महाराष्ट्र दौरा

### अक्कलकोटपासून सुरुवात करणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर ज्या चौकात हल्ला झाला होता त्यात चौकात जंगी सत्कार करण्यात येणार असल्याचा निर्धार बंद वेळी करण्यात आला होता त्या अनुषंगाने संभाजी ब्रिगेड च्या पदाधिकाऱ्यांनी गायकवाड यांची भेट घेतली. कार्यक्रमात त्यांनी वेळ व तारीख विचारले असता २७, २८ तारखेला पुण्यामध्ये बैठक घेऊन चर्चा करू. येणाऱ्या काळात महाराष्ट्राचा दौरा करणार आहे. त्या दौऱ्याची सुरुवात अक्कलकोट येथून करणार आहे.

या बैठकीमध्ये कार्यक्रमाची तारीख लवकरच सांगू असे पदाधिकाऱ्यांना आश्वासित केले. अक्कलकोट येथील भ्याड हल्ल्याच्या वेळी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत सुद्धा हल्लेखोरांना उत्तर देऊन प्रवीण गायकवाड यांचा जीव वाचवला त्यामुळे सातारा येथे पार पडलेल्या पार्टी ट्रस्टच्या मेळाव्यामध्ये संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्या हस्ते सोलापूर संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले व शहराध्यक्ष जगदाळे तसेच सोलापुरातील संभाजी ब्रिगेडच्या टीमच्या शिंदे शाही टोपी घालून सन्मान करण्यात आला.

यावेळी सोलापुरातून संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष शाम कदम, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी भोसले, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहर अध्यक्ष जगदाळे, जिल्हा सचिव सिद्धाराम सवय, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, मोहोळ तालुका अध्यक्ष महेश मसलकर, रणजीत मसलकर, प्रमोद रुपनर, मारुती गुंड, निलेश मसलकर, विजय भोसले, अक्षय पवार, वैभव मिटकरी, छत्रगुण पवार, अंतुल लोंढे आदी उपस्थित होते.

# बदली प्रक्रियेमुळे कार्यरत शिक्षक अतिरिक्त ठरणार?

## बदली प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने

## शिक्षक संघटनांमधून नाराजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

जिल्हा परिषदेच्या शाळांतील प्राथमिक शिक्षकांच्या बदली प्रक्रियेत संचमान्यतेचे निकष डावलले जात आहेत. सोलापूर जिल्ह्यात शुक्रवारी संवर्ग एकमधील ६५४ शिक्षकांच्या बदल्या करण्यात आल्या. यामध्ये काही शाळांमध्ये मंजूर पदांपेक्षा अधिक शिक्षक नियुक्त केल्याचे समोर आले. यामुळे कार्यरत शिक्षकच अतिरिक्त ठरण्याची वेळ आली असून, याबाबतीत शिक्षकांसह संघटनांमधून नाराजी व्यक्त केली जात आहे.

वर्ष २०२४-२५ च्या संचमान्यता आधारावर अनेक शिक्षक अतिरिक्त ठरले होते. या बदल्यांमध्ये अतिरिक्त शिक्षकांचा विचार न करताच बदली प्रक्रिया राबवण्यात आली; तसेच बदल्यांपूर्वी शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करणे अत्यावश्यक असतानाही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. बदल्यांचे काम खासगी सॉफ्टवेअर कंपनी 'विन्सीस' यांच्याकडे देण्यात आले होते. या कंपनीने ज्या शाळांमध्ये मंजूर संचमान्यतेपेक्षा अधिक शिक्षक आहेत, त्या शाळांमध्ये नव्याने शिक्षक पाठवले जाणार नाहीत, असे स्पष्ट सांगितले होते, पण, प्रत्यक्षात त्या ठिकाणीदेखील शिक्षक पाठवण्यात आल्याने या बदली प्रक्रियेविषयी शिक्षक व शिक्षक संघटनांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

**ऑनलाइन बदली प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह?**

काही शाळांमध्ये आधीच मंजूर पदांपेक्षा अधिक शिक्षक कार्यरत असताना त्या ठिकाणी नव्याने शिक्षक पाठवण्यात आले. त्यामुळे अशा शाळांमध्ये शिक्षकसंख्येत वाढ झाली आहे. त्यामुळे ऑनलाइन बदली प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

> जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या बदल्यांच नियोजन चुकीच्या पद्धतीने झाल्यामुळे अनेक शिक्षकांना समायोजनाच्या फेऱ्यात अडकावे लागणार आहे. सध्या फक्त संवर्ग एकमधील बदल्या पार पडल्या. अजून संवर्ग २, ३ आणि ४ मधील बदल्या बाकी आहेत. जर अशीच प्रक्रिया पुढे सुरू राहिली, तर शिक्षक बदल्यांची यंत्रणा कोलमडण्याची शक्यता आहे. विनाकारण शिक्षकांवर अतिरिक्त होण्यासारखा अन्याय शिक्षक सहकार संघटना सहन करणार नाही.
> **- नीलेश देशमुख,** राज्य सरचिटणीस, शिक्षक सहकार


**न्यायालयात जाण्याची तयारी**

दि. ३१ मे पूर्वी शिक्षकांच्या बदल्या करण्याचे धोरण असताना जुलै महिन्यात ही प्रक्रिया राबविण्यात येत असल्याने काही शिक्षक संघटना न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत. सन २०२४-२५ ची संचमान्यता न्यायप्रविष्ट असल्याने शासनाने सन २०२३-२४ ची मंजूर संचमान्यता वापरून ३० जूनपूर्वी बदल्या करणे अपेक्षित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी ११८४

तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी ।
देवासही आटी जन्म घेणें ।।

धर्माचे रक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ही जबाबदारी माणूस प्रामुख्याने त्याच्या कर्तव्यातून पार पाडू शकतो. पण दुर्दैवाने येथे नमूद करावे लागते की, अनेकांना धर्म म्हणजेच काय? याचाच खरा अर्थ समजलेला नसतो. आपण ज्या समाजात जन्माला आलो, त्या समाजाच्या चाली-रिती, रुढी, परंपरा, वडीलधाऱ्यांचे वर्तन इत्यादींचे अनुसरण हाच धर्म असे अनेकजण समजतात आणि त्याप्रमाणे वर्तन करतात. अशा वर्तनालाच ते धर्माचे आचरण मानतात. पण धर्म या शब्दाचा अर्थ इतका संकुचित नाही. धर्माला जाती, रुढी, परंपरा आदीशी कांही देणे-घेणे नाही



तर त्याला फक्त नीती-नियमाशी देणे-घेणे आहे. नीती-नियमाची गोळाबेरीज म्हणजेच धर्म होय. त्यामुळे समाज योग्य तऱ्हेने चालण्यासाठी नागरीकांना नीती-नियमांचे पालन करावेच लागते. जेव्हा नीती-नियम पायदळी तुडवले जातात, तेव्हा अधर्माची वाढ होऊ लागते. धर्म हा सर्वांना सुख-शांती देणारा असल्याने व अधर्म हा मानवाला मानवतेपासून दूर नेणारा असल्याने व अधर्म हा मानवाला मानवतेपासून दूर नेणारा असल्याने धर्माचे रक्षण व अधर्माचा नाश ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. धर्म हा आपोआप जोपासला जात नाही. त्याचे अस्तित्व टिकविण्यासाठी कांही खटाटोप करावा लागतो. कारण खटाटोप/ कर्तव्य केली नाहीत, पुढाकार घेतला नाही तर नीती-नियम मागे सारुन स्वार्थ साधणाऱ्यांची संख्या वाढेल. वाईटाचे अनुसरण करण्यासाठी शिकवावे लागत नाही. पण चांगल्या गोष्टी अनुसरण्यासाठी शिकवावे लागते. धर्माच्या रक्षणासाठी भगवंतांनी अवतार घेतला तरीही त्यालाही कांहीतरी खटाटोप करावाच लागतो. हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात,

तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं ।
देवासही आटी जन्म घेणें ।।

धर्माच्या रक्षणासाठी आटी करणे म्हणजे नीती-नियमाचे पालन न करणाऱ्यांना शासन करणे आणि नीती-नियमांचे पालन करणाऱ्यांना प्रोत्साहन देणे होय. नीती-नियमाचे पालन व्हावे म्हणून बऱ्याचवेळा विविध प्रकारे नीती-नियमांची म्हणजेच धर्माची आठवण अनेकांना प्रसंगानुरुप का होईना पण करुन द्यावी लागते. भगवंताने धर्माच्या रक्षणासाठी अवतार घेतला म्हणजे झाले, असे होत नाही. तर त्यालाही या कामी प्रत्यक्ष कारवाई करावी लागते. धर्माला जेव्हा-जेव्हा ग्लानी लागेल तेव्हा-तेंव्हा मी अवतार घेईन, आणि दुष्टांचा नाश करुन चांगल्यांना संरक्षण देईन, असे भगवान श्रीकृष्ण म्हणाले आहेत. भगवान श्रीकृष्ण अवतार घेतील की नाही, यावर विचार करण्यापेक्षा आपणच भगवान श्रीकृष्ण आहोत, असे समजून धर्माच्या रक्षणासाठी पुढाकार घेणे योग्य आहे. दिवसेंदिवस समाजातून नीतीमत्ता कमी होऊन अधर्माची वाढ होत आहे. ज्यामुळे नीतीमत्तेची वाढ करण्यासाठी प्रथम आपण नीतीमत्ता जोपासली पाहिजे. आधी केले । मग सांगितले ।। ही संतोक्ती आचरणात आणण्याची अत्यंत गरज आहे. धर्माला ग्लानी येणे म्हणजे मानवतेला ग्लानी येणे होय. ही ग्लानी दूर करण्यासाठी प्रत्येकाच्या पुढाकाराची गरज आहे. आपल्या कुटूंबात धर्माचे पालन न करणारा समाजात धर्माचे रक्षण करु शकत नाही. म्हणून आपल्या कुटूंबापासून नीती-नियम पाळण्याची सुरुवात करणे योग्य होईल. जय जय राम कृष्ण हरी।।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# बारा रुपयांत पोहोचणार बहिणीची राखी

## राखी पौर्णिमेनिमित्त पोस्टाची टपाल पाकीट योजना; जिल्ह्यात पाच हजारांपेक्षा अधिक पाकिटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

पोस्ट खात्याने रक्षाबंधननिमित्त राखी पाठवण्यासाठी योजना आखली आहे. यावर्षी पुणे विभागात एक लाख राखी पाठवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी हा आकडा पाच हजारांपेक्षा अधिक असणार आहे.



मागील काही वर्षांपासून पोस्ट विभागाने राखी पाकीट योजना सुरू केली आहे. या योजनेत राखीचे पाकीट राखी पौर्णिमेच्या आधी भावापर्यंत पोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी राखीचे टपाल वाहतूक अन्य टपाल प्रकाराप्रमाणे न करता थेट संबंधित शहरात देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारली गेली आहे. मागील काही वर्षांपासून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. कोणत्याही महिलेस केवळ राखी घेऊन पोस्टात गेले की तयार राखी पाकिटावर भावाचा पत्ता टाकून हे पाकीट देता येते. तसेच त्यासाठी लागणारी तिकिटे देखील उपलब्ध असतात. या पाकिटावर राखीचे चित्र असल्याने ते तत्काळ संबंधित गावात पोचवले जाते. यावर्षी देखील राखी योजनेचे नियोजन पोस्ट खात्याने केले आहे.

लवकरच ही पाकिटे सर्व पोस्ट कार्यालयात उपलब्ध केली जातील. एका पाकिटाची किंमत नाममात्र १२ रुपये आहे. या पाकिटासाठी दर्जेदार वॉटरप्रूफ कागद उपयोगात आणला गेला आहे. तसेच राखी देशासह विदेशात देखील स्पीड पोस्टने राखी पाठवता येते. डिजिटल शुभेच्छांच्या युगात देखील या राखीला मोठे महत्त्व असते. त्यामुळे मागील चार वर्षांपासून या योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांना त्यांच्या राखी स्पीड पोस्टने विदेशात देखील पाठवता येतील, ज्यामुळे अगदी परदेशातही राखी अतिशय जलद आणि वेळेवर पोचू शकेल. या पाकिटांवर 'राखी' असा उल्लेख केला असल्याने त्याची वेगाने वर्गवारी करता येते.

**सोलापुरातील राखी पाकीट विक्री व त्यातून मिळालेले उत्पन्न**

**वर्ष २०२१-२२ :** ८ हजार ८० हजार रुपये. **वर्ष २०२२-२३ :** ३४०० ४० हजार ८०० रुपये. **वर्ष २०२३-२४ :** ४५००. ५४ हजार रुपये. **वर्ष २०२४-२५:** ४५००. ५४ हजार रुपये



## ब्रम्हा गॅलेक्सी निवडणूक; नंदा दिवाकर यांची चेअरमनपदी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

जुळे सोलापूरातील प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या ब्रम्हा गॅलेक्सी आपार्टमेंन्टची निवडणूक रविवारी पार पडली. नंदा संपत्र दिवाकर यांची चेअरमनपदी मतदानाद्वारे निवड करण्यात आली .

ब्रम्हा गॅलेक्सी निवड समितीने २० जुलै रोजी मतदानाचे आयोजन केले होते. व्हाईस चेअरमन माधव नारायणकर, सेक्रेटरी अमर आवताडे, जॉईट सेक्रेरी माधुरी राऊत, खजिनदार श्रीरंग बनसोडे या पाच पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. चेअरमन पदासाठी नंदा दिवाकर विरुद्ध प्रवीण राठोड यांच्यात निवडणूक घेण्यात आली .दिवाकर यांना २६ तर प्रवीण राठोड यांना २३ मते पडली. तीन मतांनी दिवाकर विजयी झाल्या. निवडणूकीचे कामकाज हणमंत बाबर, दिलीप कटके, सुनिल बिराजदार यांनी पाहिले. दिवाकर यांच्या निवडीमूळे सभासदांकडून अभिनंदन करण्यात आले.

## महापालिकेतील मतदान यंत्रांच्या तपासणीस सुरुवात : सहाय्यक आयुक्त पंडित

**प्राथमिक स्तरावरील पूर्ण तपासणीस लागणार चार दिवस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने सोलापूर महापालिकेत उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी शनिवारपासून सुरू झाली. पूर्ण यंत्रे तपासणीसाठी आणखी तीन-चार दिवस लागणार आहेत, अशी माहिती महापालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित यांनी दिली.



राज्य निवडणूक आयुक्तांनी दि. ११ जुलै २०२५ रोजी च्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत दिलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अंतर्गत राज्य निवडणूक आयोगानी उपलब्ध असलेल्या मतदान यंत्रांची मास्टर ट्रेनर कडून प्राथमिक स्तरावरील तपासणी करून घेण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार कर्मचाऱ्यांची सोलापूर महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या १२१८ कंट्रोल युनिट व २२८४ बॅलेट युनिट मास्टर ट्रेनरकडून तपासले जाणार आहेत. मतदान यंत्रांची तपासणी करण्यासाठी मास्टर ट्रेनर म्हणून १२ कर्मचारी व अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सोलापूर महापालिकेतील कौन्सिल हॉल येथील मशीन गोडाऊन शेजारी उभारण्यात आलेल्या मंडपात मतदान यंत्र तपासणी कामास आज सकाळी सुरुवात करण्यात आली. संपूर्ण यंत्रणा कार्यरत होऊन प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी दुपारी १२च्या पुढे सुरुवात झाली. कंट्रोल युनिट व बॅलेट युनिटची तपासणी प्रशिक्षित अशा मास्टर ट्रेनरकडून करण्यात येत होती. त्यातील नादुरुस्त यंत्र वेगळे केले जातील. ही तपासणी करण्यासाठी आणखी तीन ते चार दिवस दिवसांचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. मतदान यंत्र तपासणी पूर्ण झाल्यानंतर आणखी मशीनची आवश्यकता आहे का याचा आढावा घेण्यात येणार आहे.

# शाई फेकच्या निषेधार्थ कोंडी ग्रामस्थांच्यावतीने आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेधार्थ छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती कोंडी व ग्रामस्थांच्यावतीने कोंडी येथे निषेध आंदोलन करण्यात आले.



अक्कलकोट येथे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष विनोद गायकवाड यांच्यावर झालेल्या शाई फेक व भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ रविवार दि. २० जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती कोंडी व सर्व कोंडी ग्रामस्थ एकत्रित येत तीव्र निषेध केला. प्रविण गायकवाड हे फक्त एक व्यक्ती नाहीत ते एक चळवळ आहेत, विचारांची मशाल आहेत. जो भ्याड हल्ला झाला, तो केवळ एक व्यक्तीवर नव्हे, तो आमच्या विचारांवर, आमच्या जागृतीवर, आमच्या अस्मितेवर हल्ला झाला आहे. आम्ही हा हल्ला वैयक्तिकरीत्या आमच्यावर झाल्यासारखा अनुभवतो, असे मत माजी नगरसेवक अमोल शिंदे यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, कोंडी गावचे सरपंच मनोज निंबाळकर, उपसरपंच शिवाजी निळ, सोम नाथ राऊत व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती व कोंडी ग्रामस्थ उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना रिपाईतर्फे अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) च्या वतीने शहर अध्यक्ष बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी पार्वती खरबडे, कुंदन गायकवाड, सचिन चौगुले, किशोर गायकवाड, बाळू कांबळे, किशोर चौधरी, दशरथ कजाकवोल, विजय दांडोर, स्वप्नील शिंदे, रोहित गायकवाड यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

सोन्यासाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह पाचजणांविरूध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शाहिन मोईन शेख (वय २५, रा. सनराईज अपार्टमेंट, शिमला नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती मोईन, सासू सईदा, नणंद मुबशीरीन, नणंदेचे पती जहीर गारे, नणंद असमा मुल्ला (रा. जय हिंद नगर, जुळे सोलापूर) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दि. १४ मे ते १९ जुलै या कालावधीत शाहिन शेख या पती मोईन याच्यासोबत सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती मोईन व त्याच्या घरातील लोकांनी शाहीन हिस शारीरीक व मानसिक त्रास देऊन शाहीन हिने माहेरून तीन तोळे सोने आणून द्यावेत म्हणून हुंड्याची मागणी करून शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच ठार मारण्याची धमकी दिली. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

# नीलकंठ बँक सभासदांना देणार १० टक्के लाभांश

## बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा

## सुलभ सेवेमुळे बँकेचा नाव लौकिक : चेअरमन नोगजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० जुलै-**

नीलकंठ को - ऑप बँक ही रिझर्व बँकेच्या नियमानुसार आर्थिक दृष्ट्या सक्षम आणि उत्कृष्ट व्यवस्थापनाची बँक झालेली आहे. पारदर्शक, सुलभ सेवेमुळे बँकेचा नाव लौकिक असून मार्च २०२५ अखेर एक कोटी रुपये निव्वळ नफा झाला आहे. सभासदांना १० टक्के लाभांश देण्याचा निर्णयही घेतला आहे. ऑडिट अ वर्ग प्राप्त झाला आहे, अशी माहिती बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी दिली.



बँकेची २८वी वार्षिक सर्वसाधारण सभा माहेश्वरी सांस्कृतिक भवनात पार पडली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी बँकेचे व्हाईस चेअरमन पद्मा भुतडा, संचालक रमेश राठी, चंद्रकांत तापडिया, विजयकुमार उपाध्ये, प्रदिपकुमार शिंगवी, जमनादास भुतडा, कौस्तुभ करवा, शरद कालाणी, सुनिल तोष्णीवाल, सचिन कोठारी, अभिजीत चिड्डाळ, किरण शेरखाने, नंदकुमार भोसले, सीएस नंदा भट्टड, तज्ञ संचालक सीए आनंद झंवर, अँड.महेश अग्रवाल यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला बँकेचे संस्थापक दिवंगत विश्वनाथ करवा यांना अभिवादन करण्यात आले तसेच दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रारंभी स्वागत बँकेच्या व्हाईस चेअरमन पद्मा भुतडा यांनी केले. तज्ञ संचालक सीए आनंद झंवर यांनी आर्थिक ताळेबंद वाचून दाखविला. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद बलदवा यांनी मांडलेल्या मागील इतिवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सभेचे अध्यक्ष व बँकेचे चेअरमन सीए धनराज नोगजा यांनी अहवाल वाचन व अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, २७ वर्षांपूर्वी एका छोट्या रोपट्याचे रूप घेऊन नीलकंठ को ऑपरेटीव्ह बँक लिमिटेडची स्थापना केली. आज तीन शाखांसह यशस्वीरित्या कार्यरत आहे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने बँकेने आतापर्यंतची वाटचाल केली आहे. बँकेने थकबाकी नियंत्रणात ठेवण्यात यश मिळवले आहे. फक्त आर्थिक व्यवहार न पाहता बँकेने सामाजिक बांधिलकीची परंपरा जोपासली आहे. भविष्यातही असे समाज उपयोगी उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे, असे चेअरमन नोगजा यांनी स्पष्ट केले. सभासदांच्या प्रश्नांची उत्तरे चेअरमन धनराज नोगजा यांनी दिली. यावेळी विजयकुमार बिराजदार, अविनाश कोंडा, नागलिंग मठपती, काशिनाथ गड्डम, विजयकुमार शाबादी, अनिल गवळी, किरण सुराणा आदी सदस्यांनी सूचना मांडल्या. याप्रसंगी सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा आणि मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन पूजा जोशी यांनी केले. आभार संचालिका सीएस नंदा भट्टड, यांनी मानले.

**नीलकंठ बँकेची आर्थिक स्थिती**

निव्वळ नफा - १ कोटी रुपये
ठेवी - १९१. ४७ कोटी
भाग भांडवल - ५.२ कोटी
खेळते भांडवल - २२३.३१ कोटी
कर्जे - १२४. ६७ कोटी,
निधी - १४ कोटी ८५ लाख,
गुंतवणूक - ७६.९० कोटी
ऑडिट वर्ग - अ

## गोडाऊनमधून ८० हजारांचे साहित्य चोरीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

शहरातील जोडभावी पेठ मधील कलशेट्टी बिल्डींगमधील गोडाऊनमधून चोरट्याने ८० हजारांचे साहित्य चोरून नेले.

याबाबत कविराज बसवराज कलशेट्टी (वय ३१, रा. कलशेट्टी बिल्डींग, जोडभावी पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कविराज कलशेट्टी यांच्या राहत्या घराच्या बिल्डींग येथील उघड्या गोडाऊनमधून चोरट्याने सोलापूर इन्व्हर्टर, २२ बॉक्स एसीडीबी व डीसीडीबी, ५०० मीटर डीसी वायर असा ७९ हजार ५४६ रुपयांचे साहित्य चोरून नेले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घोडके पुढील तपास करीत आहेत.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : सोमवार | दिनविशेष- |
| दि. २१ जुलै २०२५ | कामिका एकादशी |
| विक्रम संवत् २०८१ | आळंदी व निर्मळ यात्रा |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - आषाढ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. एकादशी (०९.३८) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - रोहिणी (२१.०५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - वृद्धी (१८.३७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बालव (०९.३८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारात नवीन योजना आखताल. राजकीय किंवा शासनाकडून मान सन्मान मिळण्याचे योग आहेत. आरोग्याची काळजी घ्या.

**वृषभ :** जमीनी संदर्भातील व्यवहार सुरळीत पार पडतील. प्रभावपूर्ण वातावरण राहील. व्यवसायिक करार फायदेशीर ठरतील.

**मिथुन :** आपल्या सल्ला घेतला जाईल. रोजगारात विस्तार होण्याची शक्यता आहे. अनोळखी व्यक्तिवर विश्वास दाखवू नका.

**कर्क :** विश्वासदर्शक वातावरण राहील. स्वत:च्या प्रयत्नाने सम्मान मिळेल.

**सिंह :** प्रतिष्ठित व्यक्तींच्या उदारपणामुळे आपली कार्यक्षमता वाढणार आहे. कामकाजात सुधारणा होईल.

**कन्या :** व्यापार चांगला चालेल. कार्यक्षेत्रात नवीन कामाची योजनेमुळे फायदा होईल. मेहनतीचे उचीत फळ मिळेल. मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल.

**तुळ :** चांगल्या लोकांच्या गाठी होतील ते आपले हितचिंतक असतील. प्रवास सावधानीने करावा. योजना कार्यान्वयीत होतील. एखादे अवघड काम झाल्याने आनंदी रहाल.

**वृश्चिक :** सकारात्मक विचार कराल. आपल्या कामाचे सम्मान प्रशंसा होईल. व्यापारिक कामे यशस्वी होतील. जोखमीचे काम करण्यापासून सावधान रहा.

**धनु :** न्यायालयीन कामात यश मिळेल. व्यापारात नुकसान होण्याचे योग आहेत. घरातील वृध्द व्यक्तिंच्या आरोग्याची काळजी घ्या.

**मकर:** अनिश्चितता राहील. सर्व कामे मनासारखी होतील. वैयक्तीक जीवनात सावध रहा.

**कुंभ :** प्रभावशाली व्यक्तिवामुळे आपल्या गोष्टी लोकांपर्यंत पोहचविण्यात यशस्वी व्हाल. आर्थिक लाभ झाल्याने आनंदी रहाल.

**मीन :** आपल्या बुद्धीच्या जोरावर आखलेल्या योजना यशस्वी होतील. आपल्या कामकाजात बदल होण्याची शक्यता आहे. वाहन चालवतांना सावधानी बाळगा.

CMYK

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तृतीयपंथीयांना निराधार योजनांचा लाभ; २३८ जणांना ओळखपत्र

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर , दि. २० जुलै-**

तृतीयपंथीयांना संजय गांधी निराधारसह अन्य शासकीय योजनांचे लाभ सहजासहजी मिळावेत यासाठी सामाजिक न्याय विभाग सहाय्यक आयुक्त कार्यालयाच्या वतीने पहिल्या टप्यात शहर जिल्ह्यातील २३८ जणांना ओळखपत्राचे वाटप केले आहे. जसे प्रस्ताव येथील तसे ती देण्याची प्रक्रिया या कार्यालयाकडून सुरू असल्याचे सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांनी सांगितले.

तृतीयपंथीय हे चौक किंवा महामार्गावर थांबून वाहनचालकांकडे पैसे मागतात. काही चालक देतात. अनेकजण त्यांना पैसे देणे टाळतात. अशावेळी मिळेल तेवढ्या पैशावर त्यांना समाधानी राहावे लागते. समाजही यांना जवळ करत नाही. यासाठी आता शासनच जवळ करत काही योजनांच्या माध्यमातून त्यांना स्थिर करण्याचा प्रयत्न करत आहे. पहिल्या टप्प्यात त्यांना ओळखपत्र दिली जात आहेत. त्यानंतरच्या काळात संजय गांधी निराधार योजनेच्या माध्यमातून आर्थिक हातभार लावला जाणार आहे. शिवाय, मतदान कार्ड, आधार कार्डासह शिधापत्रिकाही देण्यात येईल. सध्या, शहर जिल्ह्यातील ४० हून अधिक जणांना निराधार योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

समता, न्याय, एकात्मता
महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय विभाग

### ▶▶ महत्त्वाचे...

### कुरूलमध्ये महिलेचा विष प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २० जुलै-**

कुरूल (ता. मोहोळ) येथे महिलेने विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. तनुजा ऋषिकेश झिंझुरडे (वय ५०, रा. कुरूल) असे उपचारासाठी दाखल महिलेचे नाव आहे. तनुजा यांनी २० जुलै रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास राहत्या घरी घरगुती भांडणाच्या वादातून पिकावर मारणारे तननाशक विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने आजोबा दत्तात्रय यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

### कपडे वाळण्यास गेलेल्या वृद्धेचा तोल जाऊन जखमी

**सोलापूर, दि. २० जुलै-**

वागदरी (ता. अक्कलकोट) येथे कपडे वाळण्यास गेलेली वृद्धा तोल जाऊन पडल्याने जखमी झाली. सुगलाबाई रेवप्पा शिरगणे (वय ९०) असे जखमी वृद्धेचे नाव आहे. १७ जुलै रोजी ११च्या सुमारास सुगलाबाई या राहत्या घरी कपडे वाळण्यास गेल्या होत्या. त्यावेळी तोल जाऊन खाली पडल्याने त्यांच्या हातास व पायास मुका मार लागून त्या जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पानमंगरूळ येथे घरगुती वादातून एकाने विष प्राशन केले

**सोलापूर, दि. २० जुलै-**

पानमंगरूळ (ता. अक्कलकोट) येथे घरगुती वादातून एकाने विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. सिध्दाराम जगन्नाथ पवार (वय ४५, रा. पानमंगरूळ) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्याचे नाव आहे. २० जुलै रोजी सकाळी ९च्या सुमारास राहत्या घरी सिध्दराम यांनी घरगुती भांडणाच्या वादातून रोगर नावाचे विषारी औषध प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने उपचारासाठी पत्नी शांता पवार यांनी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### सिव्हील हॉस्पिटलमध्ये खिडकीत अडकून बेशुद्ध

**सोलापूर, दि. २० जुलै-**

सिव्हील हॉस्पिटल बी ब्लॉकमध्ये खिडकीच्या सळईमध्ये बेशुध्दावस्थेत अडकलेल्याचा उपचारापूर्वी मृत्यू झाला. पप्पू आण्णा भंडारे (वय ५०, रा. लक्ष्मी नगर, रविंद्र शाळेमागे, ता. भूम, जि. धाराशिव) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २० जुलै रोजी सकाळी साडेआठच्या पूर्वी पप्पू हा सिव्हील हॉस्पीटलमधील जूना बी ब्लॉक येथील एका खिडकीच्या सळईमध्ये बेशुध्दावस्थेत अडकलेला मिळून आला. याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यातील पोलिस हवालदार आर एन मनोहर यांनी भंडारे यास बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यास डॉ. आकाश माने यांनी मृत घोषित केले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### शिव्या देण्याच्या कारणावरून तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २० जुलै-**

शिव्या देण्याचा कारणावरून तरूणास मारहाण करण्यात आली. नागेश शिवानंद साबळे (वय २८, रा. स्वागत नगर, कुमठा नाका, सोलापूर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. २० जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास ताई चौक येथे शिव्या देण्याच्या कारणावरून राजू चव्हाण व इतर एकाने दगडाने नागेश यास डोक्यात मारहाण केली. त्यामुळे नागेश यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.

### भोसेमध्ये तरुणास मारहाण

**सोलापूर, दि. २० जुलै-**

भोसे येथील गद्या गाढव जंगलाजवळ अज्ञात कारणावरून मारहाण केल्यामुळे तरूण जखमी झाला. आकाश अशोक काकडे (वय २५, रा. काकडे वस्ती, भोसे, ता, मंगळवेढा) असे जखमीचे नाव आहे. १८ जुलै रोजी रात्री भोसे येथील गद्या गाढव जंगलाजवळ अज्ञात कारणावरून जकराया माशाळ, गंगाराम शेजाळ व इतर ७ ते ८ जणांनी मिळून रॉडने, केबलच्या वायरीने व पीव्हीसी पाईपने आकाश काकडे यास मारहाण केली. त्यामध्ये आकाश काकडे याच्या सर्वांगास मार लागल्याने त्यास उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. सिव्हील पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

# भारतीयांच्या दान परंपरेतूनच होतेय रक्तदान

### डॉ. रमेश पांडव : डॉ हेडगेवार रक्तपेढी संस्थेचा रक्तदाता कृतज्ञता सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

भारतात दान देण्याची परंपरा मोठी आहे. आपण कमावलेल्या धनाचे आपण काही वर्षांकरिता केवळ विश्वस्त आहोत. ही भावना भारतीयांच्या पूर्वजांनी रुजविली आहे. रक्तदात्यांची भावना गरजू रुग्णांसाठी ही अशीच असल्याचे प्रतिपादन सामाजिक समरसता मंचाच्या महाराष्ट्र प्रांताचे निमंत्रक डॉ. रमेश पांडव यांनी केले.

डॉ हेडगेवार रक्तपेढी संस्थेचा ३५ वा वर्धापन दिन तसेच रक्तदाता कृतज्ञता सोहळा रविवारी शिवस्मारक सभागृहात उत्साहात झाला. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर उद्योजक नित्यानंद दर्बी, रिलायन्स फाऊंडेशनच्या विभागीय अधिकारी बिंदू नायर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सी. ए. सुनील इंगळे, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे, सचिव सत्यनारायण गुंडला, कोषाध्यक्ष सुहास जोशी उपस्थित होते. प्रारंभी भारतमातापूजन, डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते झाले.

भारतीय ऋषीमुनींनी उत्तम समाज निर्मितीचे संकल्पना मांडली. राष्ट्राच्या कल्याणाची कामना करणारी मंत्रपुष्पांजली ही भारताची हजारो वर्षांपासून राष्ट्रीय प्रार्थना असल्याचेही डॉ. पांडव यांनी सांगितले.अध्यक्ष श्री. विश्वरूपे यांनी प्रास्ताविक केले. अहवाल वाचन सचिव श्री. गुंडला यांनी केले. रुपाली लोंढे यांनी स्वागत गीत तर वैयक्तिक पद्य बालाजी यल्ला यांनी सादर केले. पारितोषिक यादी वाचन संगीता मेथे-कोरे, सुशांत कुलकर्णी, रुपाली लोंढे यांनी केले. डॉ. सुमेधा कंदलगावकर यांनी सूत्रसंचालन तर व्यवस्थापक रंगनाथ जोशी यांनी आभार मानले. रुपाली लोंढे यांच्या पसायदानाने समारोप झाला. याप्रसंगी शिबिर संयोजक इंद्रजीत पवार, रक्तपेढीच्या संचालिका डॉ. किरण सारडा, संचालक मिलिंद फडके, डॉ. विजय शिवपुजे, महेंद्र कावरे नूतन संचालक गिरीश दर्बी,शहर संघचालक राजूसा काटवे, भटक्या विमुक्तचे प्रकल्प संचालक अशोक संकलेचा, शिवस्मारकचे संचालक रंगनाथ बंकापूरे, अर्पणा फडके, डॉ. मंजिरी धामणगावकर, डॉ. बंडप्पा पाटील, डॉ. विनायक टेंभुर्णीकर, शंभुसिंग चौहान, डॉ. उत्कर्ष वैद्य, प्रा. विजया महाजन, मदन मोरे, गंगाधर गवसणे, महादेव न्हवकर, दत्ता पुकाळे, जनसंपर्क अधिकारी रवि कोटा आदी उपस्थित होते.






सोलापूर : डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने कृतज्ञता सोहळ्यात मार्गदर्शन करताना सामाजिक समरसता मंचाचे प्रांत निमंत्रक डॉ. रमेश पांडव. दुसऱ्या छायाचित्रात शतकवीरांचा सत्कार करण्यात आला. (छायाचित्र केवल तिवारी)

### शतकवीर रक्तदात्यांचा झाला सन्मान

रक्तदाता कृतज्ञता सोहळ्यानिमित्त शतकवीर रक्तदाते अभिजीत लोके, मल्लिकार्जुन आळंद, उदयराज आळंदकर यांचा सन्मान याप्रसंगी करण्यात आला. जिल्हा सरकारी प्रदीपसिंग रजपूत व रक्तदान चळवळीतले गोपाळ सोमाणी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

### ३२५ शिबिरे अन् ११ हजार ४८१ रक्तपिशव्यांचे संकलन

वर्षभरात विविध संस्था, संघटना, देवस्थान, राजकीय पक्ष, व्यापारी आदींनी आयोजित केलेल्या एकूण रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून डॉ. हेडगेवार रक्तपेढीने ११ हजार ४८१ रक्तपिशव्यांचे संकलन केल्याचे सचिव सत्यनारायण गुंडला यांनी सांगितले.




सोलापूर : शहरात गणेशोत्सवाची तयारी सुरू असून लकी चौक येथील समर्थ तरुण मंडळाचे कार्यकर्ते लेझीमचा सराव करताना रविवारी टिपलेले छायाचित्र.

## उंचावरील पाण्याची भरलेली टाकी घरावर पडून २० वर्षीय तरुणीचा मृत्यू

■ **टाकीच्या मालकावर गुन्हा**
■ **आरपात नगरातील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

शहरातील अक्कलकोट रोड एमआयडीसीमधील आरपात नगरात उंचावरील पाण्याची भरलेली टाकी घरावरती पडून घरात झोपलेली २० वर्षीय तरूणी मृत्युमुखी पडली. याबाबत टाकीच्या मालकाविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात एक महिन्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गायत्री आडम (व य २०, रा. २९, आरपात नगर, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरुणीचे नाव आहे. याबाबत पोलिस हवालदार डोके यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्चना बालाजी गोविंद (रा. १५, आरपात नगर, सोलापूर) या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील मयत गायत्री आडम आणि अर्चना गोविंद या एकमेकांच्या शेजारी राहतात. अर्चना गोविंद या महिलेने त्यांच्या राहत्या घराच्या वर पाण्याची टाकी ठेवण्यासाठी लोखंडी स्टॅन्ड तयार केले आहे. या स्टॅन्डला टाकीच्या सुरक्षिततेसाठी चारही बाजूने कोणतीही संरक्षित लोखंडी अँगल न लावता भरलेली पाण्याची टाकी बसेल एवढे पुरेसे लोखंडी स्टॅन्ड न बांधता त्यावर १ हजार लिटरची पाण्याची टाकी ठेवलेली आहे. २४ जून रोजी सायंकाळी अर्चना गोविंद हिच्या घराच्या वरती लोखंडी स्टॅन्डवर उंचावर भरलेले १ हजार लिटरची पाण्याची टाकी ही घसरून ती शेजारी राहणाऱ्या व्यंकटेश आडम यांच्या घरावरती पडली. त्यामध्ये आडम यांच्या घराचा पत्रा फाटून घरात झोपलेल्या गायत्री आडम हिच्या अंगावर ती भरलेली टाकी पडली. त्यामुळे गायत्री आडम ही गंभीर जखमी होऊन मरण पावली. गायत्री आडम हिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अर्चना गोविंद हिच्याविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बनसुडे पुढील तपास करीत आहेत.




## पत्नीच्या खून प्रकरणी वकिलास पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै -**

घरगुती वादातून पत्नीचा खून करून ठाण्यात हजर राहून खुनाची कबुली देणाऱ्या वकिलास शनिवारी न्यायालयामध्ये हजर करण्यात आले असता त्याला मुख्य न्यायदंडाधिकारी नवले यांनी चार दिवसांची (१९ जुलै) पोलिस कोठडी सुनावली.



प्रशांत रवींद्र राजहंस (वय ४४) असे कोठडी मिळालेल्या वकिलाचे नाव आहे. वसंतविहार भागातील स्वराज्य विहारमध्ये भाड्याने राहणाऱ्या आरोपी प्रशांत राजहंसने पत्नी भाग्यश्रीचा शुक्रवारी चाकूने गळ्यावर, शरीरभर वार करून खून केला. याची कबुली त्याने स्वतः फौजदार चावडी पोलिस ठाण्यात जाऊन दिली. त्यानंतर मयत भाग्यश्रीच्या भावाने (रलदीप) याने फिर्याद नोंदवली. वकील प्रशांत याला अटक केली होती.

शनिवारी दुपारी तपासाधिकारी पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांनी त्याला जिल्हा नेले. न्यायालयात न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर मुख्य आरोपीने केलेला गुन्हा, त्यामागचा हेतू तपासण्यासाठी चार दिवसाची पोलिस कोठडी मागितली. त्यावर न्यायालयाने मंजूर केली. यात सरकारी वकील बनसोडे यांनी काम पाहिले.

## घरगुती भांडणातून पतीकडून पत्नीला कुऱ्हाडीने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै -**

घरगुती भांडणातून पतीकडून पत्नीला कुऱ्हाडीने मारहाण करून जखमी करण्यात आले. अंजूबाई तानाजी भिसे (वय ४५, रा. घरमगाव, ता. मंगळवेढा) असे जखमी पत्नीचे नाव आहे. २० जुलै रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी घरगुती भांडणाच्या वादातून नवरा तानाजी भिसे याने कुऱ्हाडीने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यामध्ये अंजूबाई यांच्या डोक्यास, हातास मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# सत्य मांडणारी निर्भीड पत्रकारिता हवी : कुलगुरू डॉ. महानवर

### आधुनिक पत्रकारिता : आव्हाने आणि संधी या विषयावर कार्यशाळेत मंथन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

प्रथम बातमी देण्याच्या स्पर्धेत चुकीचा संदेश जाऊ नये. घाई न करता योग्य तीच बातमी लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे. सुदृढ पत्रकारितेला गालबोट लागू नये याची काळजी घेणे आता गरजेचे आहे. परिणामी समाजाचा विश्वास कमी होऊ शकतो. तंत्रज्ञानाचा वापर म्हणावा तितका या क्षेत्रात होत नाही. माहितीची सत्यता पडताळणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे संधी आणि आव्हानही आहे. सोशल मीडियामुळे चुकीच्या बातम्याही येतात. अशा बातम्यांमुळे समाजात संवेदनशीलता निर्माण होते. सत्य मांडणारी निर्भीड पत्रकारिता आज गरजेची आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर यांनी आज येथे केले.

पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सामाजिक शास्त्रीय संकुल, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन वरिष्ठ पत्रकार अभिजीत कारंडे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी विचारमंचावर दैनिक 'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने, पत्रकार महेश रामदासी, रघुवीर शिराळकर, पुरुषोत्तम कुलकर्णी, विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलचे संचालक प्रा.डॉ. गौतम कांबळे, जनसंज्ञापन विभागाचे प्रभारी विभागप्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, अध्यक्ष विक्रम खेलबुडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरु प्रा. महानवर पुढे म्हणाले, काळानुसार पत्रकारितेत बदल होत आहेत. तांत्रिकसह कंटेंट बदलत आहे. माहितीचा भडीमार होत आहे. यामध्ये निष्पक्ष पत्रकारिता ही काळाची गरज आहे. पत्रकार म्हणून अचूक माहिती पोहोचवणे महत्त्वाचे आहे. पत्रकारितेला संघर्ष नवा नाही. नवी आव्हाने पत्रकार पेलतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इंडिया टुडे मुंबईचे वरिष्ठ पत्रकार अभिजीत कारंडे म्हणाले, गेल्या २० वर्षात पत्रकारिता क्षेत्र वेगाने बदलत आहे. या बदलानुसार पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात विद्यापीठांनी बदल करणे गरजेचे आहे. पत्रकार म्हणून अचूक माहिती लोकांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. वृत्तपत्रातील माहिती बिनचूक आहे का हे महत्त्वाचे ठरते. पत्रकारितेतील आव्हाने याची काळजी करण्यापेक्षा सक्रियपणे काम केले पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ताने अनेक गोष्टी सुकर केल्या आहेत. तंत्र व कंटेंट हे मोठे आव्हान आहे. माहितीचा वर्षाव सर्वत्र होत असताना प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पत्रकारिता करण्याची आज आवश्यकता आहे. घटनास्थळावर गेल्यास तेथील घटनेची संवेदनशीलता आणि इतर कंगोरे मिळतात. या दृष्टिकोनातून निष्पक्षपणे पत्रकारिता करणे ही कसरत आहे मात्र ते करणे आवश्यक आहे. सामाजिक प्रा. डॉ. गौतम कांबळे म्हणाले, पत्रकारिता क्षेत्रात नवे बदल होत आहेत. पत्रकारितेमध्ये सध्या विश्वास टिकवणे आवश्यक आहे. तटस्थ पत्रकारिता सध्या राहिली नाही. त्या अनुषंगाने आता पत्रकारिता होणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. यावेळी डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी विद्यापीठातील जन संज्ञापन विभागातील विविध कोर्स आणि अभ्यासक्रमाची माहिती दिली. प्रारंभी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आणि पत्रमहर्षी बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी या कार्यशाळेमागचा उद्देश प्रास्ताविकेत स्पष्ट केला. सहाय्यक प्रा. डॉ. तेजस्विनी कांबळे यांनी सूत्रसंचालन केले तर सहाय्यक प्रा. डॉ. अंबादास भासके यांनी आभार मानले. यावेळी संघाचे सरचिटणीस सागर सुरवसे, खजिनदार किरण बनसोडे यांच्यासह शहर-जिल्ह्यातून विविध माध्यमांचे पत्रकार, प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढील सत्रात प्र. कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, पुणे विभागी माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे, क्षेत्रिय प्रचार अधिकारी अंबादास यादव, संपादक संजय पाठक, पत्रकार निलेश झालटे यांनी मार्गदर्शन केले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शालेय पोषण आहाराची पाककृती निश्चित

### यंदा आहारात कोणताही बदल नाही

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराच्या मेनूमध्ये शिक्षण विभागाने यंदा कोणताही बदल केला नाही. यंदाही गतवर्षीचाच मेनू असला तरी दर गुरुवारी विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार म्हणून पुलाव मिळत आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने पंधरवडा पाककृती निश्चित केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील चार लाख ६८ हजार विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचा लाभ दिला जात आहे.

राज्य सरकारच्या धोरणानुसार २००३ पासून जिल्हा परिषद व अनुदानित शाळांमधील पहिली ते आठवीच्या वर्गातील विद्याध्यर्थ्यांना प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेंतर्गत शालेय पोषण आहार देण्याची योजना राबवली जात आहे. या योजनेंतर्गत जिल्हा परिषद व अनुदानित खासगी शाळांमध्ये शालेय पोषण आहारात पौष्टिक आहार दिला जातो. त्यासाठीच्या खर्चात सरकारने यंदा वाढ केली आहे. राज्य सरकारने यंदा पोषण अभियान व पोषण पंधरवाडयावर लक्ष केंद्रित केले आहे. पंधरवड्याच्या प्रत्येक गुरुवारी विद्यार्थ्यांना पूरक पोषण आहार म्हणून मटर पुलाव व व्हेजिटेबल पुलाव देण्यात येत आहे. गुरुवारी सुटी असल्यास त्याच्या लगतच्या दिवशी पूरक पोषण आहार देण्याचा आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. या आदेशानुसार पंधरवड्यातील दोन आठवड्यासाठी निश्चित आहार विद्यार्थ्यांना दिला जात आहे.



> यंदाच्या शैक्षणिक वर्षात पोषण आहाराच्या मेनूत बदल केला नाही. गतवर्षांचा मेनू असला तरी पंधरवड्याचे नियोजन केले आहे. त्यानुसार दर गुरुवारी पूरक पोषण आहार दिला जात आहे. त्यात मटर पुलाव, व्हेजिटेबल पुलावचा समावेश आहे. त्याची शाळांकडून अंमलबजावणी केली जात आहे.
>
> **- कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

**साडेचार लाख विद्यार्थ्यांना लाभ**

शाळांची संख्या
४,०९२
पहिली ते पाचवी विद्यार्थी संख्या
२,८९,८३९
सहावी ते आठवी विद्यार्थी
१,७८,९१८
एकूण विद्यार्थी संख्या ४,६८,७५७

**पंधरवड्याचा मेनू**

**सोमवार :** मूग, शेवगा, वरण भात
**मंगळवार :** व्हेजिटेबल पुलाव
**बुधवार :** सोयाबीन पुलाव
**गुरुवार :** मटर पुलाव
**शुक्रवार :** मोड आलेल्या मटकी, उसळ भात
**शनिवार :** मसाले भात
**सोमवार :** सोयाबीन पुलाव
**मंगळवार :** मसाले भात
**बुधवार :** मूग, शेवगा, वरण भात
**गुरुवार :** व्हेजिटेबल पुलाव
**शुक्रवार :** मोड आलेल्या मटकी, उसळ भात
**शनिवार :** मटर

## महत्वाचे...



### ग्रामपंचायतींच्या विकासात्मक कामास सर्वोतोपरी मदत करणार : सूर्यकांत भुजबळ

**सोलापूर, दि.२० जुलै-**

गावाच्या विकासासाठी शासनाच्या अनेक योजना असून त्या गावपातळीवर राबवण्यासाठी सरपंच व पदाधिकाऱ्यांनी स्पर्धात्मक प्रयत्न करणे आवश्यक असून प्रशासन यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे सोलापूर जिल्हा परिषदेचे ग्रामपंचायत विभागाचे नूतन उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांनी सांगितले. सरपंच परिषद सोलापूर जिल्ह्याच्या वतीने राज्य उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव, जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, महिला जिल्हाध्यक्षा कविता घोडके-पाटील यांनी भुजबळ यांचा सत्कार केला. सरपंच परिषदेच्या माध्यमातून गाव हागणदारीमुक्त करण्यासाठी, स्मार्ट गावे करण्यासाठी, सरपंच, उपसरपंच सदस्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी सतत कार्यरत असून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आपण सहकार्य करावे, असे राज्य उपाध्यक्ष ॲड. विकास जाधव यांनी सांगितले. यावेळी गुळवंचीचे सरपंच सुनील जाधव, कारंबा सरपंच तुकाराम चव्हाण, अकोलेकाटीच्या सरपंच अंजली क्षीरसागर, साखरेवाडीचे सरपंच रेवणसिद्ध साखरे, नरोटेवाडीचे सरपंच उमेश भगत, राळेरासचे सरपंच नागनाथ माने, पाकणीचे सरपंच बालाजी येलगुंडे, सौदणेचे सरपंच शिवशंकर ढवण, उपसरपंच महेंद्र खटके, सदस्या परिणिती शिंदे, दत्तात्रय पवार आदी उपस्थित होते.



### अन्नछत्र मंडळातर्फे विद्या डाडर यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १९ जुलै-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यास हे संपूर्ण देशात अन्न हे पूर्णब्रम्हाची साक्ष देणारे स्वामींच्या दरबारातील अन्नछत्र असल्याचे मनोगत विधानपरिषदेच्या उपसभापती निलमताई गोऱ्हे यांच्या विशेष कार्यधिकारी विद्या डाडर यांनी व्यक्त केले. त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी न्यासाचे प्रवीण घाडगे, विजय माने, सागर याळवार, शहाजी यादव, सतीश महिंद्रकर, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, एस के स्वामी, महांतेश स्वामी, शिव स्वामी, श्रीकांत स्वामी, सचिन स्वामी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विशाल घाडगे, धनंजय निंबाळकर, राहुल इंडे, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी उपस्थित होते.



### ओन्ली समाजसेवा संस्थेतर्फे वृक्षारोपण

**बार्शी, दि. २० जुलै-**

येथील ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था बार्शी यांच्यावतीने शहीद मेजर कुणाल मुन्नागीर गोसावी बहुउद्देशीय संस्था संचलित राधेश्याम भराडिया बालग्राम पानगाव येथील शाळेत वृक्षारोपण करण्यात आले. त्यामध्ये नारळ, जास्वंती, चिक्कु, आंबा, फुलांचे शोभेची रोपे अशा ५१ रोपांची झाडे लावण्यात आली. तेथील नियोजन संस्थेचे अध्यक्ष शिवशंकर गोसावी, सचिव दत्तात्रय गोसावी, लक्ष्मण गोसावी, नागनाथ जाधव सर, प्रतीक कांबळे, अमर गोसावी, रामचंद्र काळे यांनी केले. ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्थेचे सदस्य केदारनाथ वळेकर यांनी सर्व झाडे दिली. ध्यास कोचिंग क्लासेस अध्यक्ष प्रा. सचिन मस्के यांच्या विद्यार्थ्यांनी ही यामध्ये सहभाग घेतला त्यामध्ये समर्थ जंगम, श्रीराम देवकर, वेदांत पवार, तनवीर गडकर, पानगाव शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी झाडे लावा झाडे जगवा 'एक पेड माँ के नाम' असा नारा दिला या कार्यक्रमाचे नियोजन संस्थेच्या अध्यक्ष राहुल वाणी यांनी केले. सूत्रसंचालन व कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. चंद्रकांत उलभगत यांनी केले. त्यावेळी राहुल वाणी, सुनील फल्ले, नागनाथ सोनवणे, संतोष शेळगावकर, माणकोजी ताकभाते, अजय तिवारी, सुरेंद्र जंगम, प्रा. डॉ. चंद्रकांत उलभगत, प्रा. सचिन मस्के, सागर घंटे, सुनील नवले, केदारनाथ वळेकर, रेखा विधाते, रागिनी झेंडे, रेखा सरवदे, सुनिता गायकवाड यावेळी उपस्थित होते. संस्थेच्या आभार शिवशंकर गोसावी यांनी मानले.

### यशकल्याणी सेवाभवन येथे कारगिल विजय दिवस समारंभाचे आयोजन

**करमाळा दि.२० जुलै-**

कारगिल विजय दिनाचे औचित्य साधत आजी- माजी सैनिक कल्याणकारी संघटना करमाळा व यश कल्याणी सेवाभावी संस्था करमाळा यांचे संयुक्त विद्यमाने २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस या समारंभाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या समारंभासाठी तालुक्यातील शहीद जवान परिवारातील वीर पत्नी, वीर माता, वीर पिता, व आजी -माजी सैनिक,सैनिक परिवार, व समस्त देशप्रेमी नागरिकांनी शूर वीरांना आदरांजली वाहण्यासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन सैनिक कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष मेजर अक्रूर शिंदे आणि यशकल्याणी परिवाराच्या वतीने प्रा.गणेश करे-पाटील यांनी केले आहे. करमाळा येथील यशकल्याणी सेवाभवन येथे राष्ट्रीय विजय समारंभाचे आयोजन केले जाते. २६ वर्षांपूर्वी मिळवलेल्या विजयाचा आनंद आणि देशासाठी वीरगती झालेल्या व शहीद जवानांचे स्मरण करण्यासाठी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो

## नवजात वासरास दूध पाजताना हलगर्जीपणा; दोन कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि. २० जुलै-**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समितीची पंढरपूर शहरात नगरपरिषद हद्दीत यमाई तलावाजवळ गोशाळा आहे. या गोशाळेतील कर्मचा-याने नवजात वासरास दुध पाजताना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याने वासराचा मृत्यू झाल्याची बातमी दि.१८ जुलै रोजी समाज माध्यमात प्रसिद्ध झाली होती. याशिवाय, त्याबाबतचा व्हिडीओ देखील समाजमाध्यमात व्हायरल झाला होता. मंदिर समितीच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले गोशाळेतील कर्मचारी योगेश सुधाकर पाठक व तानाजी रामचंद्र जाधव या दोन्ही कर्मचाऱ्याने २ ते ३ दिवस वयोमान असलेल्या वासरास दुध पाजताना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याने सदर नवजात वासराचा मृत्यू झाल्याचे सस्कृतदर्शनी दिसून येत आहे. याबाबत त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरून त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्याच्या दृष्टीने गोशाळा विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाणे येथे भा.न्या.सं. २०२२ मधील कलम ३२५ व ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याशिवाय, मंदिर समितीच्या आगामी सभेत सदरचा विषय ठेवून पुढील योग्य ती कारवाई देखील नियमानुसार करण्यात येईल. यामध्ये कोणत्याही व्यक्तीस पाठीशी घातले जाणार नाही असे मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

## शिवसेना (उबाठा) महिला आघाडीचा शाखा बांधणी अभियान सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० जुलै-**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) सोलापूर जिल्हा महिला आघाडीच्या वतीने आयोजित प्रभाग भेट व शाखा बांधणी अभियान सप्ताह मोठ्या उत्साहात व जोशात पार पडला. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व रश्मी ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना उपनेत्या तथा राज्य महिला समन्वयक डॉ. विशाखा राऊत, राज्य समन्वयक रंजना नेवाळकर यांच्या सूचनेनुसार हा सप्ताह राबवण्यात आला. या अभियानाला राज्य संघटक उद्धव कदम, जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ आणि जिल्हाप्रमुख डॉ. प्रा. अजय दासरी यांचे मार्गदर्शन लाभले.

नविन जिल्हा महिला संघटिका म्हणून अमिता जगदाळे यांनी नेतृत्व स्वीकारल्यानंतर जिल्ह्यातील विविध प्रभागांमध्ये महिला आघाडीच्या शाखा सक्रिय करण्याचे काम सुरू करण्यात आले. दिनांक १४ ते १९ जुलै या सप्ताहात प्रभाग क्रमांक ४, ५, ६, ७, १२ (बुधले गल्ली, मराठे वस्ती, यश नगर, निराळे वस्ती, मीनाक्षी नगर, मनोहर नगर, कलावती नगर) जाऊन शिवसेनेच्या जुन्या जेष्ठ महिला शिवसैनिकांच्या भेटी, त्यांचा सन्मान व सत्कार, तसेच नवीन कार्यकर्त्यांची नोंदणी आणि संघटनात्मक संवाद यावर भर देण्यात आला. शिवसेनेच्या निष्ठावान महिला कार्यकर्त्या, भगिनी आणि युवा महिलांचा या अभियानात उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. शिवसेना महिला आघाडी ही केवळ संघटना नसून, ती संघर्ष, आत्मभान आणि बदलाची चळवळ आहे, असे प्रतिपादन अमिता जगदाळे यांनी यावेळी केले. यावेळी उपजिल्हा संघटिका मंगल मोरे, उपशहर संघटिका सोनाली भोसले, नागू कनमुशे, ललिता झळके, दिपाली पवार, मीनाक्षी गवळी उपस्थित होते.




## ट्रकचालकास शिवीगाळ; तिघां रिक्षाचालकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० जुलै -**

शहरातील मार्केट यार्ड चौकात ट्रकचालकास शिवीगाळ केल्याप्रकरणी तिघां रिक्षाचालकाविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आबिद अब्दुल अजीज शेख (वय २४, रा. शांतीनगर, जि. आदिलाबाद, तेलंगणा) याच्या फिर्यादीवरुन विनायक उर्फ बापू बिरू पैकेकरी, व्यंकटेश सुरेश हलुरे, अक्षय जगदीश फुलारी (रा. अंबिका नगर, बाळे) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २० जुलै रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास आबिद शेख हा एमएच ११ डीडी ९४०६ घेऊन मार्केट यार्ड चौक येथून जात होता. त्यावेळी ट्रक ॲटो रिक्षाच्या अगदी जवळून गेल्याने एमएच १३ सीटी ३५५९ क्रमांकाच्या रिक्षाचा चालक विनायक पैकेकरी याने शेख यास अरेरावीची भाषा करून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी रिक्षामध्ये असलेले व्यंकटेश हलुरे, अक्षय फुलारी, सुनिल बुधनर यांनीदेखील ट्रकचालक शेख यास शिवीगाळ करून दमदाटी केली. त्यावेळी मार्केट यार्डात थांबलेल्या पोलिसांच्या गाडीतील कर्मचाऱ्यांनी ट्रकचालक व रिक्षातील सर्वांना जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात आणले. याप्रकरणी ट्रकचालकाच्या फिर्यादीवरुन तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार साळुंखे पुढील तपास करीत आहेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्रीनामदेव महाराज पुरस्कार जाहीर

### गुरुवारी पंढरपुरात वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० जुलै-**

संत साहित्य, नामभक्ती आणि समाज प्रबोधनाचा अखंड तेजोमय दीप प्रज्वलित करणाऱ्या भक्तशिरोमणी संत श्री नामदेव महाराज यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त, संत श्रीनामदेव महाराज फड संस्थान व संत वंशज, पंढरपूर यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना भक्तशिरोमणी संत श्रीनामदेव महाराज पुरस्कार २०२५ जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण श्री क्षेत्र पंढरपूर येथे गुरुवार दि. २४ जुलै रोजी करण्यात येणार असल्याची माहिती संत नामदेव महाराज यांचे वंशज निवृत्ती महाराज नामदास यांनी दिली.



नामदास म्हणाले, महाराष्ट्रात संतसत्तेचा व शासनसत्तेचा समन्वय साधत, वारकरी संप्रदायाचे सक्षमीकरण, कीर्तनकारांचा गौरव, दिंड्यांना शासनमान्यता आणि वारी प्रबोधन सेवा रथ यांसारख्या विविध उपक्रमांद्वारे शिंदे यांनी समाजसेवा व अध्यात्माची खरी पताका उंचावली आहे. संत नामदेव महाराज जसे पंजाब, महाराष्ट्र, व उत्तर भारतात आपली संत परंपरा पोहचवणारे झाले, तसेच एकनाथ शिंदे यांनी आजच्या युगात 'संतविचारांचा शासनसत्तेतुन जागर' घडवला आहे. त्यांच्या अध्यात्मिक क्षेत्रातील अतुलनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना अशा प्रकारे इतिहासातील प्रथमच पुरस्कार देऊन आम्ही त्यांना सन्मानित करणार आहोत. हा गौरव सोहळा गुरुवार, दिनांक २४ जुलै रोजी दुपारी २ वाजता श्री केशवराज मंदिर, संत नामदेव महाराज वाडा, पंढरपूर येथे संपन्न होणार असून, या प्रसंगी संपूर्ण महाराष्ट्रातील संत वंशज, फड परंपरेचे प्रमुख, वारकरी संप्रदायाचे मान्यवर, कीर्तनकार, पंजाब व उत्तर भारतातील भक्त उपस्थित राहणार आहेत.

## वीजेचा शॉक बसून पशुपालकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २० जुलै-**

सिध्दापूर येथे जनावरांना पाणी पाजण्यासाठी हौदात पाणी भरत असताना विद्युत मोटारीचा करंट लागून संतोष शिवशंकर रामपुरे (वय ४०) या शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली असून याची मंगळवेढा पोलीसात अकस्मात मयत अशी नोंद झाली आहे.

यातील खबर देणारे मयताची पत्नी मिनाक्षी संतोष रामपुरे (वय३५) हिस दि.१९ रोजी सकाळी १०.३० वाजता यातील मयत याने मी जनावरांना पिण्यासाठी हौदात पाणी भरतो असे म्हणून मयत हे हौदाकडे पाणी भरण्यास गेले. काही वेळातच त्यांचा मोठमोठ्याने ओरडल्याचा आवाज आल्याने पत्नी मिनाक्षी ही घटनास्थळी गेली असता इलेक्ट्रीक वायरला चिटकलेले दिसले. वायर ओढून पत्नीने बाजूला केली. तद्नंतर शेजारी गजानन नांगरे व सिद्राम चौगुले हे पळत आले. ज्ञानेश्वर कपाले यांना कॉल करुन बोलावून घेवून बेशुध्द अवस्थेत बोराळे येथील स्वामी हॉस्पिटल मध्ये नेले. तद्नंतर अधिक उपचारासाठी मंगळवेढ्याला पाठविण्यात आले मात्र औषध उपचारापुर्वीच ते मयत झाले असल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषीत केले. याचा अधिक तपास पोलीस हवालदार मनोज खंडागळे हे करीत आहेत.

## बार्शीच्या भगवंत मंदिरात श्रावणमास प्रवचनमालेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० जुलै-**



दरवर्षीप्रमाणे श्री भगवंत देवस्थान ट्रस्ट बार्शी व श्री सद्गुरु बोधराज भक्त मंडळ, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २५ जुलैपासून श्री भगवंत मंदिरात दररोज संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत श्रावणमास प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या प्रवचनमालेचे निरुपणकार हभप डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांच्या अमृतवाणीतून या वर्षी श्रीमद्भागवत कथा-चिंतन या विषयावर महिनाभर निरुपण होणार आहे. हभप डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले हे मूळ बार्शी तालुक्यातील धामणगाव (दु.)येथील असून ते श्रीसंत माणकोजी महाराज बोधले यांचे ११वे वंशज आहेत. यापूर्वी श्रीगुरु डॉ.जयवंत महाराज बोधले यांनी भगवंत मंदिरात सन २००३ पासून श्रावणमास प्रवचनमालेतून अखंड विविध आध्यात्मिक विषयावर निरुपण केलेले आहे. यावर्षी ही प्रवचनमाला २१व्या वर्षात पदार्पण करीत आहे. आतापर्यंत त्यांनी श्री संत नामदेव महाराज चरित्र, हरिपाठ, श्रीकृष्ण चरित्र, विष्णु सहस्त्रनाम, श्री संत माणकोजी बोधले महाराज चरित्र, चांगदेव पासष्टी, श्री संत तुकाराम महाराज चरित्र व तत्त्वज्ञान, श्री संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र व तत्त्वज्ञान आणि श्री संत एकनाथ महाराज चरित्र व तत्त्वज्ञान अशा अनेक अध्यात्मिक विषयावर संपूर्ण महिनाभर निरुपण केलेले आहे. या वर्षीच्या श्रीमद्भागवत कथा - चिंतन या विषयावरील निरुपणाचा भाविकांनी आनंद घ्यावा, असे आवाहन भगवंत देवस्थान ट्रस्टचे सरपंच दिलीप बुडुख आणि श्री सद्गुरु बोधराज भक्त मंडळाचे प्रा. विलास जगदाळे यांनी केले आहे.

# पावसाच्या खंडामुळे खरीप पिके संकटात

### नरखेड पंचक्रोशीतील शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि २० जुलै-**

गेल्या महिन्याभरापासून पावसाचा मोठा खंड पडल्याने खरीप पिके संकटात आली आहेत. मोहोळ तालुक्यातील नरखेड व परिसरातील मलिकपेठ, भोयरे, एकुरके, डिकसळ, मसले चौधरी, वाळूज देगाव, भैरववाडी, मनमोळी या भागात पावसाचा खंड पडल्याने खरिपाची पिके धोक्यात आली आहेत.

सध्या पिकांना पावसाची गरज आहे मृगाच्या सुरुवातीला अवकाळी पाऊस व जूनच्या पहिल्या आठवड्यात चांगला पाऊस झाला चांगले पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात खरीप पेरण्या केल्या. मात्र, त्यानंतर एक महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे पिकांची वाढ थांबली असून आहे, सुरुवातीमुळे मोठ्या जोमाने शेतकऱ्यांनी पेरलेली खरिपाची पिके तूर, उडीद, मूग, भुईमूग, सोयाबीन,चवळी, सूर्यफूल आदी पिके पावसाचा खंड पडल्याने सुकून जाऊ लागली आहेत. सिंचनाच्या सुविधा नसल्याने जिरायती शेतातील पिकाला फटका बसत आहे पिके वाढण्याच्या अवस्थेत असताना पावसाने गुंगारा दिल्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. अनेक शेतकरी पिके जगविण्यासाठी तुषार सिंचनाचा वापर करीत आहेत. तर आलेली पिके हरीण व रानडुकर फस्त करीत आहेत. दिवसभर ढगाळ वातावरण राहत आहे. पाऊस पडेल असे वातावरण दिसते मात्र पाऊस काही पडत नाही. कीड व अळींचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कीटकनाशके फवारली जात आहेत. चार आठ दिवसात जर पाऊस झाला तरच सोयाबीन व इतर खरीपाची पीके हाती लागतील अन्यथा शेतकऱ्यापुढे मोठे आर्थिक संकट उभे टाकणार आहे. खरीपाच्या पेरणीसाठी बीयाणे, खते,कीटकनाशके, रोजगार यावर शेतकऱ्यांना मोठा खर्च करावा लागला आहे. सद्यस्थितीत पिके जगण्यासाठी पावसाची नितांत आवश्यकता आहे.



> जुनच्या सुरुवातीला चांगला पाऊस झाल्याने मी सोयाबीनची पेरणी केली,अंतर मशागतीची कामे पूर्ण झाली असून पिकांना पावसाची गरज आहे,सोयाबीन फुलकळी स्थितीत आहे पावसाने ओढ दिल्यास फुलगळती होईल सद्या पाऊस पडल्यास पिकाचे उत्पादन चांगले होईल.बी बियाणे,खते व रोजगार यामध्ये मोठ्या प्रमाणात महागाई झाल्यामुळे आर्थिक नियोजन करताना दमछाक होत आहे त्यात निसर्गाच्या लहरीपणामुळे आणखी भर पडत आहे.
>
> **- मच्छिंद्र राक्षे**
> शेतकरी व ग्रामपंचायत सदस्य, वाळूज

## सम्राट बिअर शॉपीसमोरून दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि २० जुलै-**

एमआयडीसीमधील सम्राट बिअर शॉपीसमोर पार्क केलेली ३० हजारांची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत कल्याणी विजयकांत मठपती (वय ३७, रा. तिरूपती बालाजी सोसायटी, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कल्याणी मठपती यांनी त्यांची एमएच १३ डीएस ९१७० ही सम्राट बिअर शॉपीसमोर १३ जुलै रोजी पार्क करून ठेवली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पिलीव येथील शिबिरात २० जणांचे रक्तादन

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२० जुलै-**

पिलीव (ता.माळशिरस) येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्राम पंचायतच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शिबीरात २० जणांनी रक्तदान केले. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात झालेल्या या शिबीराचे उदघाटन प्रशासक मिसाळ यांच्या हसत् झाले. यावेळी सेवानिवृत्त कृषी विस्तार अधिकारी अनील सावळजकर, पिलीव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव, ग्रामविकास अधिकारी भंडलकर, डॉ. सागर जाधव, निलेश कांबळे, दामोदर लोखंडे, रघुनाथ देवकर, संजय पाटील, प्रमोद भैस, अतुल नष्टे, शाहरुख मुलाणी, राहुल मदने, तानाजी लोखंडे सर्व आरोग्य कर्मचारी, आशा सेवीका यावेळी उपस्थित होते. स्वतः वैद्यकीय अधिकारी डॉ. विलास जाधव यांनी रक्तदान करुन या शिबीराचा शुभारंभ केला.





## महत्वाचे...

### बाळासाहेब नागणे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार जाहीर

**मंगळवेढा दि. २० जुलै-**



साहित्यिक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त मंगळवेढा येथील साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाच्या वतीने दिला जाणारा २०२५चा आदर्श पत्रकार पुरस्कार मंगळवेढा तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व क्रियाशील पत्रकार बाळासाहेब नागणे यांना जाहीर झाला आहे. विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना व संस्थेस साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव मंडळाचे विविध पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. बाळासाहेब नागणे हे श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्यामध्ये कार्यरत आहेत. शुक्रवार दिनांक १ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता मंगळवेढा येथे एका समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष आकाश अवघडे यांनी सांगितले.



### पाठीमागील भांडणाचा राग धरुन तरुणास पाईपने बेदम मारहाण

**मंगळवेढा दि. २० जुलै-**

भोसे येथे पाठीमागील भांडणाचा राग मनात धरुन आकाश अशोक काकडे (वय २५) या हॉटेल मॅनेजरला जबरदस्तीने मोटर सायकलवर बसवून माळरानावरील गद्यागाढव येथे नेवून अंगावरील कपडे काढून हातपाय बांधून रुमालाचा बोळा तोंडात कोंबून प्लास्टिकच्या पाईपने बेदम मारहाण करुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी जकराया मासाळ,गंगाराम शेजाळ,जीवन मोटे (रा.नंदेश्वर),कुंडलिक मासाळ, समाधान मासाळ (रा.गोणेवाडी) या पाचजणाविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील जखमी फिर्यादी तथा हॉटेल मॅनेजर आकाश अशोक काकडे (रा.काकडे वस्ती भोसे) हे दि.१८ जुलै रोजी रात्री ९ वाजता भोसे येथील स्वराज्य हॉटेल मध्ये काऊंटरवर बसले असता पाठीमागील भांडणाचा राग मनात धरुन वरील आरोपींनी मोटर सायकलवर येवून फिर्यादीस जबरदस्तीने बसवून माळरानावरील गद्यागाढव येथे नेवून फिर्यादीच्या अंगावरील कपडे काढून त्याच कपड्याने हातपाय बांधले, तसेच रुमालाचा बोळा तोंडात कोंबून आरोपींनी प्लास्टिकच्या पाईपने पाठीवर पोटावर हातावर, पायावर, डोकीत मारुन गंभीर जखमी केले. पोलीसात तक्रार केली तर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी दिली असल्याचे दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# कॉरिडॉरबाबत संवादासाठी तीन उपजिल्हाधिकारी नियुक्त

## जिल्हाधिकारी आशिर्वाद यांची माहीती | संबंधित नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, २० जुलै -**

पंढरपूर कॉरिडॉर विकासाच्या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या समस्या आणि अपेक्षा समजून घेण्यासाठी तसेच शासनाकडून कशा पद्धतीने मदत केली जाणार आहे याची माहिती देण्यासाठी येत्या २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत बैठका आयोजित केल्या जात आहेत. या बैठका घेण्यासाठी तीन उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सर्व समावेशक चर्चा होण्यासाठी नागरिकांनी सहभागी होऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले आहे.

भूसंपादन अधिकारी संतोष देशमुख, भूसंपादन अधिकारी सीमा होळकर व जिल्हा पुनर्वसन अधिकारी सुशांत बनसोडे या तीन उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती पंढरपूर कॉरिडॉर अनुषंगाने संबंधित नागरिकांशी सर्व समावेशक चर्चा करून नागरिकांच्या मागण्या सूचना व अपेक्षा यांची माहिती जाणून घेणार आहे तसेच शासन त्यांना या अंतर्गत कशा पद्धतीने मदत करू शकते याविषयी सांगितले जाणार आहे. संबंधित अधिकारी दररोज २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करतील. तरी पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत ज्या नागरिक, व्यापारी व व्यावसयिक यांचा संबंध येणार आहे अशा सर्व नागरिकांनी अशा बैठकामध्ये उपस्थित राहून सहकार्य करावे. नियुक्त केलेले अधिकारी हे उपरोक्त कालावधीत पंढरपूर येथे थांबून कामकाज करतील.



मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस यांच्या मुंबई येथील निवासस्थानी शनिवारी (दि.१९) जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर कॉरिडोरच्या अंतिम आराखड्या विषयी मुख्यमंत्र्यांना माहिती दिली. या बैठकीत कॉरिडोर बाधित नागरिकांना द्यावयाच्या मोबदल्या विषयी देखील त्यांनी मुख्यमंत्र्याशी चर्चा केली. बाधित नागरिकांना जास्तीत जास्त मोबदला देण्याविषयी देखील जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्राना अवगत केले. त्यास मुख्यमंत्र्यांनी देखील सकारात्मक प्रतिसाद दिला. मुख्यमंत्र्यां समवेत झालेल्या कॉरिडोर विषयीच्या बैठकीच्या वेळी जिल्हाधिकाऱ्यां समवेत इतर अधिकारी देखील उपस्थित होते.

> पंढरपूर कॉरिडॉरच्या अनुषंगाने १ ते ३ मे २०२५ या कालावधीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी पंढरपूर येथे सर्व संबंधित नागरिकांच्या बैठका घेऊन चर्चा केलेली होती व त्या चर्चेमध्ये या अनुषंगाने पुढे जाण्यासाठी सर्वांना विचारात घेऊनच जाऊ असा शब्द प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेला होता. त्या पार्श्वभूमीवर दिनांक २५ जुलै ते ५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत नियुक्त केलेले तीन उपजिल्हाधिकारी २५ ते ३० नागरिकांच्या गटाशी चर्चा करणार आहेत. या चर्चेतून सर्वसमविशक निर्णय घेण्यात येणार आहे. तरी उपरोक्त कालावधीत सर्व संबंधित नागरिकांनी बैठकामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन करतो.
>
> – **कुमार आशीर्वाद**, जिल्हाधिकारी

# रोटरी क्लबतर्फे बार्शीत पुस्तक बँक

### पुस्तकांच्या वितरणास झाली सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जुलै-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय बार्शी येथे शनिवार दि. १९ जुलै रोजी सकाळी १० वाजता रोटरी पुस्तक बँक स्थापन करीत पुस्तक वितरणास सुरूवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ प्रमुख पाहुणे संभाजी घाडगे संस्थापक-जिजाऊ गुरुकुल खांडवी, सचिन उकीरडे सर, लोकसेवा विद्यालय आगळगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत रो. संजय हिंगमिरे अध्यक्ष रोटरी क्लब, रो. जवाहरभाई माढेकर हे उपस्थित होते. यावेळी वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ, आनंद सुराणा, रुपेश कांकरिया, रो. क्लबचे मधुकर डोईफोडे सर रवि क्लासचे संस्थापक, ड. विक्रम सावळे, शिंदे मॅडम, सतीश भडकवार गुरुजी, बालाजी शेळके हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणेंचा सत्कार वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुल्हाने सर यांनी केले. तर प्रस्तावना रो. मधुकर डोईफोडे सर यांनी केली. प्रमुख पाहुणे व वाचनालयाचे अध्यक्ष व संचालक यांच्या हस्ते १) जि. प. प्रशाला सुर्डी, २) जि. प. प्रशाला लाडोळे, ३) जीजामाता विद्यामंदिर बार्शी, ४) लोकसेवा विद्यालय आगळगाव, ५) जिजाऊ गुरुकुल खांडवी या शाळेला प्रत्येकी २०० पुस्तके वितरण करण्यात आली. शेवटी आभार प्रदर्शन वाचनालयाचे संचालक आनंद सुराणा यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे यांनी परिश्रम घेतले.



# जाळून मारलेल्या 'त्या' अज्ञात महिलेचे नातेवाईक सापडले

### शोध घेण्यात मंगळवेढा पोलीसांना आले यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० जुलै-**

या घटनेची हकिकत अशी, दि.१४ रोजी रात्री २ वाजता आरोपी निशांत सतिश सावत याने किरण नागेश सावत (रा.पाठखळ) या दीर-भावजयेशी असलेले प्रेमसंबंध लपविण्यासाठी गोपाळपूर येथून एक वेडसर महिला मोटर सायकलवर पाठखळ येथे आणून तिला कडब्याच्या गंजीत घालून जाळून मारले होते. या घटनेमुळे संपूर्ण सोलापूर जिल्हा हादरुन गेला होता. तपासिक अंमलदार तथा पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी आरोपीला न्यायालयात उभे केल्यानंतर न्यायालयाने सहा दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.

या तपासा दरम्यान पंढरपूर येथून सदर महिलेला मोटर सायकलवर आणतानाचे सी.सी. टीव्ही कॅमेरात चित्र कैद झाले होते. मंगळवेढा ते पंढरपूर मार्गावरील सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासले असता त्यामध्ये आरोपी निशांत सावत हा महिलेला घेवून मोटर सायकलवर आणत असल्याचे कॅमेरात कैद झाले होते. हे फुटेज पोलीसांनी मिळवून तपासाधिकारी सदर अज्ञात महिलेच्या नातेवाईका पर्यंत पोहचले. सदर संशयीत महिलेच्या नवर्याचे नाव नारायण सखाराम देशमुखे असून मृत संशयीत महिला ही छाया नारायण देशमुखे (वय ४५ रा.गोपाळपूर) असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर संशयीत मृत महिला व कुटूंबियातील व्यक्तीची डीएनए चाचणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

हा सर्व तपास पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या घटनेत अन्य कोण सामील आहे काय? याचा उर्वरीत तपास करणे बाकी आहे. घटनेच्या दिवशी आरोपी निशांत सावत याने प्रियशी किरण सावत हिला मोटर सायकलवरुन सांगली जिल्ह्यातील विटा येथे मध्यरात्री सोडले होते. सदर आरोपी महिला किरण सावत ही कराड पर्यंत रात्रीच्यावेळी या मार्गावर नवखी असताना ती कशी गेली? तेथून तिला अन्य कोणी मदत केली आहे का? याचा तपास होणेही तितकेच गुन्हयाच्या दृष्टीने महत्वाचे असल्याचे बोलले जात आहे.

# महातपुर निकृष्ट रस्त्याबाबत शिंदे गटाचा आज रास्तारोको

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० जुलै-**

माढा शहरापासून जवळच असलेल्या महातपुर, निमगाव राहुलनगर, दारफळ या गावातील ग्राम स्थांसह शिवसेना शिंदे गटाने २१ जुलै रोजी रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा शिवसेना शिंदे गटाचे माढा तालुका विभाग प्रमुख महेश मोहोळे यांनी दिला आहे.

माढा तालुक्यातील महापुर रेल्वे गेटच्या भुयारी पुलाचे काम सुरू असल्याने नागरिकांसाठी पर्यायी रस्त्याची व्यवस्था रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आली असली तरी तो रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा असल्याने नागरिकांचे अतोनात हाल होत आहेत त्यामुळे शिवसेना शिंदे गटाकडून त्या रस्त्यासाठी आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. महातपूर रेल्वे गेट जवळ रेल्वे लाईनच्या पुलाचे काम सुरू आहे. दरम्यानच्या काळामध्ये लोकांला दळणवळणासाठी पर्यायी रस्ता करून देण्यात आला होता. मात्र करून दिलेला रस्ता हा अतिशय निकृष्ठ दर्जाचा आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या प्रवाशांना, नागरिकांना आणि शालेय विद्यार्थ्यांना याचा नाहक त्रास होत आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने मोठ्या गाड्या फसत आहेत. याबाबत नागरिकांनी वारंवार रेल्वे प्रशासनाला तोंडी विनंती केलेली असतानाही याबाबत कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे सोमवार दि. २१ जुलै रोजी गेट जवळ रास्ता रोको करण्याचा इशारा देण्यात आला आहे. या बाबतचे निवेदन शिवसेना शिंदे गटाच्या वतीने कुर्डूवाडी रेल्वे कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यावेळी महेश मोहोळे, नितीन उपाध्ये, संदीप कवठे, महेश भोसेकर, सुरेश साबळे, सलीम पिंजारी, कुंतल मोहोळे, जंबुकुमार कवठे, सुरज मोहोळे, दत्तात्रय शिंदे आदि उपस्थित होते.



**रेल्वे प्रशासनाकडून आंदोलन न करण्याची विनंती**

शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी जिल्हा रेल्वे व्यवस्थापकांना फोनद्वारे संपर्क केला व तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या आहेत. याबाबत संबंधित ठेकेदारांना तात्काळ सूचना देऊन रस्ता दुरुस्त करण्याचे आदेश दिल्याचे सांगून आंदोलन न करण्याची विनंती रेल्वे व्यवस्थापकांनी केली आहे.

# सांगोला रेल्वे स्टेशनवर कोच इंडिकेटरची सुविधा करा

### अशोक कामटे संघटनेची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० जुलै-**

सांगोला रेल्वे स्टेशनवर अनेक वर्षांपासून कोच इंडिकेटरची सोय नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे.

सदरची सुविधा तात्काळ करण्यात यावी अशी मागणी निवेदनाद्वारे सांगोल्यातील शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक यांच्याकडे केली आहे. सांगोला रेल्वे स्टेशनवर दररोज पाच ते सात रेल्वेची आवक- जावक असते. पण प्लॅटफॉर्मवर वेगवेगळे संरचनेचे रेल्वेचे डबे कोणत्या ठिकाणी गाडी आल्यावर येऊ शकतात हे प्रवाशांना समजणे अवघड आहे. मुळातच सांगोला स्थानकावर सर्व रेल्वे गाड्यांना दोन मिनिटांचा थांबा असल्याने आरक्षित प्रवाशांना कमी वेळात आपल्या तिकीट वरील बोगी शोधणे अशक्य काम आहे. कदाचित त्यामुळे रेल्वेही सुटू (प्रस्थान) शकते. संबंधित रेल्वे प्रशासनाने कोच इंडिकेटरची सुविधा निर्माण केल्यास प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार आहे अशी मागणी निवेदनाद्वारे संघटनेने केली आहे. या निवेदनाच्या प्रती खा.धैर्यशील मोहिते पाटील, विभागीय रेल्वे व्यवस्थापक सोलापूर, मध्य रेल्वे विभाग यांनाही देण्यात आल्या आहेत.




> सांगोला स्टेशन येथील ९००-९५० मीटरचा प्लॅटफॉर्म क्रमांक एक व दोन असून १९-२२ डब्यांची एखादी एक्सप्रेस रेल्वे जर आली तर डब्याची संरचना समजणे प्रवाशांना जिकीरीचे काम आहे. त्यामुळे प्रवाशांची या दोन मिनिटांमध्ये पंचायत होते. सांगोला हे मिरज-कुर्डूवाडी लोहमार्गावरील प्रमुख स्टेशन असून प्रवाशांची गैरसोय टाळण्याकरिता रेल्वे प्रशासनाने लवकरात लवकर कोच इंडिकेटरची सुविधा द्यावी.
>
> **- निलकंठ शिंदे**

# संताजी घोरपडे स्मारकासाठी १० कोटी द्या

- **आ.उत्तमराव जानकर यांची राज्य सरकारकडे मागणी**
- **सरसेनापती घोरपडेंचे वंशज उदयसिंहराजेंनी मानले आभार**

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. २० जुलै-**

मोजक्या पण अपराजित सेनानायकांपैकी एक असलेल्या संताजी घोरपडे यांचे स्मरक व शिल्पस्थळ साखळ करणे आवश्यक असून यासाठी आमदार उत्तमराव जानकर यांनी राज्य शासनाकडे १० कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे.

माळशिरस तालुक्यातील कण्हेर-इस्लामपूर संगमावर असलेल्या स्वराज्याचे शूर सेनानायक संताजी घोरपडे यांच्या वास्तव्याच्या जागेवर हे स्मारक व शिल्पस्थळ उभारण्याची मागणी गेल्या काही वर्षांपासून होत आहे. या ऐतिहासिक स्थळाचे महत्त्व अधोरेखित करत आमदार उत्तमराव जानकर यांनी पत्र देत स्मारकासाठी भरीव निधीची बाबत यांनी शासन स्तरावर पाठपुरावा करत १० कोटी रुपयांचा निधी मंजूर व्हावा अशी मागणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. यामुळे येत्या काळात या ऐतिहासिक स्मरकाच्या उभारणीस गती मिळणार आहे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बाबत शूरवीर संताजी घोरपडे यांचे वंशज उदयसिंहराजे घोरपडे यांनी जानकर यांचे आभार मानले.





> या ऐतिहासिक कार्याला आमदार उत्तमराव जानकर यांच्यामुळे गती मिळेल, हे आमच्यासाठी गौरवाचे आहे. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात संताजी घोरपडे यांनी मुघल साम्राज्याला हादरवून सोडले. त्यांच्या पराक्रमामुळे स्वराज्य टिकून राहिले. त्यांच्या नावाचे भव्य स्मारक हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल.
>
> **- उदयसिंहराजे घोरपडे**

> शिवरायांचे सेनानायक संताजी घोरपडे यांच्या स्मरणार्थ भव्य स्मारक उभारण्याचा आमचा प्रयत्न आहे. या कार्यासाठी निधी मंजूर करण्यास सरकारला विनंती केली आहे.
>
> **- आ. उत्तमराव जानकर**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/**. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)